दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले | RNI No. MAHMAR/2019/82605 | वर्ष ७ वे | पाने ८ | मुल्य रू. ४.०० | अंक २१७ | गुरूवार २१ मे २०२६
| पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 | www.rashtrasahyadri.com

## तुज् आहे तूज पाशी...



'सहजयोग'
भाग ५७

आपल्या महाराष्ट्रात सर्व विश्वाची कुंडलिनी आहे. संतानी, गुरूंनी या आपल्या महाराष्ट्रावर विशेष करून फार उपकार केले. त्यांनी सगळं काही संतांचे लक्षण वगैरे सगळं काही लिहून ठेवलेलं आहे. पण तरीसुद्धा आपले लक्ष नेहमी अज्ञानामुळे अशा लोकांच्याकडे जात, की जे लोक परमेश्वरापासून फार दूर नरकात लोळत आहेत. हे महापातकी लोक आहेत. जे लोकांची दिशाभूल परमेश्वराच्या नावावर करतात आणि तुमच्याकडून पैसे उकळून घेतात. पहिल्यांदा मला सांगायचं म्हणजे असं की जो मनुष्य तुमच्याकडून पैसे उकळून घेईल. तो मनुष्य परमेश्वराच्या दरबारातसुद्धा नाही असं समजलं पाहिजे. तुम्ही परमेश्वराला पैसे देऊ शकत नाही. परमेश्वराला पैसे समजत नाहीत.परमेश्वर हा आपल्या ठायी आहे. असं सगळ्यांनी सांगितलं. तुझे आहे तुजपाशी, सगळ्यांनी सांगून ठेवलेलं आहे.लोकांना असं वाटते की हे काहीतरी उगीचच थोतांड आहे. परमेश्वर म्हणुन कोणची चिज नाही. हे उगीचच परमेश्वरा बद्दल लोक सांगत असतात. कारण याना पैशे कमवाण्याची काहीतरी गरज पडलेली आहे.त्यामुळे परमेश्वरसुद्धा आता विकायला ठेवला आहे. जसे सगळेच आता विकायला ठेवलेले आहे.अशा या परिस्थितीत सहजयोग एखाद्या चिखलामध्ये कमळ उमलाव त्याप्रमाणें सुरभी घेऊन सगळ्या जगाला सुरभीत करणार आहे. – ०२ मे १९८४ कोल्हापूर


www.sahajayogamumbai.org 8871519191
सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

## संभाजीनगरमध्ये 'कॉकरोच जनता पार्टी'ची स्थापना

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संभाजीनगर :** गेल्या ७२ तासांपासून सोशल मीडियावर (एक्सबॉक्स आणि इन्स्टाग्रामवर) एक भलतंच ट्रेंड करत आहे, 'कॉकरोच जनता पार्टी'. अवघ्या तीन दिवसांत, या 'विनोदी' आणि उपहासात्मक राजकीय आघाडीने देशभरातील एक लाखाहून अधिक तरुणांना आकर्षित केले आहे आणि इन्स्टाग्रामवर २० लाखांहून अधिक फॉलोअर्स मिळवले आहेत. या व्हायरल वादळाच्या केंद्रस्थानी आहे छत्रपती संभाजीनगरचा ३० वर्षीय अभिजीत दीपक दीपके. इंटरनेटवर 'बेरोजगार आणि आळशी लोकांचा आवाज' असल्याचा दावा करणाऱ्या या पक्षाची कल्पना अभिजीतला कशी सुचली याचीच सध्या सर्वत्र चर्चा आहे.



छत्रपती संभाजीनगरमधील अभिजीत दीपके हा व्यावसायिक राजकीय संवाद रणनीतिकार आहे. अभिजीतने पुण्यातून पत्रकारितेत पदवी घेतली. त्यानंतर, ते उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत गेला. नुकतेच प्रतिष्ठित बोस्टन विद्यापीठातून जनसंपर्क (पीआर) विषयात मास्टर ऑफ सायन्स (एमएस) पूर्ण केले आहे.

अभिजीत दीपकेला राजकीय संदेश व्हायरल करण्याचा व्यापक अनुभव आहे. २०२० ते २०२२ दरम्यान आम आदमी पार्टीच्या (आप) सोशल मीडिया टीममध्ये एक प्रमुख स्वयंसेवक होता. २०२० च्या दिल्ली विधानसभा निवडणुकीदरम्यान 'आप'च्या बाजूने आलेल्या मीम्सच्या महापुरामागे अभिजीतचा हात मानला जातो. त्याने दिल्ली शिक्षण विभागासाठी संवाद सल्लागार म्हणूनही काम केले आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या एका तोंडी टिप्पणीनंतर ही चळवळ सुरू झाली. १५ मे २०२६ रोजी, बनावट पदव्यांशी संबंधित एका खटल्याची सुनावणी करताना, सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी असे म्हटले होते की, काही बेरोजगार लोक झुरळांप्रमाणे कायदा, प्रसारमाध्यमे आणि आरटीआय चळवळीसारख्या प्रणालींमध्ये घुसखोरी करतात. नंतर सूर्यकांत यांनी स्पष्ट केले की, ही टिप्पणी सामान्य बेरोजगार तरुणांना उद्देशून नव्हती, तर बनावट पदव्या असलेल्यांना उद्देशून होती. पण तोपर्यंत सोशल मीडियावर संतापाचा उद्रेक झाला होता. (पान ४ वर)

# 'लोकल बॉडी'च्या आखाड्यात विखे विरुद्ध सुनेत्रा पवारांची प्रतिष्ठा पणाला



विधान परिषद
अहिल्यानगर
स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघ


करण नवले

महाराष्ट्रातील १७ स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांच्या विधान परिषद निवडणुकांची घोषणा होताच राज्याच्या राजकारणाचे लक्ष पुन्हा एकदा अहिल्यानगर जिल्ह्याकडे वळले आहे. स्वर्गीय अरुणकाका जगताप यांची रिक्त झालेली ही जागा आता केवळ एक निवडणूक राहिलेली नाही; तर ती जिल्ह्यातील सत्ता केंद्रांवरील वर्चस्वाची मोठी राजकीय लढाई ठरणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे जिल्ह्याच्या राजकारणाची खरी सत्ता केंद्रे मानली जातात. त्यामुळे महानगरपालिका, नगरपालिका, पंचायत समित्या आणि स्थानिक संस्थांवर प्रभाव कोणाचा, हे या निवडणुकीतून स्पष्ट होणार आहे...

विशेष म्हणजे ही जागा राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाकडे असल्याने उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासाठी ही पहिली मोठी राजकीय परीक्षा मानली जात आहे. दुसरीकडे जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासाठीही ही निवडणूक प्रतिष्ठेची बनली आहे. त्यामुळे या निवडणुकीकडे राज्यातील महायुतीच्या अंतर्गत शक्तीपरीक्षेच्या नजरेतूनही पाहिले जात आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील निवडणूक सर्वसामान्य





जनतेपेक्षा स्थानिक संस्थांतील निवडून आलेल्या सदस्यांच्या मतांवर अवलंबून असते. त्यामुळे येथे पक्षीय लाटेपेक्षा वैयक्तिक संपर्क, गटबाजी, आर्थिक ताकद आणि स्थानिक समीकरणे अधिक महत्त्वाची ठरतात. अहिल्यानगर जिल्ह्यात गेल्या काही वर्षांत राजकीय समीकरणे झपाट्याने बदलली आहेत. महायुती, महाविकास आघाडी, राष्ट्रवादीतील फुट, भाजपचा वाढता प्रभाव आणि स्थानिक पातळीवरील वैयक्तिक गट यामुळे या निवडणुकीचे गणित अधिक गुंतागुंतीचे बनले आहे.

स्वर्गीय अरुणकाका जगताप यांनी या मतदारसंघात राष्ट्रवादीची मजबूत पकड निर्माण केली होती. त्यामुळे जगताप कुटुंबालाच संधी हा भावनिक मुद्दा राष्ट्रवादीसाठी प्रभावी ठरू शकतो. सहानुभूतीची लाट आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील जगताप गटाचा प्रभाव लक्षात घेता पक्षाकडून सचिन जगताप यांचे नाव सर्वाधिक चर्चेत आहे. मात्र केवळ सहानुभूती पुरेशी ठरणार नाही. स्थानिक सदस्यांशी समन्वय, निवडणूक व्यवस्थापन आणि सर्व गटांना एकत्र ठेवण्याची क्षमता हा निर्णायक मुद्दा असणार आहे.

दरम्यान, जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष तथा माजी आमदार चंद्रशेखर घुले हे देखील राष्ट्रवादीतील मजबूत दावेदार मानले जात आहेत. ग्रामीण भागातील त्यांचे मजबूत नेटवर्क आणि

**चर्चेतील उमेदवार**

**राष्ट्रवादी काँग्रेस**
**(अजित पवार गट)**
- सचिन जगताप
- चंद्रशेखर घुले
- सुजित झावरे पाटील
- प्राजक्त तनपुरे

**भाजप**
- डॉ. सुजय विखे पाटील
- महेंद्र गंधे
- भानुदास बेरड
- धनंजय जाधव

**शिवसेना (उबाठा)**
- शशिकांत गाडे
- शंकरराव गडाख

स्थानिक संस्थांवरील प्रभावामुळे त्यांचे नाव गांभीर्याने घेतले जात आहे. दुसरीकडे पारनेरचे राष्ट्रवादी नेते सुजित झावरे पाटील हे युवा चेहरा म्हणून चर्चेत आहेत. यापूर्वीही त्यांनी विधानपरिषद निवडणुकीची तयारी केली होती. ऐनवेळी युवा नेतृत्वाला संधी (पान ४ वर)

### शहरी मतदारांवर मदार

यंदाच्या विधान परिषद निवडणुकीमध्ये जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समितीचे सभापती, भिंगार कंटोन्मेंट बोर्ड सदस्य नसल्याने केवळ अहिल्यानगर महानगरपालिका व जिल्ह्यातील १४ नगरपालिका व नगरपंचायतींच्या शहरी ४५७ मतदारांवर या निवडणुकीची मदार आहे.

### गाजलेल्या निवडणुका...

अहिल्यानगर म्हणजेच पूर्वीचा अहमदनगर स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघ नियमित राज्यात चर्चेत राहिला. शंकरराव कोल्हे व माजी आमदार ज. य. टेकावडे यांच्यातील निवडणूक चांगलीच गाजली होती. त्यानंतर ज्येष्ठ नेते माजी खासदार यशवंतराव गडाख यांना राहात्याच्या ममता पिपाडा यांनी कडवे आव्हान दिले होते. त्यानंतर अरुण काका जगताप या मतदारसंघातून दोनदा विजयी झाले.
२०१० माजी आमदार जयंत ससाणे व पिपाडा यांना पराभूत करून जगताप विजयी झाले. तर २०१६ मध्ये जवळचे नातेवाईक असलेल्या शशिकांत गाडे यांच्याशी झालेल्या थेट सामन्यातही त्यांनी बाजी मारली.

### उमेदवार सर्वांच्या संपर्कातील असावा

स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून मोठा नेता उमेदवार झाल्यास तो जिल्ह्यातील नगरसेवक, कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांशी संपर्क ठेवत नाही.
त्यामुळे सर्वांमध्ये मिसळणारा सर्वांच्या संपर्कातील उमेदवारा असावा अशी भावना जिल्हाभरातील नगरसेवकांची आहे. तांत्रिकदृष्ट्या ही जागा महायुती व महाविकास आघाडीमध्ये कोणाकडे जाते हे महत्त्वाचे असले तरी उमेदवाराची निवड त्यापेक्षा अधिक महत्त्वाची असणार आहे.

## तुकाराम मुंडे यांची अन्न व औषध प्रशासन आयुक्तपदी नियुक्ती

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** आपल्या धडाकेबाज, पारदर्शी आणि कठोर प्रशासकीय शैलीसाठी ओळखले जाणारे वरिष्ठ आयएएस अधिकारी तुकाराम मुंडे यांची अखेर अन्न व औषध प्रशासन विभागाच्या आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. गेल्या दीड

**दिव्यांग कल्याण विभागातील धडक कारवाईनंतर नवे महत्त्वाचे पद; अहिल्यानगर जिल्ह्यातूनही स्वागत**

महिन्यांपासून नव्या नियुक्तीच्या प्रतीक्षेत असलेल्या मुंडे यांना राज्य सरकारने महत्त्वाची जबाबदारी सोपविली असून त्यांच्या नियुक्तीची प्रशासकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे.

अलीकडेच दिव्यांग कल्याण विभागात काम करताना मुंडे यांनी बोगस दिव्यांग संस्था आणि अनियमित कारभारावर मोठ्या प्रमाणात कारवाईचा सपाटा लावला होता. दिव्यांग कल्याणच्या नावाखाली शासनाच्या निधीची होणारी लूट थांबवण्यासाठी त्यांनी कठोर पावले उचलली होती. या कारवाईमुळे अनेक तथाकथित संस्थाचालकांचे धाबे दणाणले होते. विशेष म्हणजे, या मोहिमेची सुरुवात अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा येथील प्रकरणापासून झाल्याची चर्चा प्रशासनात होती. त्यामुळे मुंडे यांच्या कारवाईकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले होते.

मुंडे यांच्या धडक कारभारामुळे नाराज झालेल्या काही संस्थाचालकांनी राजकीय पातळीवर दबाव निर्माण करून त्यांची बदली घडवून आणल्याची चर्चा देखील रंगली होती. दिव्यांग कल्याण विभागातून बदली झाल्यानंतर त्यांच्याकडे मदत आणि पुनर्वसन विभागाची जबाबदारी सोपविण्यात आली होती. मात्र त्या विभागातील विद्यमान प्रशासकीय समीकरणांमुळे ही बदली प्रत्यक्षात लागू होऊ शकली नाही.

दरम्यान, नाशिक कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर मदत आणि पुनर्वसन विभाग अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. केंद्र सरकारकडून येणाऱ्या हजारो कोटी रुपयांच्या निधीचा वापर या (पान ४ वर)

## महत्त्वाचे..

### राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाच्या चर्चेला अखेर फुलस्टॉप!

मुंबई : फुटलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही पक्ष एकत्र येणार असल्याची चर्चा ही महाराष्ट्राच्या राजकारणातला गेल्या काही महिन्यांमधला सर्वात कळीचा मुद्दा राहिला आहे. आता अजित पवारांच्या निधनानंतर या चर्चांनी अधिक जोर धरला. पण अद्यापपर्यंत यावर कुठलाही ठोस हालचाली झालेली नाही. पण यामुळं सामान्य कार्यकर्त्यांच्या मनात मात्र संभ्रमवस्था निर्माण झालेली आहे. यापार्श्वभूमीवर शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी आता विलिनिकरणाचा विषय संपलेला असल्याचं अगदीच स्पष्ट शब्दांत सांगितलं आहे. मुंबईत आज राष्ट्रवादी काँग्रेसची बैठक पार पडली, या बैठकीनंतर पार पडलेल्या पत्रकार परिषदेत शशिकांत शिंदे बोलत होते. शिंदे म्हणाले, मी परत एकदा सांगतो की पक्ष संघटना मजबूत करुन फार मोठ्या उमेदीनं पक्ष पुढे चालू नेण्याम ध्ये सर्वांचा सहभाग असावा. यामध्ये खासदार, आमदार आणि ज्यांनी निवडणुकी लढवलेल्या आहेत, या सर्वांना बरोबर घेऊन सगळ्यांना वेळ देऊन पक्षामध्ये पूर्णपणे ताकदीनं शरद पवारच्या नेतृत्वामध्ये सक्षम विरोधीपक्ष म्हणून राष्ट्रवादीला उभं करण्याबाबत आमची चर्चा होती. अनेक खासदार आमदार आणि पदाधिकाऱ्यांनी यावेळी आपले मुद्दे मांडले.

# तिरळेपणाच्या उपचारादरम्यान चिमुरडीचा मृत्यू!

## दीनानाथ रुग्णालयातील प्रकार

### उच्चस्तरीय चौकशीची खा. नीलेश लंके यांची मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री


**सुपा :** पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात उपचारादरम्यान सहा वर्षीय प्रियांशी बागडे या चिमुरडीचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली असून, या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी खा. नीलेश लंके यांनी केली आहे.

सुपा, ता. पारनेर येथील रहिवासी असलेल्या प्रियांशी बागडे हिला डोळ्यात तिरळेपणाचा त्रास असल्याने शस्त्रक्रियेसाठी दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. रुग्णालय प्रशासनाने सर्व वैद्यकीय तपासण्या आणि अहवाल सामान्य असल्याचे सांगितल्यानंतर पालकांनी डॉक्टरांवर विश्वास ठेवून उपचारास संमती दिली होती.

मात्र शस्त्रक्रियेपूर्वी ऑपरेशन थिएटरमध्ये डोळ्यांत औषधी ड्रॉप टाकल्यानंतर प्रियांशीची प्रकृती अचानक गंभीररीत्या बिघडली. तिला रक्ताच्या उलट्या सुरू झाल्यानंतर तातडीने आयसीयूमध्ये हलवण्यात आल्याचे सांगण्यात आले. या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान पालकांना योग्य माहिती देण्यात आली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

खासदार नीलेश लंके यांनी या घटनेबाबत तीव्र संताप व्यक्त करत अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. सर्व अहवाल सामान्य असताना अशी गंभीर परिस्थिती कशी झाली, ऑपरेशनपूर्वी आवश्यक वैद्यकीय प्रोटोकॉलचे पालन झाले होते का, प्रकृती बिघडत असताना पालकांना वेळेवर माहिती का देण्यात आली नाही, तसेच उपचार प्रक्रियेत निष्काळजीपणा झाला का? याची सखोल चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

दरम्यान, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, प्रियांशी बागडे हिला न्याय मिळावा, अशी मागणी विविध स्तरांतून होत आहे.



**■ दोषींवर कठोर कारवाई करा**

**एका निष्पाप चिमुरडीचा जीव गेला आहे. त्यामुळे हे प्रकरण अत्यंत गांभीर्याने घेऊन सरकार आणि आरोग्य विभागाने तातडीने उच्चस्तरीय चौकशी करावी. दोषी आढळणाऱ्या डॉक्टर, कर्मचारी किंवा रुग्णालय प्रशासनावर कठोर कारवाई करण्यात यावी.**

**– खा. निलेश लंके**

# महिलांवर दगडफेक

## रामपूर-नाऊर ग्रामस्थ आक्रमक, वाळू उपशाविरोधात विशेष ग्रामसभा गाजली



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** तालुक्यातील रामपूर – कोकरे परिसरातील गोदावरी नदीपात्रातील वाळूपट्ट्याच्या लिलावाविरोधात ग्रामस्थांनी तीव्र आक्रमक भूमिका घेतली असून, दोन दिवसापूर्वी महिलांवर झालेल्या कथित दगडफेकीच्या घटनेनंतर रामपूर व नाऊर येथे झालेल्या विशेष ग्रामसभांमध्ये संतप्त भावना व्यक्त करण्यात आल्या. महिलांनी रणरागिणीचा अवतार धारण करत वाळूचा रस्ता होऊ देणार नाही, तसेच नदीपात्रातील वाळूचा एक खडादेखील उचलू देणार नाही, असा स्पष्ट निर्धार व्यक्त केला.

तालुक्यातील रामपूर येथे आयोजित विशेष ग्रामसभेला मोठ्या संख्येने महिला,शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.यावेळी महिलांनी आक्रमक भूमिका घेत वाळू उपसा व वाहतुकीला ठाम विरोध दर्शविला. (पान ४ वर)

**तरी, गुन्हा दाखल नाही**

**महिलांवर वाळू तस्काराकडून हल्ले होत असताना कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल नसल्याचे सांगितले जाते.याबाबत घटनेबाबत आश्चर्य व्यक्त केले जात आहेत.केवळ काहीतरी सेटलमेंट करण्यातच हे दोन्ही विभाग असल्याचे असा आरोप ग्रामस्थांनी केला आहेत.**

# पुण्यातून होत होती लिंगनिदानाच्या पोर्टेबल मशीनची विक्री!

- **वडगाव मावळ येथून आणखी एक मशीन जप्त**
- **वैद्यकीय पदवी नसतानाही गर्भलिंग तपासण्या सुरू**

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** राज्यभर खळबळ उडवून देणाऱ्या बेकायदेशीर लिंगनिदान आणि गर्भपात प्रकरणात लोणी पोलीस आणि श्रीरामपूर अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या पथकाने आणखी एक महत्त्वाची कारवाई केली आहे. या प्रकरणातील तपास अधिक व्यापक होत असून, आतापर्यंत १६ आरोपींना अटक करण्यात आली आहे.



तपासादरम्यान पुणे येथून अटक करण्यात आलेल्या तीन आरोपींकडे बारकाईने चौकशी करण्यात आली असता त्यांनी आणखी एका व्यक्तीस लिंगनिदानासाठी वापरले जाणारे सोनोग्राफीचे पोर्टेबल मशीन विकल्याची कबुली दिली होती.

या माहितीच्या आधारे लोणी पोलीस स्टेशन आणि अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालय श्रीरामपूर येथील (पान ४ वर)

**■ या संपूर्ण कारवाईबाबत श्रीरामपूरचे अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास अत्यंत गांभीर्याने सुरू असल्याचे सांगण्यात आले. पोलिसांनी स्पष्ट केले की, हा केवळ कायद्याचा विषय नसून सामाजिक जबाबदारीचाही प्रश्न आहे. मुलींच्या जन्मदरावर परिणाम करणाऱ्या अशा बेकायदेशीर कृत्यांविरोधात कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशाराही पोलिस प्रशासनाने दिला आहे.**

# औषध हे उपचार की बाजारात विकले जाणारे उत्पादन?

२० मे रोजी देशभरातील मेडिकल स्टोअर्स बंद राहिली आणि अनेकांना पहिल्यांदाच औषध दुकानाचे खरे महत्त्व तीव्रतेने जाणवले. किराणा दुकान बंद असेल तर पर्याय शोधता येतो, कपड्यांचे दुकान बंद असेल तर खरेदी पुढे ढकलता येते; पण मेडिकल दुकान बंद असेल तर प्रश्न थेट आरोग्याशी आणि अनेकदा जीवाशी जोडला जातो. त्यामुळे हा बंद केवळ व्यापारी आंदोलन नव्हता, तर भारतीय आरोग्य व्यवस्थेत वेगाने घडणाऱ्या बदलांविरोधातील एक गंभीर इशारा होता.

एक काळ असा होता की परिसरातील केमिस्ट हा केवळ दुकानदार नव्हता, तर लोकांच्या विश्वासाचा आधार होता. डॉक्टरांचे अवघड हस्ताक्षर समजून औषध देणारा, रात्री-अपरात्री रुग्णासाठी दुकान उघडणारा, औषधांच्या डोसची माहिती देणारा आणि तातडीच्या प्रसंगी मदतीला धावून येणारा तो आरोग्य व्यवस्थेतील शांत सैनिक होता. कोरोनाच्या काळात तर या केमिस्टांनी जीव धोक्यात घालून समाजासाठी काम केले. रस्ते ओस पडले होते, भीतीचे वातावरण होते; पण मेडिकल स्टोअर्सचे दिवे सुरू होते. त्या काळात समाजाने त्यांना फ्रंटलाइन वॉरियर्स म्हटले. आज तेच केमिस्ट आपल्या अस्तित्वासाठी रस्त्यावर उतरले आहेत, ही बाब आरोग्य व्यवस्थेतील अस्वस्थतेची गंभीर खूण आहे.

या आंदोलनामागील सर्वात मोठा मुद्दा म्हणजे ऑनलाइन औषध विक्रीचा वाढता प्रभाव. आज मोबाईलवर एका क्लिकमध्ये औषध घरपोच मिळते. मोठमोठ्या सवलती, ५० टक्के डिस्काउंट आणि झटपट सेवा यामुळे ग्राहक आकर्षित होतात. डिजिटल सुविधा आणि तंत्रज्ञानाचा वापर हा काळाची गरज आहे, यात शंका नाही. परंतु औषध ही सामान्य बाजारातील वस्तू नाही. औषध म्हणजे उपचार, जबाबदारी आणि चुकीच्या वापरामुळे जीवघेणा धोका निर्माण करणारी संवेदनशील गोष्ट आहे.

केमिस्ट संघटनांचा मुख्य आक्षेप हाच आहे की काही ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर नियमांचे काटेकोर पालन होत नाही. डॉक्टरांचे प्रिस्क्रिप्शन व्यवस्थित तपासले जात नाहीत, फार्मासिस्ट पडताळणी अपुरी




असते आणि काही वेळा कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून बनावट प्रिस्क्रिप्शन तयार केली जात असल्याच्या तक्रारी आहेत. सर्वात धोकादायक बाब म्हणजे अँटिबायोटिक्स, मानसिक ताणावरील औषधे, झोपेच्या गोळ्या आणि व्यसनाधीन औषधांची सहज उपलब्धता. आज अनेक तरुण डॉक्टरांचा सल्ला न घेता थेट ऑनलाइन औषध मागवतात. ही सवय भविष्यात गंभीर आरोग्य संकट निर्माण करू शकते.

विशेषत: अँटिबायोटिक्सचा

**संपादकीय**

अनियंत्रित वापर हा संपूर्ण जगासाठी चिंतेचा विषय बनला आहे. ताप, सर्दी किंवा किरकोळ त्रास झाला की स्वतःच औषध घेण्याची प्रवृत्ती वाढत आहे. यामुळे 'अँटिमायक्रोबियल रेझिस्टन्स' अर्थात एएमआरचा धोका वाढतो आहे. साध्या भाषेत सांगायचे तर भविष्यात अनेक आजारांवर औषधे काम करेनाशी होऊ शकतात. आज सवलतीत मिळणारी औषधे उद्या निष्प्रभ ठरली, तर त्याची किंमत संपूर्ण समाजाला मोजावी लागेल.

या आंदोलनातून आणखी एक महत्त्वाचा मुद्दा समोर येतो - फार्मासिस्टच्या भूमिकेचे कमी होत चाललेले महत्त्व. मेडिकल दुकानात उभा असलेला प्रशिक्षित फार्मासिस्ट हा केवळ गोळ्या विकणारा दुकानदार नसतो. कोणते औषध कसे घ्यायचे, कोणत्या औषधांचा एकत्रित परिणाम धोकादायक ठरू शकतो, कोणता डोस चुकीचा आहे, याची माहिती देणारा तो रुग्ण आणि औषध यांच्यातील सुरक्षा कवच असतो. ऑनलाइन व्यवहारांमध्ये हा मानवी संवाद हरवत चालला आहे.

दुसरीकडे छोट्या शहरांतील आणि गावांतील केमिस्टची परिस्थितीही गंभीर आहे. मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांची आर्थिक ताकद, प्रचंड जाहिरातबाजी आणि आक्रमक सवलतींच्या स्पर्धेत छोटा मेडिकल दुकानदार टिकणे कठीण होत आहे. ही केवळ व्यापारातील स्पर्धा नाही; तर असमान व्यवस्थेविरुद्धची लढाई आहे. एकीकडे भांडवलशक्ती आणि तंत्रज्ञान, तर दुसरीकडे स्वतःचा छोटासा व्यवसाय टिकवण्यासाठी झगडणारा स्थानिक केमिस्ट - हे वास्तव दुर्लक्षित करता येणार नाही.

तथापि, या आंदोलनाकडे पाहताना ग्राहकांचाही विचार करावा लागेल. औषधे ही चैनीची वस्तू नाहीत. अनेक रुग्णांसाठी ती जीवनावश्यक गरज असते. त्यामुळे कोणतेही आंदोलन करताना अत्यावश्यक सेवा पूर्णपणे ठप्प होणार नाहीत, याची जबाबदारीही संबंधित संघटनांवर असते. कारण शेवटी केमिस्ट आणि ग्राहक यांचे नाते हे संघर्षाचे नसून विश्वासाचे आहे.

आज गरज आहे ती संघर्ष तीव्र करण्याची नाही, तर संतुलित धोरणाची. डिजिटल सुविधा रोखता येणार नाहीत आणि त्या आवश्यकही आहेत. ग्रामीण भागातील रुग्णांसाठी ऑनलाइन सेवा काही प्रमाणात उपयुक्त ठरू शकतात. परंतु या सेवांवर कठोर नियंत्रण, फार्मासिस्ट पडताळणी, डॉक्टरांच्या वैध प्रिस्क्रिप्शनची खात्री आणि संवेदनशील औषधांच्या विक्रीवर कठोर नियम असणे अत्यावश्यक आहे.

सरकारनेही केमिस्टांच्या आंदोलनाकडे केवळ व्यापारी मागण्या म्हणून न पाहता, आरोग्य व्यवस्थेच्या व्यापक संदर्भात पाहण्याची गरज आहे. कारण मेडिकल दुकानावर पडलेले कुलूप हे फक्त एका शटरवरचे कुलूप नसते; ते आरोग्य व्यवस्थेतील वाढत्या अस्वस्थतेचे प्रतीक असते.

२० मेचा बंद एक दिवसाचा असेल. दुकानं पुन्हा उघडतील, व्यवहार पुन्हा सुरू होतील. पण या आंदोलनाने देशासमोर जो प्रश्न उभा केला आहे, तो अधिक गंभीर आहे - औषध हे उपचार राहणार की बाजारात विकले जाणारे आणखी एक उत्पादन बनणार? याचे उत्तर आता सरकार, आरोग्य व्यवस्था आणि समाज या तिघांनाही मिळून शोधावे लागणार आहे.

# उन्हाच्या तडाख्यात जनगणनेचा ध्यास
## शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची घराघरांत पायपीट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनगाव :** मे महिन्याच्या कडक उन्हाने ग्रामीण भाग होरपळत असतानाच केंद्र सरकारच्या जनगणना अभियानासाठी सोनगाव परिसरातील शिक्षक, शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचारी अक्षरशः जीवाचे रान करत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. सोनगाव, धानोरे, सात्रळ, हनुमंतगाव, पाथरे तसेच परिसरातील दुर्गम वाड्या-वस्त्यांवर घरोघरी जाऊन कुटुंबांची माहिती नोंदविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून, शासनाच्या या महत्त्वपूर्ण मोहिमेला ग्रामीण भागातून मोठा प्रतिसाद मिळत आहे.




दुपारच्या रणरणत्या उन्हातही प्राथमिक व माध्यमिक शाळांतील शिक्षक गावोगावी फिरत आहेत. अनेक ठिकाणी वाहनांची सुविधा नसल्याने कर्मचारी पायपीट करत दुर्गम वस्त्यांपर्यंत पोहोचत आहेत. प्रत्येक घरात जाऊन कुटुंबातील सदस्यसंख्या, शिक्षण, व्यवसाय, सामाजिक स्थिती, आर्थिक माहिती यासह विविध बाबींची बारकाईने नोंद घेतली जात आहे. उन्हाचा वाढता तडाखा, वेळेची मर्यादा आणि खडतर परिस्थिती असूनही कर्मचारी कर्तव्यपूर्तीत कोणतीही कसूर ठेवत नसल्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे.

देशाच्या भविष्यातील विकास आराखड्यासाठी जनगणना हा अत्यंत महत्त्वाचा आधार मानला जातो. शासनाच्या विविध योजना, निधी वाटप, लोकसंख्येचे नियोजन आणि ग्रामीण विकासाच्या धोरणांसाठी या माहितीचा उपयोग होणार असल्याने प्रशासनाने अचूक माहिती संकलनावर विशेष भर दिला आहे. त्यामुळे प्रत्येक घरापर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट ठेवून कर्मचारी काम करत आहेत.

ग्रामीण भागातील शिक्षक केवळ शिक्षणापुरते मर्यादित न राहता प्रत्येक शासकीय मोहिमेत पुढाकार घेत असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. निवडणुका, लसीकरण मोहीम, आरोग्य सर्वेक्षण, आपत्ती व्यवस्थापन यांसारख्या जबाबदाऱ्यांनंतर आता जनगणना अभियानातही शिक्षकांनी महत्त्वाची भूमिका उचलली आहे. शिक्षक हा समाजाचा आधारस्तंभ असल्याची प्रचिती या मोहिमेतून पुन्हा दिसून येत आहे.

दरम्यान, नागरिकांकडूनही जनगणना कर्मचाऱ्यांना चांगले सहकार्य मिळत आहे. अनेक गावांमध्ये नागरिक स्वतःहून माहिती देण्यासाठी पुढे येत असून, अभियान यशस्वी करण्यासाठी मदत करत आहेत. प्रशासनाच्या वतीने नागरिकांना अचूक माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

उन्हाच्या झळा सहन करत गावोगावी फिरणाऱ्या शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या या कार्याबद्दल परिसरातून कौतुक व्यक्त होत असून, कर्तव्यपूर्तीसाठी झटणारे खरे शिलेदार अशी भावना ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात आहे.

# द्रोणाच्या विद्यार्थ्यांचे स्कॉलरशिपमध्ये नेत्रदीपक यश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** राहाता तालुक्यातील अशोकराव दामोधर दंडवते पाटील ग्रामीण शैक्षणिक प्रतिष्ठानच्या द्रोणा स्कूल मधील विद्यार्थ्यांचे स्कॉलरशिप परीक्षेमध्ये नेत्रदीपक यश मिळाले आहे. त्यामध्ये विद्यार्थी नावे

इयत्ता पाचवीतील विद्यार्थी १ आदिती संदीप मते,२ अर्णव दीपक मोकळ, ३ कार्तिक गोकुळ गोरे, ४ रुद्रम दादासाहेब कलांगडे, ५ स्मितांजली दत्तात्रय जाधव, ६ स्वानंदी सुधीर आरणे, ७ तनिष्का विनोद प्रेमानी, ८ युसरा शेफुद्दीन शेख इयत्ता आठवीतील विद्यार्थी १ पूजा बाबुलाल कलवानिया,२ आदिती वामन पवार, ३ अभिषेक विकास कर्पे, सर्व विद्यार्थींनी प्रथम श्रेणी मिळवली आहे.

संस्थेचे अध्यक्ष जयराज दंडवते, संचालिका प्राजक्ताताई दंडवते, उपाध्यक्ष अनुप दंडवते, प्राचार्या अनिता रोहोम, शिक्षक, शिक्षिका यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



# नायगाव येथे पाच शेतकऱ्यांच्या केबल चोरीला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** - तालुक्यातील नवे नायगाव परिसरात शेतातील मोटारीच्या विद्यूत केबली चोरीच्या घटना वाढल्या असून, अज्ञात चोरट्यांनी एकूण पाच शेतकरी वर्गाच्या केबल चोरून नेल्याची घटना समोर आली आहे.या चोरीमध्ये एकूण ४१ हजार २०० रुपयांचे नुकसान झाल्याचे तालुका पोलिसांत नोंद करण्यात आली.याप्रकरणी शेतकरी उत्तम भाऊसाहेब राशिनकर यांनी तक्रार दिली.त्यांची गट ८८ मध्ये पिकांना पाणी देण्यासाठी गोदावरी नदीपात्रात ५ एचपीची मोटार बसवून अंदाजे १७५ फुट लांब केबल जोडण्यात आली होती.चोरीला गेल्याची घटना घडली. अन्य चार शेतकऱ्याच्या केबली चोरी गेल्याने याप्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलिसांत अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात करण्यात आला.विशेष म्हणजे एकाच ठिकाणी केबल चोरीचे प्रकार घडल्याने शेतकऱ्यामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

# ५७ महाराष्ट्र बटालियन एनसीसीच्या वार्षिक शिबिराची उत्साहात सांगता

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी :** कोपरगाव तालुक्यातील कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटी संचालित गौतम पब्लिक स्कूलमध्ये केंद्र व राज्य सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने सीएटीसी २०७/५७ महाराष्ट्र बटालियन एनसीसी वार्षिक ट्रेनिंग कॅम्प ११ ते २० मे या कालावधीत अत्यंत उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात संपन्न झाला.

या १० दिवसीय शिबिरामध्ये संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यातील २८ शाळांतील इयत्ता ८ वी व ९ वी आणि १५ कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता ११ वी व १२ वी आणि महाविद्यालयातील एनसीसीचे एकूण ४०२ विद्यार्थी सहभागी झाले असून यामध्ये २६२ मुले आणि १४० मुलींचा समावेश होता.

या संपूर्ण शिबिरादरम्यान घेण्यात आलेल्या विविध स्पर्धा आणि लष्करी प्रशिक्षणात उत्कृष्ट कामगिरी बजावत गौतम पब्लिक स्कूलच्या अल्फा कंपनीने जनरल चॅम्पियन ट्रॉफीवर आपले नाव कोरले. यावेळी विद्यार्थ्यांना सुभेदार मेजर राजेंद्र सिंग, सुभेदार राजू भालेराव, हवालदार नितीन आणि सी.टी.




ओ.इसाक सय्यद यांनी प्रशिक्षण दिले.

या ट्रेनिंग कॅम्पमध्ये विद्यार्थ्यांना व्यायाम, परेड, रायफल चालविणे प्रशिक्षण, नकाशा वाचन, जर्निंग डीस्टंन्स, फिल्ड ग्राम, हेल्थ आणि आयजीन या विषयांचे प्रशिक्षण दिले गेले. तसेच सेंन्ट्रल लेक्चरमध्ये आगीपासून बचाव करणे, वन विभागाच्या माध्यमातून जंगलातील प्राण्यांची ओळख आणि प्राण्यांच्या हल्ल्यातील प्राथमिक उपचार प्रशिक्षण, परिवहन विभागाकडून आपत्कालीन वाहतूक नियम आणि वाहन चालवण्याचे प्रशिक्षण ही दिले आहे. देशात राज्यात अचानक उद्भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीत किंवा नैसर्गिक आपत्तीत नागरिकांची सुरक्षा आणि बचाव करण्यासाठी या ट्रेनिंग कॅम्पचे केंद्र शासनाकडून आयोजन करण्यात आले असून हे सर्व विद्यार्थी आता कोणत्याही नैसर्गिक आपत्तीला सामोरे जाऊ शकतात आणि नागरिकांची रक्षा करू शकतात असा विश्वास कॅम्प कमांडर कर्नल आशिष रैना यांनी व्यक्त केला.

शिबिरादरम्यान प्रशिक्षणाची पाहणी करण्यासाठी संभाजीनगर येथील ब्रिगेडियर ए. आर. बारबरे यांनी संपूर्ण दिवस विद्यार्थ्यांसोबत घालवत त्यांना प्रशिक्षण दिले. ब्रिगेडियर बारबरे यांनी शालेय परिसर, तिथे उपलब्ध असलेल्या उत्तम सुविधा आणि शिबिराच्या उत्कृष्ट नियोजनाचे भरभरून कौतुक केले. तसेच हे शिबिर यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी मोलाचे सहकार्य केल्याबद्दल त्यांनी आमदार आशुतोष काळे, संस्थेच्या सचिव चैतालीताई काळे, प्राचार्य नूर शेख व संपूर्ण गौतम परिवाराचे विशेष आभार व्यक्त केले. या प्रशिक्षण शिबिराची सांगता विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाने आणि पारितोषिक वितरणाने झाली. .

# कोल्हार - लोणी रस्ता बनला मृत्यूचा सापळा
## रस्ता रुंदीकरणासाठी शेकडो झाडांची कत्तल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोल्हार :** कोल्हार -लोणी रस्त्याचे काम सध्या सुरू असून या रस्ता दुरुस्ती कामामुळे या रस्त्यावर टाकण्यातआलेली खडी, साईड गटारासाठी खोदलेले खड्डे, साईड पट्ट्याच्या ठिकाणी टाकलेले मुरमाचे ढीग रस्ता रुंदीकरणासाठी केलेली झाडांची कत्तल व या झाडांच्या रस्त्यावर पडलेल्या फांद्या,वाहने चालू असताना उडत असलेली प्रचंड धूळ या सर्व कारणामुळे कोल्हार लोणी रस्ता सध्या वाहन चालकांसाठी मृत्यूचा सापळा बनला असून या रस्त्यावरून दुचाकीस्वार व इतर छोटी मोठी वाहने चालवताना वाहन चालकांना मोठी कसरत करून रस्ता पार करावा लागत असल्याने वाहनचालकांमध्ये संतप्त



कोल्हार लोणी रस्त्यावर टाकलेली खडी साईड पट्ट्या वर असलेले मुरमाचे ढीग व साईड गटारासाठी खोदून ठेवलेले रस्ते यामुळे कोल्हार लोणी रस्ता सध्या वाहनधारकांसाठी मृत्यूचा सापळा बनला आहे. (छाया- गणेश कुंभकर्ण )

प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

चार सहा महिन्यापूर्वी अगदी गुळगुळीत असलेला हा रस्ता रस्ता रुंदीकरण व दुरुस्तीच्या कामासाठी खोदून ठेवल्यामुळे वाहन चालकांसाठी अत्यंत त्रासदायक बनला असून या रस्त्यावरून अतिशय धीमे गतीने वाहन चालक चालत असताना देखील या रस्त्याच्या कामामुळे या कोल्हार लोणी रस्त्यावर अलीकडच्या काळात अनेक छोटे-मोठे अपघात होऊन अनेकांना अपंगत्व आले असून काही निष्पाप बळी या अपघातात गेले आहे अनेकांना पाठीच्या मणक्याचे त्रास तसेच प्रचंड धुळीमुळे डोळ्यांची जळजळ होणे फुफुसाचे आजार आदी आजारांचा सामना वाहनचालकाला करावा लागत आहे रस्ता रुंदीकरणाचे काम अतिशय धीमे गतीने सुरू असून या रस्ता रुंदीकरणाच्या काम वेगाने व दर्जेदार व्हावे अशी मागणी देखील वाहन चालक करीत आहे. आठवड्यापूर्वीच साईड गटारीसाठी खोदून ठेवलेल्या खड्ड्यात एक बारामती कडे निघालेल्या ट्रक पलटी होऊन चालक गंभीर जखमी झाला असल्याची घटना घडली होती त्यामुळे या कोल्हार लोणी रस्त्यावर सुरक्षितता म्हणून संबंधित खात्याने उपाय योजना करावी म्हणजे अपघाताचे प्रमाण कमी होईल.

# शिर्डीच्या मुख्याधिका-यांनी लक्ष्मीनगर पाडल्याच्या निषेधार्थ जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** येथील लक्ष्मीनगरमध्ये राहणाऱ्या नागरिकांना महाराष्ट्र शासनाने भूमिहीन म्हणून सन १९७५ मध्ये घरकुल योजनेतुन घरे दिलेली असताना शिर्डीच्या मुख्याधिका-यांनी या गरिबांची घरे मार्च २०२६ मध्ये बुल्डोजरने पाडल्याच्या निषेधार्थ डॉ.राजेंद्र पिपाडा यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिका-यांची भेट घेवुन संबंधीतांवर कारवाई करून मूळ जागेवर महाराष्ट्र शासनाने दि. २५ मार्च २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार ७/१२ उतारा देण्याची मागणी जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांच्याकडे केली.

यावेळी डॉ पिपाडा यांचे समवेतश रामा पुंजा भोर , विलास ठकाजी उपाध्ये, सुरेश




बाजीराव देवरे, सोमनाथ गणपत गुठळे, रत्नाकर बाबुराव वाकचौरे आदी नागरिक उपस्थित होते

निवेदनात म्हटले आहे की, लक्ष्मीनगर परिसरातील अनेक कुटुंबे मागील ५ वर्षापासुन त्या जागेवर वास्तव्यास असून महाराष्ट्र शासनाने त्यांना भूमिहीन व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक म्हणून मान्यता देत सन १९७५ मध्ये घरकुल योजने अंतर्गत घरे उपलब्ध करून दिली होती. त्यामुळे त्याठिकाणी त्यांचे अतिक्रमण नव्हते. तरीही कायदे धाब्यावर बसवुन त्यांची घरे पाडुन बेघर करण्यात आले.यापैकी काही नागरिकांना इतरत्र जागा देवु असे आमिष दाखवुन त्यांच्याकडुन आपण स्वखुशीने अतिक्रमण काढीत आहोत असे बळजबरीने लिहुन घेतले. या मानसिक धक्क्याने दोन महिन्यात ७/८ जण दगावली असल्याचे चर्चेदरम्यान जिल्हाधिका-यांना शिर्डीतुन लक्ष्मीनगर येथुन आलेल्या शिष्टमंडळाने सांगितले.

फौजदारी दाखल करा : डॉ पिपाड शिर्डी मतदारसंघात १ वर्षापासुन अतिक्रमण काढण्याच्या नावाखाली सुडबुद्धीने शासकीय जागेवरील गोरगरिबांची घरे पाडण्याचा धडाका सुरु होता. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत २०११ च्या पुर्वी ज्या सरकारी जागेवर अतिक्रमण नियमित करण्याचा ऐतिहासिक निर्णय मुख्यमंत्र्यांनी घेतला. परंतु शिर्डी मतदार संघात त्याची अंमलबजावणी सुरु झाली नसून, भूमिहीनांना दिलेली घरे उद्धस्त करुन बेघर करणा-यांवर फौजदारी स्वरुपाची कारवाई करणे गरजेचे आहे.

# आदर्श समाजसेवक पुरस्काराने पवार सन्मानित

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान** - येथील माजी सभापती नानासाहेब पवार यांना नुकतेच आदर्श समाजसेवक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. कोपरगाव तालुक्यातील सोनेवाडी जि. प. प्राथमिक शाळेच्या शताब्दी महोत्सव सोहळ्यानिमित्त माजी सभापती नानासाहेब पवार यांना आदर्श समाजसेवक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी महंत उद्धव महाराज मंडलिक यांच्या हस्ते पवार यांनापुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. पवार यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे नितीन औताडे, राघवेश्वर महाराज, राजेश परजणे, नानासाहेब तुवर, रमेश धुमाळ, माजी सरपंच चित्रसेन रणनवरे, माजी चेअरमन राहुल पटारे, सुधीर मगर, विकास मगर शिवाजीराव धुमाळ, बाळासाहेब शेळके, अशोक धोत्रे आदींनी कौतुक केले.



# सोनगाव येथे प्रवरेच्या कृषीकन्यांचे आगमन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लोणी :** राहुरी तालुक्यातील सोनगाव येथे कृषी महाविद्यालय ,लोणी येथील कृषीकन्यांचे आगमन झाले आहे. यावेळी शेतकऱ्यांनी या कृषीकन्यांचे स्वागत केले.

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे व महात्मा फुले कृषी विद्यापीठ संलग्नित कृषी महाविद्यालय, लोणी येथे या विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत. संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रेरणेने संस्थेच्या मुख्य कार्यकारी आधिकारी डॉ.सुस्मिता विखे पाटील आणि कृषी शिक्षण संचालक डॉ. उत्तमराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली व कृषी महाविद्यालय लोणीचे प्राचार्य डॉ. अमोल खडके , कार्यक्रम




समन्वयक डॉ. रमेश जाधव, कार्यक्रम अधिकारी डॉ. विक्रम अनाप आणि प्रा. अक्षया वाळुंज यांच्या सूचनेनुसार कृषीकन्या श्रद्धा सावंत, दिशा विखे, मेरगळ गौरी मेरगळ, निलम रोडे, कोमल गावडे हे सोनगाव येथील शेतकऱ्यांचे अनुभव जाणून घेत त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. याप्रसंगी ग्रामपंचायत सोनगावच्या सरपंच सौ. अलकाताई शिंदे,उपसरपंच एजाज तांबोळी, ग्रामविकास अधिकारी पटेल एच. वाय., ग्रामपंचायत कर्मचारी श्री. सिताराम शिंदे, ग्रामस्थ रोहिदास कानडे , विजय अनाप, विकास अनाप व इतर ग्रामस्थ यांनी स्वागत केले.

कृषी शिक्षणाच्या माध्यमातून ह्या कृषीकन्या येथील शेतकऱ्यांना सदर कार्यक्रमांतर्गत विद्यार्थी ग्रामीण जीवन आणि कृषी तंत्रज्ञान, कीड व रोग ओळख, एकात्मिक व्यवस्थापन यांची माहिती शेतकऱ्यांनपर्यंत प्रात्यक्षिकाद्वारे पोहोचवण्याचा प्रयत्न करणार आहे.

# अजितदादा पॉलिटेक्निकल कॉलेजला सुविधा केंद्रास मान्यता

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी डिप्लोमा इंजिनिअरिंग प्रवेश प्रक्रियेस सुरुवात झाली असून अजितदादा पवार कॉलेज ऑफ पॉलीटेक्नीक, वडाळा महादेव येथे सुविधा केंद्रास मान्यता मिळाली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रिया अधिक सुलभ होणार आहे.

महाविद्यालयात ऑनलाईन अर्ज नोंदणी, कागदपत्र पडताळणी, अर्ज कन्फर्मेशन, मेरीट मार्गदर्शन, ऑप्शन फॉर्म भरणे तसेच कॅप राऊंड प्रक्रियेसाठी अधिकृत सहाय्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. २० मे ते २२ जून २०२६ या कालावधीत ही प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याची माहिती प्राचार्या पी. व्ही. बोधक यांनी दिली. पॉलीटेक्नीक प्रवेशासाठी कोणत्याही प्रवेश परीक्षा किंवा सीईटीची आवश्यकता नसून विद्यार्थ्यांना गुणांच्या आधारे प्रवेश दिला जाणार आहे. तसेच प्रथम व थेट द्वितीय वर्षासाठी केंद्रीय प्रवेश प्रक्रियेतून प्रवेश घेणाऱ्या सर्व प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शासनाच्या शिष्यवृत्ती योजनेंतर्गत मोफत प्रवेशाचा लाभ मिळणार आहे. प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे व सविस्तर माहितीसाठी विद्यार्थ्यांनी सुविधा केंद्र प्रमुख प्रा. सुनिल खिलारी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब पवार यांनी केले आहे.

# तरुणावर चॉपरने वार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** राहुरी तालुक्यातील वांबोरी येथे गाडीने कट मारल्याचा जाब विचारल्याच्या कारणावरून एका तरुणाला शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. तसेच चॉपरने वार करून जखमी करत त्याच्या गळ्यातील सोन्याची चैन हिसकावल्याची घटना १६ मे रोजी दुपारी घडली. गणेश मच्छिंद्र कुसमुडे (वय २४, रा. वांबोरी) यांनी राहुरी पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, ते मित्र रोहित देवकर याच्यासह केएसबी चौक परिसरात उभे होते. त्यावेळी छोटा हत्ती वाहन चालक अक्षय पागिरे हा मोबाईलवर बोलत भरधाव वेगाने आला व रोहित देवकर याला कट मारला. याबाबत जाब विचारल्याने आरोपीने रागाच्या भरात शिवीगाळ केली व इतर साथीदारांना बोलावून घेतले. त्यानंतर आरोपींनी गणेश कुसमुडे व रोहित देवकर यांना मारहाण केली. तसेच चॉपरने वार करून जखमी केले. यावेळी गणेश यांच्या गळ्यातील पाच ग्रॅम सोन्याची चैन जबरदस्तीने काढून घेतली व जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी राहुरी पोलिस ठाण्यात चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# रस्त्याचे काम की प्रवाशांच्या जीवाशी खेळ?

## शिर्डी–पुणे राज्यमार्गाच्या संथ कामामुळे पानोडी–शिबलापूर ग्रामस्थ आक्रमक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**आश्वी** : शिर्डी ते पुणे या नव्यानं मंजूर झालेल्या राज्य मार्ग ६७ मधील राहाता ते पानोडी घाट पायथा या ३६ किलोमीटर रस्त्याच्या कामाला सुरुवात होऊन एक वर्ष उलटले आहे. मात्र, प्रशासकीय दिरंगाई आणि कंत्राटदाराच्या धिम्म्या गतीने हे काम प्रवाशांच्या जीवावर बेतत आहे.

निष्काळजीपणाने आणि असुरक्षित पद्धतीने सुरू असलेल्या या कामामुळे परिसरात अपघातांचे प्रमाण वाढले असून, धुळीच्या साम्राज्यामुळे ग्रामस्थ व प्रवाशांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शिबलापूर ते पानोडी घाट या दरम्यानचा रस्ता खोदून आता वर्ष पूर्ण होत आले आहे. मात्र, रस्ता पूर्ण करण्याऐवजी तो तसाच अर्धवट अवस्थेत ठेवल्याने वाहनधारकांना कसरत करावी लागत आहे. या खडबडीत रस्त्यामुळे दुचाकीसह छोट्या–मोठ्या गाड्यांचे सुटे भाग ढिले होऊन गाड्या 'खिळखिळ्या' झाल्या आहेत. रस्ता लवकर पूर्ण करायचा नव्हता, तर मग तो खोदून का ठेवला? असा संतप्त सवाल आता नागरिक विचारत आहेत. पानोडी येथील काळूबाईच्या ओढ्यावरील पुलाचे काम गेल्या ४ ते ५ महिन्यांपासून संथ गतीने सुरू आहे.

पुलाच्या कामामुळे जो पर्यायी वळण रस्ता (डायव्हर्शन) बनवण्यात आला आहे, तो अत्यंत अरुंद आणि धोकादायक आहे. रात्रीच्या वेळी रस्त्याचा अंदाज न आल्याने अनेक गाड्या ओढ्यात आणि नाल्यात कोसळल्याच्या घटना घडल्या आहेत. सुदैवाने अद्याप मोठी जीवितहानी झाली नसली तरी, या ठिकाणचे अपघातांचे सत्र थांबण्याचे नाव घेत नाहीये. रस्त्याचे काम रेंगाळल्याने परिसरात धुळीचे लोट उसळत आहेत.

यामुळे रस्त्याकाठी राहणाऱ्या रहिवाशांना श्वास घेण्यास त्रास होत असून घरांमध्ये धुळीचे थर साचत आहेत. प्रवाशांना डोळ्यांचे आणि घशाचे विकार जडत आहेत. सुरक्षिततेचे कोणतेही नियम न पाळता काम सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या प्रकरणाची दखल घेत पानोडी आणि शिबलापूर येथील ग्रामस्थांनी आता आक्रमक पवित्रा घेतला आहे. या खराब रस्त्यामुळे ज्यांच्या गाड्यांचे नुकसान झाले आहे आणि ज्यांचे अपघात झाले आहेत, त्यांना कंत्राटदाराने किंवा संबंधित विभागाने भरपाई द्यावी, अशी मागणी करण्यात येत आहे. तसेच, हा रस्ता तातडीने पूर्ण करावा, अन्यथा रस्ता अडवून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आला आहे. आता सार्वजनिक बांधकाम विभाग यावर काय पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## द•ख•ल

### प्राचार्य डॉ.गणी पटेल यांना शब्दगंध जीवन गौरव पुरस्कार जाहीर



**श्रीरामपूर** : तालुक्यातील लाडगाव येथील मूळचे रहिवासी असलेले जेष्ठ पत्रकार, साहित्यिक व माजी प्राचार्य डॉ. गणी पटेल यांना शब्दगंध जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला असून शनिवार दि. २३ मे रोजी राज्याचे कृषिमंत्री दत्ता भरणे यांच्या हस्ते तसेच विविध मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांना हा पुरस्कार अहिल्यानगर येथे आयोजित शब्दगंध साहित्य संमेलनात प्रदान करण्यात येणार आहे. प्रा. डॉ. गणी पटेल हे लाडगाव येथील एका सामान्य शेतकरी कुटुंबातील असुन त्यांनी शैक्षणिक, सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रात केलेल्या विविधांगी कार्याची विशेष दखल घेऊन त्यांची शब्दगंध जीवनगौरव पुरस्कार २०२६ साठी निवड करण्यात आली आहे.सध्या ते राज्य सहकार बोर्डाचे संचालक तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे अभ्यासमंडळाचे माजी सदस्य आहेत.डॉ. पटेल यांना यापूर्वीही विविध पुरस्काराने सन्मानीत करण्यात आलेले आहे. या पुरस्कार वितरण प्रसंगी राज्याचे कृषिमंत्री ना. दत्ता भरणे यांच्यासह आ. संग्राम जगताप, महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव,डॉ. संदीप सांगळे, कवयित्री डॉक्टर संजीवनी तळेगावकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

### राजुरी येथे प्रवरेच्या कृषीदूतांचे आगमन



**लोणी** : राहाता तालुक्यातील राजुरी येथे कृषी महाविद्यालय ,लोणी येथील कृषीदूतांचे आगमन झाले आहे. यावेळी गावचे सरपंच संगीता पठारे आणि उप सरपंच सोमनाथ गोरे यांनी संघप्रमुख महेश खेडे, सहित राठोड, नितेश तागड, सिद्धेश लांडगे, सिद्धांत आदमाने, सुहास कांबळे, सिद्धार्थ कानडी, अजिंक्य कानडी,किरण माळी आदी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. कृषी शिक्षणाच्या माध्यमातून हे कृषीदूत येथील शेतकऱ्यांना सदर कार्यक्रमांतर्गत विद्यार्थी ग्रामीण जीवन आणि कृषी तंत्रज्ञान, कीड व रोग ओळख, एकात्मिक व्यवस्थापन यांची माहिती शेतकऱ्यांनपर्यंत प्रात्यक्षिकाद्वारे पोहोचवण्याचा प्रयत्न करणार आहे. वास्तविक जीवनातील कृषी समस्या व शेतकऱ्यांसमोरील आव्हानांना सोडविण्यास मदत करणार आहेत.

### आत्मा मलिकच्या शिवाजी ढोलेची महाराष्ट्र सुरक्षा बलात निवड



**कोपरगाव** : कोपरगाव येथील आत्मा मलिक भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रातील विद्यार्थी शिवाजी रावसाहेब ढोले यांची महाराष्ट्र सुरक्षा बल (एमएसएफ) मध्ये निवड झाली आहे. कमवा व शिका योजनेअंतर्गत मोफत प्रशिक्षण घेत त्यांनी हे यश संपादन केले. आत्मा मलिक भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण ठरत असून अल्पावधीतच शेकडो विद्यार्थ्यांना विविध शासकीय सेवांमध्ये संधी मिळवून देण्यात केंद्राला यश आले आहे. अकरावी व बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना भरतीपूर्व प्रशिक्षण देणारे हे राज्यातील सर्वसमावेशक केंद्र मानले जाते. गरीब, होतकरू व गरजू विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षण देऊन शंभर टक्के निकाल देण्याची परंपरा केंद्राने निर्माण केली आहे. या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे सैन्य, पोलीस व अन्य शासकीय सेवेत जाण्याचे स्वप्न साकार होत आहे. प्रशिक्षक साईनाथ वर्पे, चेतन गिरमे, प्रवीण पठारे, सुधीर नाकाडे, हेमाकांत पाटील तसेच गंगाधर खाटेकर, करण मापारी यांनी विद्यार्थ्यांसाठी विशेष मेहनत घेतली.

### शिबलापूरच्या सुपुत्राचा राज्यस्तरीय सन्मान; जि प शाळेला २१ हजारांची देणगी




**आश्वी** : शिबलापूर ता. संगमनेर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे माजी विद्यार्थी श्री. सोमनाथ निवृत्ती गिते यांची महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून दिल्या जाणाऱ्या प्रतिष्ठित राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कारा साठी निवड झाली आहे. याबद्दल त्यांचे गावासह परिसरातून कौतुक होत आहे. व्यसनमुक्तीबाबत समाजात जनजागृती, योग्य मार्गदर्शन आणि समाजहितासाठी सातत्याने केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री नामदार देवेंद्र फडणवीस व मान्यवर मंत्र्यांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. मातृशाळेचे जपले ऋण या मोठ्या यशानंतरही आपल्या बालसंस्कारांची जाणीव ठेवत, श्री. गिते यांनी आपली मातोश्री कै. वेणूताई निवृत्ती गिते व पिताश्री कै. निवृत्ती भाऊराव गिते यांच्या स्मरणार्थ शिबलापूर जिल्हा परिषद शाळेला गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी २१,००० रुपयांची देणगी दिली. यावेळी त्यांनी शाळेचे मुख्याध्यापक संतोष गोसावी, सहशिक्षक रेखा गोसावी, रोहिणी राऊत, शकुंतला उगलमुगले व नागरे सर यांच्या कार्याचे कौतुक केले. शाळेची उत्तरोत्तर प्रगती व्हावी व भविष्यात असेच नामांकित विद्यार्थी घडावेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. 'यशाच्या शिखरावर पोहोचूनही मातृशाळेचे ऋण जपणारा आदर्श विद्यार्थी' अशी भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

# अमृतवाहिनीच्या १०८ विद्यार्थ्यांची राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : येथील अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेच्या अमृतवाहिनी एमबीए महाविद्यालयाच्या २०२५–२६ शैक्षणिक वर्षात तब्बल १०८ विद्यार्थ्यांची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये थेट निवड झाली आहे.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांना वार्षिक तीन लाख ते सात लाख रुपयांपर्यंतचे आकर्षक पॅकेज मिळाल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. बी.एम. लोंढे यांनी दिली. माजी शिक्षणमंत्री बाळासाहेब थोरात, आमदार डॉ. सुधीर तांबे आणि कार्यकारी विश्वस्त शरयू देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालय ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या करिअर घडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे डॉ. लोंढे यांनी सांगितले.

१९९४–९५ मध्ये सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या महाविद्यालयातून आतापर्यंत २९ बॅचमधील २५४१ विद्यार्थ्यांनी एमबीए पदवी संपादन केली आहे. महाविद्यालय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी कायम संलग्न असून संस्थेला आयएसओ मानांकन तसेच २०२४ मध्ये 'नॅक'चे 'ए' ग्रेड मानांकन प्राप्त झाले आहे. व्यवस्थापनशास्त्रातील संशोधन केंद्र म्हणूनही महाविद्यालयाला मान्यता मिळाली असून ३६ संशोधक विद्यार्थी पीएचडीचे शिक्षण घेत आहेत.

यंदा निवड झालेल्या विद्यार्थ्यांना Tata Consultancy Services, Kotak Mahindra Bank, DMart, Mphasis, IndiaMART यांसह विविध नामांकित कंपन्यांमध्ये संधी मिळाली आहे. या यशासाठी प्लेसमेंट विभाग प्रमुख डॉ. आर. बी. गवळी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विशेष प्रयत्न केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले.

# मंत्री विखेंकडून गंगुबाई गायकवाड यांचा सत्कार

## मातृशक्तीच्या अद्वितीय धैर्याला सलाम !

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी** : संगमनेर तालुक्यातील खरशिंदे गावातील श्रीमती गंगूबाई गायकवाड (वय ६५) यांनी घरात शिरलेल्या बिबट्याला अत्यंत धाडसाने व प्रसंगावधान राखून जेरबंद केले. त्यांनी दाखवलेल्या प्रसंगावधानाबद्दल जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी सन्मानित करून मातृत्व शक्तीला वंदन केले, त्यांचा सन्मान केला. ही घटना घडली तेव्हा गंगूबाई गायकवाड स्वयंपाक करत होत्या. त्याचवेळी अचानक बिबट्याने घरात प्रवेश केला. कोणताही गोंधळ न करता त्यांनी तात्काळ आपल्या झोपलेल्या मुलाला उठवून सुरक्षितपणे बाहेर जाण्यास सांगितले आणि प्रसंगाचे भान राखत घराची कडी लावून बिबट्याला घरातच जेरबंद केले.

त्यांच्या या निर्णायक कृतीमुळे संभाव्य अनर्थ टळला. सदर घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थ व वनविभागाने तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन जेरबंद बिबट्याला सुरक्षितपणे रेस्क्यू केले. मात्र



संपूर्ण परिसरात चर्चा राहिली ती गंगूबाई गायकवाड यांच्या धैर्याची, शौर्याची आणि समयसुचकतेची. आढावा बैठकीच्या निमित्ताने आलेल्या पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी गंगुबाई गायकवाड यांचा सत्कार करून त्यांच्यातील धैर्याला आणि मातृत्व शक्तीला वंदन केले.

या प्रसंगी आ. अमोल खताळ, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया तसेच वनविभाग व इतर संबंधित विभागांचे अधिकारी, पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# आ. अक्षय कर्डिले यांच्या प्रयत्नांतून सात्रळ–माळेवाडी शिवारातील वीजपुरवठा पूर्ववत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनगाव** : उन्हाळ्याच्या तोंडावर शेती पाण्याचा प्रश्न गंभीर बनलेला असतानाच सात्रळ–माळेवाडी शिवारातील जळालेला ट्रान्सफॉर्मर आणि विनायक डी.पी. परिसरातील तुटलेला सिमेंट पोल तातडीने बदलण्यात आल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. अनेक दिवसांपासून बंद पडलेल्या वीजपुरवठ्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांवर संकट ओढवले होते.

मात्र लोकप्रतिनिधी आणि महावितरण प्रशासनाच्या समन्वयातून अवघ्या काही वेळात समस्या मार्गी लागल्याने शेतकरी वर्गात समाधान व्यक्त होत आहे.

सात्रळ–माळेवाडी शिवारातील सुखदेव शिंदे यांच्या डी.पी.चा ट्रान्सफॉर्मर अचानक जळाल्याने परिसरातील शेतीपंप बंद पडले होते. त्याचबरोबर ग्रामपंचायत सात्रळ हद्दीतील विनायक डी.पी. ट्रान्सफॉर्मरच्या एल.टी. लाईनचा सिमेंट पोल तुटल्याने वीजपुरवठा पूर्णतः विस्कळीत झाला होता. परिणामी शेकडो एकर शेतीतील पिकांना पाणी देणे कठीण बनले होते.

सध्या उन्हाची तीव्रता वाढत असून ऊस, भाजीपाला, फळबागा तसेच खरीपपूर्व पिकांसाठी पाण्याची मोठी गरज आहे. अशा परिस्थितीत वीजपुरवठा खंडित झाल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले



होते. ही बाब आ. अक्षय कर्डिले यांच्या निदर्शनास आणून देण्यात आली. त्यांच्या सूचनेनुसार योगेश गिते यांनी महावितरण अधिकाऱ्यांशी सातत्याने पाठपुरावा केला. यानंतर सात्रळ एमएसईबी कार्यालयाचे इंजिनिअर गाडे, लाईनमन आंबेकर आणि कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत नवीन ट्रान्सफॉर्मर बसवला तसेच तुटलेला सिमेंट पोल बदलून वीजवाहिनी दुरुस्त केली.

त्यामुळे परिसरातील वीजपुरवठा पुन्हा सुरळीत झाला असून शेतकऱ्यांच्या शेतीपंपांना वीज मिळू लागली आहे. वीजपुरवठा सुरळीत झाल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त करत संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि लोकप्रतिनिधींचे आभार मानले. शेती हीच आमची जीवनवाहिनी असून वेळेत घेतलेला निर्णय आमच्या पिकांसाठी वरदान ठरला, अशी भावना अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

# 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल शिबिराला' नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : येथे महसूल विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल शिबिराला' नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिलांच्या महसूल विभागाशी संबंधित प्रश्नांचे तातडीने निराकरण व्हावे, प्रशासन अधिक लोकाभिमुख व गतिमान व्हावे या उद्देशाने मंडलस्तरावर या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपविभागीय अधिकारी माणिक आहेर व तहसीलदार अमोल मोरे यांनी नागरिकांना महसूल विभागाच्या योजनांची माहिती देत शिबिराच्या माध्यमातून कामे अधिक सुलभ कशी होतील याबाबत मार्गदर्शन केले. उपनगराध्यक्ष अभय शेळके यांनी आपल्या भाषणात मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व खासदार डॉ. सुजय विखे पाटील हे शासनाच्या योजना तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचविण्यास कटिबद्ध असल्याचे सांगितले. प्रशासनाच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांची कामे जलद गतीने पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच शिर्डी मतदारसंघात विकासकामे वेगाने सुरू असून नगर–मनमाड रस्त्याचे काम प्रगतीपथावर असल्याचेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमास नगराध्यक्षा जयश्री थोरात, नगरसेवक नितीन कोते, सतीश गोंदकर, अमित शेळके यांच्यासह पंचक्रोशीतील सरपंच, पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पद्मश्री विखे महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी बनली हर्बल उद्योजक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार** : महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान 'उमेद' अंतर्गत नुकतेच मुंबई, बांद्रा येथे सपन्न झालेल्या प्रदर्शनात सप्तशृंगी महिला बचत गटाच्या राधे राधे गौधूपबत्ती स्टॉलला नाविन्यपूर्ण उपक्रम व सर्वाधिक विक्रीबद्दल सन्मानित करण्यात आले. यावेळी 'उमेद'चे मा. निलेश सागर, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करून राधिका गव्हाणे यांना सन्मानित केले. हा सन्मान महिला बचत गटाच्या कार्याला मिळालेली एक प्रेरणादायी पावती मानली जात असून, ग्रामीण महिलांच्या स्वावलंबन, उद्योजकता आणि आर्थिक सक्षमीकरणासाठी हा अभिमानास्पद क्षण ठरला आहे.

देशाचे पंतप्रधान मा.श्री.नरेंद्रजी मोदी यांच्या 'अत्मनिर्भर भारत आणि मेक इन इंडिया' या दुरदर्शी संकल्पनेला अनुसरुन तसेच त्यांची गोमातेबद्दल असलेली कृतज्ञता या उपक्रमातून निश्चितच राधिका हिने उद्योग पूर्णत्ववाला नेण्याचा प्रयत्न केला आहे.




पद्मश्री विखे पाटील महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी राधिका गव्हाणे हिने देशी गाईच्या शेणापासून चार सुगंधीत हर्बल गौधूपबत्ती तयार करण्याचा उद्योग तसेच गायीच्या शेणापासून श्री गणेशमुर्ती, पणती, पारंपारिक गोव–या इ. उत्पादने सप्तशृंगी महिला बचत गटाच्या माध्यमातून तयार केली जातात. या उद्योगामुळे पाच महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे.

सन २०२४ मध्ये घरगुती स्तरावर सुरू झालेला हा व्यवसाय आज 'उमेद' अभियानाच्या माध्यमातून जिल्ह्यासह राज्यभर प्रसिद्ध झाला आहे. शिक्षणासोबतच लोकनेते डॉ.बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री ना. डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून, व संस्थेच्या सी.ई.ओ. डॉ.सुष्मितताई विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वेळोवेळी आयोजित केलेल्या बिल्डिंग प्रवरा स्टुडंट एक्स्पो मधील सहभागामुळे तसेच माजी जिल्हा परिषद अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील यांचे प्रेरणेने राधिकाला उद्योजकतेची प्रेरणा मिळाली, अशी माहिती तिचे वडील राजेश गव्हाणे यांनी दिली.

# राष्ट्रीय शुटींग व्हॉलीबॉल स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुलींना तृतीय क्रमांक

## राहुरी फॅक्टरीच्या खेळाडूंची चमक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : १७ वर्षांखालील गटातील ४५ व्या राष्ट्रीय शुटींग व्हॉलीबॉल स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुलींच्या संघाने उल्लेखनीय कामगिरी करत तृतीय क्रमांक पटकावला. ही स्पर्धा दि. १२, १३ व १४ मे रोजी तेलंगणा राज्यातील मेहमुदाबाद येथे पार पडली. या स्पर्धेत महाराष्ट्र संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत तिसरे मानांकन मिळवले. विशेष म्हणजे, राहुरी फॅक्टरी येथील शिवनेरी क्लबच्या तीन खेळाडूंनी महाराष्ट्र संघात स्थान मिळवत आपल्या खेळाची छाप पाडली. संघात कुमारी सानिका किरण कोबरणे, श्वेताली दत्तात्रय



गोपाळे आणि जान्हवी सोमनाथ जाधव या खेळाडूंचा समावेश होता. त्यांच्या या यशामुळे राहुरी परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे. या खेळाडूंना अम्युचर शुटींग व्हॉलीबॉल राज्य फेडरेशनचे सचिव सुनील कंठाळे, राज्य फेडरेशनचे सदस्य नाना काळे, अहिल्यानगर जिल्हा शुटींग व्हॉलीबॉल संघटनेचे अध्यक्ष मुस्ताक शेख, तसेच प्रशिक्षक राजेंद्र पुजारी व संदीप निबे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# तब्बल २८ वर्षानंतर विद्या मंदिर प्रशालेचा स्नेहमेळावा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : येथील विद्या मंदिर प्रशाला येथील १९९८ बॅचच्या माजी विद्यार्थी व शिक्षण क्षेत्रातील सहकाऱ्यांचा स्नेह मेळावा उत्साहात पार पडला. अनेक वर्षांनंतर एकत्र आलेल्या मित्रमंडळींनी जुन्या आठवणींना उजाळा देत शालेय जीवनातील अविस्मरणीय क्षण पुन्हा अनुभवले. यावेळी आलेल्या विद्यार्थ्यांमध्ये कुणी डॉक्टर, इंजिनिअर, वकील, व्यापारी, तर कुणी नोकरदार अशा सर्वांनीच एकत्रितपणे येत आपल्या विद्यार्थी दशेतील आठवणी जाग्या करून मोठ्या आनंदाने स्नेह मेळाव्याचा आनंद द्विगुणित केला. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थीदशेतील अनुभव, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि मैत्रीचे महत्त्व यावर मनोगत व्यक्त केले. जीवनात वेळ बदलतो, परिस्थिती बदलते; मात्र शाळेतील मैत्री कायम मनात जिवंत राहते, अशा भावना अनेकांनी व्यक्त केल्या. या स्नेह मेळाव्यात जुन्या मित्रांची भेट, आठवणींना उजाळा, हास्यविनोद आणि भावनिक क्षण अनुभवायला मिळाले. आयुष्यातील विरंगुळ्यांचा अनुभव सर्वांनीच घेतला. कार्यक्रमात विविध सांस्कृतिक उपक्रमांसह सामूहिक छायाचित्रण करण्यात आले.

## जाहीरनामा

**तहसिलदार, तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर यांचे कार्यालय ता. संगमनेर, जिल्हा – अहिल्यानगर**

क्र. कावि/जन्म नोंद/५५२/२०२६
संगमनेर, दिनांक १५/०५/२०२६

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार **श्री. विलास कारभारी येंधे** रा. **सावरगाव तळ**, ता. **संगमनेर**, जि. **अहिल्यानगर** यांनी दिनांक ०७/०१/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा. सावरगाव तळ, ता. **संगमनेर**, जि. **अहिल्यानगर** येथील रहिवासी असून अर्जदार यांचा/यांची मुलगा नामे सचिन विलास येंधे यांचा **जन्म** मौजे **सावरगाव तळ** ता. **संगमनेर** जि. **अहिल्यानगर** येथे दिनांक **०५/०४/१९८४** रोजी झाला असून त्यांचा/त्यांची जन्म नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी सावरगाव तळ यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी सावरगाव तळ यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसांचे आंत, सुटटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात या कार्यालयात हरकत/तक्रार दाखल करावी. मुदतीनंतर त्या हरकतींचा/तक्रारीचा विचार केला जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**

# पान १ वरुन

## पुण्यातून होत होती लिंगनिदानाच्या पोर्टेबल मशीनची विक्री!

विशेष पथकाने वडगाव मावळ परिसरात शोधमोहीम राबवली. दिवसभराच्या शोधानंतर मारुती विश्वनाथ ढोरे (वय ४८, रा. केशवनगर, वडगाव मावळ) याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान त्याच्याकडे सोनोग्राफीसाठी वापरले जाणारे पोर्टेबल मशीन आढळून आले. पोलिसांनी तत्काळ हे मशीन जप्त केले आहे. तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, संबंधित आरोपी हा वैद्यकीय पदवीधारक डॉक्टर नसतानाही बेकायदेशीर पद्धतीने लिंगनिदान चाचण्या करत होता. यामुळे या प्रकरणाचे गांभीर्य अधिक वाढले आहे. पोलिसांच्या मते, या मशीनच्या सहाय्याने गर्भलिंग तपासणीचे गैरकृत्य सुरू होते. दरम्यान, आरोपीची शारीरिक स्थिती अटक करण्यास योग्य नसल्याचे प्राथमिक तपासात आढळून आल्याने त्याला तपासात सहकार्य करण्याच्या अटीवर समज देण्यात आली आहे. मात्र या प्रकरणातील तपास थांबलेला नसून, आणखी काही डॉक्टर आणि एजंट यांच्याशी संबंधित धक्कादायक माहिती समोर येत असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. पुण्यातील आरोपींनी आणखी काही व्यक्तींना व डॉक्टरांना अशा प्रकारची मशीन विकल्याची कबुली दिल्याने पोलिसांनी तपासाची व्याप्ती वाढवली आहे. ज्या-ज्या आरोपींकडे बेकायदेशीर लिंगनिदानासाठी वापरली जाणारी मशीन असण्याची शक्यता आहे, अशा सर्वांवर पोलिसांचे लक्ष केंद्रीत झाले आहे. संबंधित माहितीच्या आधारे विविध ठिकाणी तपास आणि शोधमोहीम सुरू आहे.

## महिलांवर दगडफेक

परिसरातील शांतता, शेती व पाणीपुरवठा धोक्यात घालणाऱ्या वाळू उपशाविरोधात आता अहोरात्र जागता पहारा ठेवण्यात येईल, असा इशाराही ग्रामसभेतून देण्यात आला.ग्रामसभेनंतर महिलांनी ट्रॅक्टरमधून नाऊर गावाकडे मोर्चा काढत तेथेही विशेष ग्रामसभा घेतली.नाऊर ग्रामस्थांनीदेखील एकमुखाने वाळू उपशाला विरोध दर्शवत शासनाने संबंधित वाळूपट्ट्याचा लिलाव तात्काळ रद्द करावा, अशी मागणी केली.दोन्ही गावांतील ग्रामस्थांनी गोदावरी नदी ही परिसराचा आत्मा आहे असे सांगत नदीपात्रातील वाळू संवर्धनासाठी एकजुटीने लढा देण्याचा निर्धार व्यक्त केला.यावेळी अनेक शेतकरी व महिलांनी आपल्या भावना तीव्र शब्दांत मांडल्या.

महिलांवर झालेल्या दगडफेकीच्या घटनेचा निषेध करत संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली.ग्राम स्थांनी प्रशासनाला इशारा देत सांगितले की, स्थानिकांच्या भावना आणि शेतीचे हित लक्षात न घेता वाळू उपशाचा निर्णय राबविण्यात आल्यास तीव्र (पान ४ वर)स्वरुपात समृद्धी महामार्गावर लोकआंदोलन उभे राहील.दरम्यान,गोदावरी परिसरातील सर्व गावांनी एकत्र येऊन नदी संवर्धनासाठी व्यापक जनआंदोलन उभारण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले. महिलांच्या आक्रमक भूमिकेमुळे रामपूर व नाऊर परिसरातील वातावरण चांगलेच तापले असून प्रशासनाची पुढील भूमिका काय राहणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहेत.

महिलांवर दगडफेक होऊनही संबंधित वाळू वाहतूकदारांवर अद्याप ठोस कारवाई न झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. तालुका महसूल प्रशासनाने घटनाकडे गांभीर्याने लक्ष देऊन दोषींवर तात्काळ गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी होत आहे. महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला असताना प्रशासन नेमके कोणाची वाट पाहत आहे? असा संतप्त सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे. याबाबत लवकर कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे. मंहत रामगिरी महाराजांचा संताप -रामपूर नाऊर सह सराला- गोवर्धन, वांजरगाव सह गोदावरी परिसराचा वाळू उपसाला विरोध असून वाळू गेल्यामुळे शेतीचा व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होतो, वाळूमुळे मुले व्यसनाधिन बनतात, खेड्यातील रस्ते पुर्णतः उखडून जाऊन रस्त्याची दुरवस्था होते, ग्रामीणचे रस्ते पुन्हा होत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांचा येण्या-जाण्याचा प्रश्न निर्माण होतो,वाळू उचलल्यामुळे पाण्याचा स्पीड वाढून बेटाला धोका निर्माण होऊ शकतो. सराला बेट हे महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असुन शेतकरी व रामपूरच्या सर्व गावकऱ्यांनी वाळू उपशाला जो विरोध केला आहे त्या लढ्याला आम्ही तुमच्या सोबत असून नदीपात्रात पाणी असतांना तहसिलदार यांना ठेकेदाराला ताबा देण्याचा किंवा नदीपात्रात साधन नेण्याचा कुठलाही अधिकार नसुन आपण पालकमंत्री विखे पाटील व मंत्री गिरीश महाजन यांचेशी चर्चा झाली असुन अजुनही काही मंत्री महोदयाशी बोलण्याची गरज पडल्यास त्यांचेशी देखील बोलू वाळू उपशा विरोधात आम्ही तुम च्या सोबत असल्याचे मठाधिपती रामगिरी महाराज यांनी ठणकाऊन सांगितले.

## संभाजीनगरमध्ये 'कॉकरोच जनता पार्टी'ची स्थापना

नीट पेपरफुटी आणि बेरोजगारीमुळे संतप्त झालेल्या तरुणांचा राग अभिजीत दीपकेच्या लक्षात आला. १६ मे रोजी, त्याने एक्सवर गंमतीने लिहिले की, जर सर्व झुरळे एकत्र आली तर काय होईल? आणि कॉकरोच जनता पार्टी नावाची एक वेबसाइट आणि गुगल फॉर्म सुरू केला. 'द वीक'नुसार, अभिजीतने पक्षात सामील होण्यासाठी ठेवलेले निकष आजच्या जनरेशन-जीच्या तरुणाईला पटणारे होते. पात्रतेच्या निकषांमध्ये बेरोजगार असणे, आळशी असणे, सतत ऑनलाइन (दिवसाचे २४ तास इंटरनेटवर) असणे आणि व्यावसायिकपणे तक्रार करण्याची क्षमता असणे यांचा सम ावेश होता.

टीएमसीच्या खासदार महुआ मोईत्रा आणि कीर्ती आझाद यांसारख्या प्रमुख नेत्यांनी सोशल मीडियावर या उपहासाला पाठिंबा दिला. एका पत्रकारिता पोर्टलनुसार, जरी याची सुरुवात एक विनोद म्हणून झाली असली तरी, आता हे पेपरफुटी, बेरोजगारी आणि तरुणांच्या मानसिक तणावावर एक मोठी राजकीय चर्चा बनली आहे.

# वाहनचालकांची अडवणूक होणार नाही याची काळजी घ्या : आ खताळ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** अनेक एजंट सर्वसामान्य वाहन चालकांकडून अवाजवी पैसे उकळत असल्याच्या तक्रारी वाहनचालकांनी आमदार अमोल खताळ पाटील यांच्याकडे केल्या होत्या. या त्यांच्या तक्रारींची गंभीर दखल घेत आमदार खताळ यांनी

> वडगाव पान येथील आरटीओ कॅम्पच्या स्थळावरून आमदार अमोल खताळ यांनी थेट परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना थेट फोन लावत परिवहन विभागाच्या काम काजात सुधारणा होणेबाबत तसेच संगमनेरला परिवहन कार्यालय सुरू करणेबाबत विनंती केली. ज्या अधिकाऱ्यांबाबत तक्रारी आहेत त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल असे परिवहन मंत्र्यांनी आमदार अमोल खताळ यांना सांगितले

बुधवारी अचानक वडगाव पान येथील कॅम्पवर धाड टाकत परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करत संबंधित अधिकाऱ्यांना धारेवर धरले. आणि एजंटांच्या माध्यमातून सुरू असलेल्या गैरप्रकारांबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत येथून पुढे सर्व सामान्य वाहनचालकांची अडवणूक होणार नाही याची दक्षता घ्या असेच सत्ता निर्देश आमदार अमोल खताळ यांनी श्रीरामपूर उप प्रादेशिक परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले



तळेगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेअंतर्गत वडगाव पान साठवण तलावात आलेले पाणी तळेगाव सह २१गावांना सोडण्याच्या कार्यक्रमा साठी आमदार अमोल खताळ गेले होते पाणी सोडल्यानंतर संगमनेरकडे परतत येत असताना वडगाव पान येथे प्रत्येक महिन्याच्या बुधवारी वाहन चालकांना लायसन्स काढणे गाडी पासिंग करणे आरटीओ कॅम्पमध एजंटां च्या माध्यमातून वाहन चालकांची आर्थिक लूट होत असल्याच्या तक्रारींची पडताळणी करण्यासाठी आमदार खताळ यांनी कोणतीही पूर्वसूचना न देता कॅम्पला भेट देत धाड टाकली अचानक आमदार खताळ आले असल्याचे पाहताच आरटीओ अधिकाऱ्यांची एकच तारांबळ उडाली शासनाच्या सेवांसाठी नागरिकांना एजंटांच्या दारात जावे लागणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. सर्वसामान्य वाहन चालकांची अडवणूक होत असेल तर ती तात्काळ बंद झाली पाहिजे. नागरिकांना तुमच्या कोणत्या ही प्रकारचा त्रास होता कामा नये, असे सक्त निर्देश उपप्रादेशिक परिवहन विभाग अधिकाऱ्यांना दिले. आमदार खताळ यांच्या या कारवाईचे वाहन चालकांनी स्वागत केले आहे

# ग्रामसेवकाची बदली रद्द करा

## अन्यथा आमरण उपोषण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** राहाता तालुक्यातील निमगाव कोऱ्हाळे येथील ग्रामविकास अधिकारी सुनील राजपूत यांची करण्यात आलेली बदली रद्द करून त्यांना पुन्हा गावात रुजू करावे, अन्यथा २८ मे २०२६ पासून पंचायत समिती राहाता येथे आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा उपसरपंच तात्या गायकवाड व ग्रामस्थ सचिन आरणे यांनी दिला आहे. याबाबत गटविकास अधिकारी व तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, सरपंच कैलास कातोरे यांनी प्रशासनातील अधिकाऱ्यांशी संगनमत करून कर्तव्यदक्ष ग्रामसेवक सुनील राजपूत यांची बदली केली. राजपूत हे गावात जात-पात व भेदभाव न करता पारदर्शक कारभार करत होते.

तसेच शासकीय योजनांची माहिती गोरगरीब नागरिकांपर्यंत पोहोचवत होते. निवेदनात पुढे म्हटले आहे की, अतिक्रमण बाधित नागरिकांना न्याय मिळवून देणे, घरकुल वसाहत उभारणे, २४ तास पाणी व वीज, वृक्षारोपण, पक्के रस्ते व रोजगार निर्मिती यांसारख्या विकासकामांची स्वप्ने राजपूत यांनी गावासमोर ठेवली होती. मात्र त्यांच्या कारभारामुळे काहींचे हितसंबंध बाधित झाल्यानेच त्यांची अध्या तीन महिन्यांत बदली रण्यात आली. या निवेदनाच्या प्रती पालकमंत्री राधाकृष्ण वखे पाटील, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रांताधिकारी, तहसीलदार व राहाता ेलीस ठाण्यास पाठविण्यात आल्या आहेत.

# महाराष्ट्र लहुजी सेनेचे पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषण सुरू




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नेवासा तालुक्यातील म्हाळस पिंपळगाव येथील प्रवीण मोहिते या मातंग तरुणाचे अपहरण करून जीवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या गुन्हेगारांचा शोध लावा या मागणीसाठी महाराष्ट्र लहुजी सेनेचे वतीने अहिल्यानगर पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे. महाराष्ट्र लहुजी सेनेचे संस्थापक भैरवनाथ भारस्कर यांच्या नेतृत्वाखाली नेवासा तालुक्यातील म्हळस पिंपळगाव येथील प्रविण लक्ष्मण मोहिते यांच्या मारेकऱ्यांची सी.आय.डी मार्फत संघटीत गुन्हेगाराचा शोध करण्यात यावा. संघटीत होऊन गुन्हेगार व्यक्तिंनी प्रविण मोहिते यांनाअपहरण करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. सदर गुन्हेगारावर मोका अंतर्गत कारवाई करून त्यांना तत्काळ अटक करण्यात यावी या मागणीसाठी उपोषण करण्यात येत आहे. सेनेचे अध्यक्ष भैरवनाथ भारस्कर यांच्या समवेत गयाबाई मोहिते, लक्ष्मण मोहिते, छबुबाई मोहिते, विजय मोहिते, ताईबाई मोहिते, भाग्यत्री आढागळे, सुनिल आढागळे, सारीका मोहिते, इंदुबाई साळवे, रंजना सरोदे, प्रभु सरादे, नामदेव मोहिते हे उपोषणास बसले आहेत.

## तुकाराम मुंडे यांची अन्न व औषध प्रशासन आयुक्तपदी नियुक्ती

पान १ वरुन

विभागामार्फत होणार असल्याने या पदाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. अशा परिस्थितीत मुंडे यांच्या पारदर्शी आणि कठोर प्रशासकीय शैलीमुळे काही हितसंबंधी गटांमध्ये अस्वस्थता निर्माण झाल्याची चर्चा मंत्रालयीन स्तरावर सुरू होती. गेल्या दीड महिन्यांपासून कोणती नवी जबाबदारी दिली जाणार, याकडे राज्याच्या प्रशासकीय वर्तुळाचे लक्ष लागले होते. अखेर सरकारने त्यांची अन्न व औषध प्रशासन आयुक्तपदी नियुक्ती जाहीर केली. औषध गुणवत्ता, अन्न भेसळ, औषध परवाने आणि आरोग्य सुरक्षेच्या दृष्टीने हे खाते अत्यंत संवेदनशील मानले जाते. त्यामुळे मुंडे यांच्या नियुक्तीकडे म ोठ्या अपेक्षेने पाहिले जात आहे. अहिल्यानगर जिल्ह्यासाठीही ही नियुक्ती विशेष महत्त्वाची मानली जात आहे. श्रीगोंदा येथील बोगस दिव्यांग प्रकरणापासून सुरू झालेल्या कारवाईमुळे जिल्ह्यातील अनेक गैरप्रकार उघडकीस आले होते. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये मुंडे यांच्याविषयी विश्वास आणि सकारात्मक भावना निर्माण झाल्या आहेत.

दरम्यान, राज्य सरकारने इतर काही महत्त्वाच्या प्रशासकीय नियुक्त्याही जाहीर केल्या आहेत. कान्हुराज बगाटे यांची महामुंबई मेट्रो संचालन महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर श्रीधर डुबे यांची मुंबई महानगर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी नियुक्ती झाली आहे. तसेच राज्य कामगार विमा योजना आयुक्त आर. एस. चव्हाण यांच्याकडे हाफकीन जीव औषध निर्माण महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला असून बाबासाहेब बेलदार यांची धुळे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

# टाकळीभान परिसरात मटका जुगारावर पोलिसांचा छापा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** - तालुक्यातील टाकळीभान परिसरात सुरू असलेल्या अवैध कल्याण मटका जुगारावर पोलिसांनी छापा टाकत एकास ताब्यात घेतले.या कारवाईत रोख रक्कम व जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले.या आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.याबाबत, तालुका पोलिस स्टेशनचे पोहेकॉ.नवनाथ बर्डे हे पोलिस पथकासह टाकळीभान परिसरात पेट्रोलिंग करत असताना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, बाजारतळ टाकळीभान येथे एक इसम घराच्या आडोशाला बसून विनापरवाना कल्याण मटका नावाचा जुगार चालवत असून नागरिकांकडून पैसे घेऊन आकड्यांच्या चिठ्ठ्या देत आहे.माहिती मिळताच पोलिसांनी दोन पंचांना बोलावून घेत छापा टाकला.यावेळी एक इसम संशयास्पदरीत्या बसलेला दिसून आला.पोलिसांनी पंचांसमक्ष त्याची चौकशी केली असत्ता त्याने आपले नाव अशोक पिराजी धोत्रे (वय ५२, रा. बाजारतळ, टाकळीभान, ता. श्रीरामपूर) असे सांगितले. पोलिसांनी त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडून कल्याण मटका जुगाराचे साहित्य व रोख रक्कम जप्त करण्यात आली.या कारवाई दरम्यान आरोपीकडून ५६० रुपये रोख रक्कम, विविध आकड्यांच्या चिठ्या, कागदपत्रे, पेन तसेच मटका जुगार चालविण्यासाठी वापरले जाणारे साहित्य जप्त करण्यात आले.जप्त केलेल्या साहित्याचा पंचनामा घटनास्थळी करण्यात आला.प्राथमिक तपासात आरोपी विनापरवाना अवैधरित्या कल्याण मटका जुगार चालवत असल्याचे निष्पन्न झाले.याप्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास करित आहे.

## 'लोकल बॉडी'च्या आखाड्यात विखे विरुद्ध सुनेत्रा पवारांची प्रतिष्ठा पणाला

पान १ वरुन

देण्याचा निर्णय झाला, तर झावरे पाटील यांचे नाव पुढे येऊ शकते.
माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांचे नावही राजकीय वर्तुळात चर्चेत आहे. राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत त्यांनी दाखवलेला संयम आणि स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनानंतर त्यांच्या वारसदार अक्षय कर्डिले यांना दिलेला पाठिंबा हा राजकीय मोठेपणा म्हणून पाहिला गेला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी राखलेले सम न्वयाचे संबंध लक्षात घेता तनपुरे हे सर्वमान्य चेहरा म्हणून पुढे येऊ शकतात, अशीही चर्चा आहे. दुसरीकडे भाजपकडूनही जोरदार हालचाली सुरू आहेत. माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांचे नाव सर्वाधिक चर्चेत आहे. लोकसभा निवडणुकीनंतर त्यांना विधान परिषदेत पाठवण्याचा पर्याय भाजपसमोर असल्याचे मानले जात आहे. जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांवर विखे गटाचा प्रभाव आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे राजकीय वजन पाहता भाजप ही जागा थेट आपल्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न करू शकतो. भाजपमधून महेंद्र गंधे, भानुदास बेरड तसेच उपमहापौर धनंजय जाधव यांची नावेही चर्चेत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांतील मतांचे गणित पाहून भाजप अंतिम क्षणी वेगळा राजकीय डाव टाकण्याची शक्यता नाकारता येत नाही. महाविकास आघाडीमध्ये ही जागा शिवसेनेची (ठाकरे गट) आहे. गेल्यावेळी अरुण काका जगताप यांच्याशी शशिकांत गाडे यांनी तगडी झुंज दिली होती. त्यांच्याशिवाय शिवसेनेकडून माजी मंत्री शंकरराव गडाख यांनाही संधी मिळू शकते. काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात यात कसा समन्वय साधतात? हे पाहणेदेखील औत्सुक्याचे ठरेल. या निवडणुकीतील सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे मतांचे गणित. जिल्हा परिषद निवडणुका रखडल्याने म हानगरपालिका, नगरपालिका आणि पंचायत समित्यांतील सदस्यांचे राजकीय वजन वाढले आहे. त्यामुळे पक्षनिष्ठेपेक्षा स्थानिक पातळीवरील संपर्क आणि वैयक्तिक समीकरणे निर्णायक ठरणार आहेत. अहिल्यानगर विधान परिषद निवडणूक ही प्रत्यक्षात भविष्यातील जिल्हा राजकारणाची दिशा ठरवणारी निवडणूक मानली जात आहे. महायुतीत भाजप-राष्ट्रवादीचे संबंध किती मजबूत आहेत, सुनेत्रा पवार यांचे नेतृत्व जिल्ह्यात किती प्रभावी ठरते, विखे पाटील गटाचे स्थानिक वर्चस्व किती कायम आहे आणि राष्ट्रवादीतील अंतर्गत गटबाजी कितपत नियंत्रणात राहते, याची खरी परीक्षा या निवडणुकीत होणार आहे. म्हणूनच उमेदवारी जाहीर होईपर्यंत जिल्ह्यातील राजकीय वातावरण अधिक तापणार, हे निश्चित मानले जात आहे.

### नावात बदल

माझे जुने नाव अदिल(ADIL) शेराली सय्यद (SAYYED)(माझे १० वी व १२ वी मार्कशिट वरील नाव) असे असून माझे नवे व खरे नाव आदिल (AADIL) शेराली सय्यद (SAYYAD)(माझे आधार कार्ड वरील नाव) असे आहे दोन्ही नावाच्या व्यक्ती मी एकच असून अन्य दुसरी व्यक्ती नाही प्रतिज्ञापत्र क्र.-६५२२४२०४१२६८१००६७६४०० दिनांक १९/०५/२०२६

### CHANGE OF NAME

I HAVE CHANGE MY OLD NAME IN MY SON EDUCATION DOCUMENTS SHARDH SUBHASH GADE ( BEFORE NAME ) TO NEW NAME AS SHARDA SUBHASH GADE (AADHAR NO. 764102983344) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC KOPARGAON PLACE: KOPARGAON

DATE : 20/05/2026

# निधन वार्ता

### शशिकला शिंदे



**श्रीरामपूर :** येथील जेष्ठ स्वातंत्र्यसेनानी, रयत शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष ॲड. रावसाहेब शिंदे यांच्या पत्नी शशिकला रावसाहेब शिंदे (वय ८८) यांचे बुधवार, दि. २० मे रोजी सकाळी १०.३० वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात १ मुलगा, २ मुली, सुना, पुतणे असा परिवार आहे. त्या सर्जन डॉ. राजीव शिंदे यांच्या मातोश्री व स्त्रीरोग तज्ञ डॉ. प्रेरणा शिंदे यांच्या सासु होत. केंद्रीयमंत्री आण्णासाहेब शिंदे यांच्या त्या भावजई, सहकारमहर्षी स्व. भाऊसाहेब थोरात व माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या त्या जवळच्या नातेवाईक होत. स्व. शशिकला शिंदे यांनी ॲड. रावसाहेब शिंदे यांना स्वातंत्र्य लढ्याच्या काळात बहुमोल सहकार्य केले.

### आनंदा वाणी



**झरेकाठी :** संगमनेर तालुक्यातील झरेकाठी येथील पैलवान आनंदा हरी वाणी (वय ८७) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुलं दोन मुली सुना नातवंड परिवार आहे. प्रा.भाऊसाहेब आनंदराव वाणी , प्रा सुधाकर आनंदराव वाणी मंदा शेलार, नंदा गोरे यांचे ते वडील होते.

### भिमाबाई पाचपिंड



**माळवाडगाव :** येथील भिमाबाई पुंजाहरी पाचपिंड (वय ८५) यांचे वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सून, नातवंडे असा परिवार असून दिलीप व दत्तात्रय पाचपिंड यांच्या त्या मातोश्री होत.

### चंद्रकांत आढाव



**माळवाडगाव :** येथील चंद्रकांत रायभान आढाव (वय ५२) यांचे अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन भाऊ, पुतणे असा परिवार आहे सुरेश आढाव व बाळासाहेब आढाव यांचे ते तर बंधू अमोल आढाव याचे ते वडील होत.

### मनराज जावळे



**पोहेगांव :** कोपरगाव तालुक्यातील सोनेवाडी येथील रहिवासी मनराज पोपट जावळे वय ८४ वर्ष यांचे नुकतेच हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ,चार मुली, जावई पुतणे असा परिवार आहे.ते आनाजी जावळे यांचे बंधु तर नंदाताई जाधव, इंदुबाई जाधव,भामाबाई गुरसळ,सुमन होन व सरीता जाधव यांचें वडील होते.

# स्कोडा ऑटो इंडियाने नवीन मोहीम केली सुरु 'ग्रेटेस्ट ऑन अ ट्रॅक'

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नाशिक :** स्कोडा ऑटो इंडियाने आपल्या परफॉर्मन्स-केंद्रित वारशाला अधोरेखित करणारी 'ग्रेटेस्ट ऑन अ ट्रॅक' (जी.ओ.ए.टी.) ही नवी मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेच्या माध्यमातून ब्रँडने मोटरस्पोर्ट क्षेत्रातील आपली मजबूत ओळख आणि वाहनांच्या डायनॅमिक क्षमतांचा ठसा उमटविण्याचा प्रयत्न केला आहे. या मोहिमेची सुरुवातच विक्रमी कामगिरीने झाली असून, इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद होईल असा विक्रम स्कोडाने प्रस्थापित केला आहे. कोयंबतूर ऑटोमोटिव्ह स्पोर्ट्स अँड टेक्निकल ट्रेनिंग ट्रॅकवर एका सर्किटवर एकाच उत्पादकाच्या वाहनांचा सर्वात वेगवान मल्टी-कार रिले हा विक्रम स्कोडाच्या पाच वाहनांच्या ताफ्याने नोंदविला. पिट-लेन बदलांसह अवघ्या १२ मिनिटे ३०.९७ सेकंदांत हा रिले पूर्ण करण्यात आला. त्यामुळे स्कोडा ऑटो इंडिया देशातील सर्वात वेगवान वाहन ताफा ठरला आहे.

स्कोडा ऑटोला १३० वर्षांचा जागतिक वारसा लाभला असून मोटरस्पोर्ट क्षेत्रातील १२५ वर्षांच्या इतिहासाची जोड आहे. तसेच ब्रँडच्या प्रतिष्ठित आरएस (रॅली स्पोर्ट) बॅजच्या ५० वर्षांहून अधिक प्रवासालाही या मोहिमेत विशेष महत्त्व देण्यात आले आहे. कंपनीने 'डिफरेंशिएशन' या आपल्या धोरणात्मक भूमिकेला अधिक बळ देत वाहनांच्या सुरक्षितता, अचूकता आणि उत्कृष्ट ड्रायव्हिंग अनुभवावर भर दिला आहे. या मोहिमेबद्दल बोलताना आशिष गुप्ता यांनी सांगितले की, प्रत्येक स्कोडा वाहन हे अचूक नियंत्रण, सुरक्षितता आणि सर्वोच्च दर्जाचा परफॉर्मन्स देण्यासाठी तयार करण्यात आले आहे. मोटरस्पोर्ट डीएनए हा आमच्या प्रत्येक वाहनाचा अविभाज्य भाग आहे. जी.ओ.ए.टी. मोहिमेद्वारे आम्ही 'ट्रॅकवरील स्कोडा'ची नवी ओळख निर्माण करत आहोत.

स्टि अ ि ंगची अचूकता, चेसिसचे संतुलन, ब्रेकिंगमधील विश्वासार्हता आणि चालक-वाहनातील समन्वय यांसारख्या वैशिष्ट्यांमुळे स्कोडाच्या वाहनांना वेगळी ओळख मिळत असल्याचेही त्यांनी नमूद केले.



सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

गुरुवार दि .२१ मे २०२६

### मिलनम डे

उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| १२० ६७० ३३७ | ३-५ | २३० २५८ १२२ | ३६-७५-८१-२९-५४ |

### कल्याण

उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| १२३ १६९ ११४ | ६-२ | १५६ १२९ ११० | ६०-३२-४१-५७-२९ |

### मुंबैम (मेन)

उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| १२५ २६० ४४० | ८-१ | १२८ २९० २२७ | ८६-२१-५३-४९-१० |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |
| 06/04/2026 to 10/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to 17/04/2026 | 569 06 150 | 149 43 670 | 239 45 500 | 133 77 890 | 260 85 140 |
| 20/04/2026 to 24/04/2026 | 578 00 127 | 889 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 01/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 08/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |
| 11/05/2026 to 15/05/2026 | 566 79 270 | 370 04 239 | | | |

# जानेवारीपासूनची आयडीए वाढ लागू करा

## बीएसएनएल-एमटीएनएल पेन्शनधारकांचे आंदोलन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



अहिल्यानगर : १ जानेवारी पासून देय असलेल्या आयडीए वाढीची तात्काळ अंमलबजावणी करावी, तसेच जानेवारी ते मार्च २०२६ या कालावधीतील थकबाकी तत्काळ अदा करावी, या प्रमुख मागण्यांसाठी अहिल्यानगर येथील बीएसएनएल/एमटीएनएल पेन्शनधारकांनी बीएसएनएलच्या मुख्य कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. रणरणत्या उन्हात सुमारे २५० पेन्शनधारकांनी मानवी साखळी तयार करून केंद्र शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

कमिटी ऑफ बीएसएनएल/एमटीएनएल पेन्शनर्स असो. अहिल्यानगर शाखेच्यावतीने हे आंदोलन करण्यात आले. देशव्यापी आंदोलनाचा भाग म्हणून आयोजित करण्यात आलेल्या या आंदोलनात बीएसएनएलचे विद्यमान कर्मचारी तसेच सेवानिवृत्त कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलनामुळे बीएसएनएल कार्यालय परिसरात काही काळ घोषणाबाजी आणि निदर्शनाने दणाणला.

जिल्हा सचिव आप्पासाहेब गागरे, दत्तात्रय भोर, शंकर घुगे, रवींद्र शिंदे आणि सुधाकर पवार यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. यावेळी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी केंद्र शासनाच्या धोरणांवर तीव्र नाराजी व्यक्त करत पेन्शनधारकांवर अन्याय होत असल्याचा आरोप केला.

आंदोलनकर्त्यांनी सांगितले की, सार्वजनिक उपक्रम विभागाने दिनांक २७ फेब्रुवारी रोजी काढलेल्या आदेशामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. या आदेशानुसार ०१ जानेवारी २०२६ पासून लागू होणारी आयडीए वाढ अधिसूचित करण्यात आली होती; मात्र त्यामध्ये आर्थिक परिणाम (झरीर ५) संदर्भातील असामान्य अट समाविष्ट करण्यात आली. त्यामुळे प्रत्यक्षात पेन्शनधारकांना वाढीचा लाभ मिळू शकला नाही.

यानंतर देशभरातील सुमारे चार लाख पेन्शनधारकांनी १६ एप्रिल २०२६ रोजी देशव्यापी आंदोलन केले होते. या आंदोलनानंतर डीपीईने २४ एप्रिल २०२६ रोजी नवीन आदेश जारी करून १ एप्रिल २०२६ पासून लागू होणारी आयडीए वाढ अधिसूचित केली. विशेष म्हणजे या नव्या आदेशात आर्थिक परिणाम ही अट वगळण्यात आली. मात्र, १ जानेवारी २०२६ पासून देय असलेली आयडीए वाढ अद्याप लागू करण्यात आलेली नसल्याने आणि जानेवारी ते मार्च २०२६ या कालावधीतील थकबाकीही न मिळाल्याने पेन्शनधारकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

आंदोलनकर्त्यांनी यावेळी दोन प्रमुख मागण्या मांडल्या. त्यामध्ये १ जानेवारी २०२६ पासून देय असलेली आयडीए/डीआर वाढ तात्काळ लागू करून जानेवारी ते मार्च २०२६ या कालावधीतील थकबाकी अदा करावी, तसेच सीसीए कार्यालयांकडून दूरसंचार विभागाच्या हस्तक्षेपाशिवाय आयडीए वाढ आपोआप लागू करण्याची पूर्वीची पद्धत पुन्हा सुरू करावी, या मागण्यांचा समावेश आहे.

---

## द•ख•ल

### अहिल्यानगर इस्कॉनतर्फे भागवत कथा महोत्सव ; येत्या सोमवारपासून आयोजन

**अहिल्यानगर :** आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघाच्या (इस्कॉन) अहिल्यानगर शाखेच्या पुढाकाराने अधिक मासानिमित्त श्रीमद् भागवत कथा महोत्सवाचे आयोजन येथे करण्यात आले आहे. येत्या सोमवारपासून (२५ मे) ते रविवार ३१ मे २०२६ या काळात रोज सायंकाळी साडेपाच ते साडेआठ या वेळेत पुणे इस्कॉनचे मार्गदर्शक रेवतीनंदन दास यांची प्रवचने होणार आहेत. नवीन टिळक रस्त्यावरील माऊली सांस्कृतिक भवनात (नंदनवन लॉन्स शेजारी, अहिल्यानगर) येथे हा कथा महोत्सव होणार आहे. कीर्तन, कथा, आरती व महाप्रसाद उपक्रम यात होणार आहेत. गिरीवरधारी दास, डॉ. सतीश फाटके, वैष्णवतोष्णी दास व अंजली राधादेवी दासी यांच्यासह अन्य सदस्यांच्या पुढाकाराने हा उपक्रम होणार आहे. अधिक माहितीसाठी ९६७३३९३८७२ यावर संपर्क साधावा. या श्रीमद् भागवत कथा महोत्सवात भाविकांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच श्रीमद् भगवतगीता आणि श्रीमद् भागवतम् यावर आधारित साप्ताहिक सत्संग कार्यक्रम दर बुधवारी संध्याकाळी ७ ते ८.३० या वेळेत डॉ. सतीश फाटके यांच्या निवासस्थानी असलेल्या सत्संग केंद्रात (वृंदावन बंगला, पॅरेडाईज हॉटेलसमोर, नवीन टिळक रोड, अहिल्यानगर) होतो. या सत्संगानंतर महाप्रसाद वाटप होते. यातही भाविकांनी सहभागाचे आवाहन करण्यात आले आहे.

### दत्तात्रय आभाळे यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब राष्ट्रीय पुरस्कार



**अहिल्यानगर :** येथील शालेय शिक्षक दत्तात्रय पांडुरंग आभाळे यांना सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार २०२६' जाहीर करण्यात आला आहे. नाशिक येथील ज्ञानदीप सामाजिक विकास संस्थेच्या वतीने हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते त्यांचा गौरव केला जाणार आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा शनिवार, दि. २३ मे रोजी सायंकाळी ४ वाजता नाशिक येथील वावरेनगर, कामटवाडे येथे आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यास रिपब्लिकन सेनेचे ड. अमन आंबेडकर (डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पंतू), नाशिक पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, समाजकल्याण विभागाचे उपायुक्त भगवान वीर, जिल्हा पुरवठा अधिकारी रमेश गायकवाड, रिपब्लिकन सेनेचे राज्य प्रवक्ते अविनाश शिंदे तसेच मनपा सहाय्यक उपायुक्त नानासाहेब साळवे आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष डॉ. अनिल आठवले आणि सचिव मिलिंद कळवणकर यांनी दिली. संगमनेर तालुक्यातील नांदूर खंदरमाळ येथील भगवती माता विद्यालयात कार्यरत असलेले दत्तात्रय आभाळे यांनी आपल्या कार्यातून शिक्षण आणि समाजसेवेचा अनोखा संगम घडवून आणला आहे. अकलापूर हे त्यांचे मूळ गाव असून, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी शिक्षण पूर्ण केले. बालवयातच पितृछत्र हरपल्यानंतर आई आणि काकांच्या सहकार्याने त्यांनी शिक्षणाची वाटचाल सुरू ठेवली. आर्थिक आणि कौटुंबिक अडचणींवर मात करत शिक्षक होण्याचे स्वप्न त्यांनी पूर्ण केले.

### हरिहरेश्वर मंदिरात रामकथेचा भक्तिमय सोहळा उत्साहात; हजारो भाविकांची उपस्थिती



**अहिल्यानगर :** तपोवन, सूर्यनगर येथील हरिहरेश्वर मंदिर येथे ह.भ.प. श्रीनिवास महाराज घुगे (आळंदी) यांच्या मधुर वाणीतून आयोजित श्रीराम कथा व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. सात दिवस चाललेल्या या धार्मिक सोहळ्यासाठी परिसरातील हजारो भाविकांनी उपस्थित राहून रामभक्तीचा लाभ घेतला. कथे दरम्यान महाराजांनी प्रभू श्रीराम आणि केवट यांच्या भेटीचा प्रसंग अत्यंत हृदयस्पर्शी शब्दांत उलगडला. गंगेच्या पलीकडे प्रभू श्रीरामांना नावेतून पोहोचविणारा केवट हा भिल्ल समाजातील होता. मात्र प्रभू श्रीरामांनी त्याच्या जाती-पातीचा विचार न करता त्याला प्रेम, सन्मान आणि आपलेपण दिले. यामधून भगवान रामांनी समता, मानवता आणि भक्ती श्रेष्ठ असल्याचा संदेश दिल्याचे महाराजांनी सांगितले. प्रभू श्रीरामांनी मोबदला म्हणून अंगठी देऊ केली असता केवटाने नम्रपणे नकार दिला. प्रभू, माझा आणि तुमचा धंदा एकच आहे. तुम्ही संसाररूपी भवसागरातून लोकांना तारता, तर मी नदीतून लोकांना पार नेतो. मला कोणताही मोबदला नको, फक्त हा हात धरला तो कधी सोडू नका, असे केवटाने भावपूर्ण शब्दांत सांगितल्याचे वर्णन करताच अनेक भाविक भावूक झाले. वनवास संपवून परत येताना मला विसरू नका, माझ्याच नावेतून प्रवास करा, ही केवटाची विनवणी भक्तांच्या मनाला स्पर्शून गेली.

### पं. जवाहरलाल नेहरू यांच्या पुतळ्याचा अवमान : काँग्रेस पक्षाकडून तीव्र निषेध

**अहिल्यानगर :** लालटाकी परिसरात उभारण्यात आलेल्या भारताचे पहिले पंतप्रधान, आधुनिक भारताचे शिल्पकार पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या पूर्णाकृती पुतळ्याबाबत काही व्यक्तींनी केलेली हटवण्याची मागणी केली. ही बाब अत्यंत दुर्दैवी, निषेधार्ह आणि इतिहासाचा अपमान करणारी आहे. अशी तीव्र प्रतिक्रिया काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण यांनी व्यक्त केली आहे.लालटाकी येथील हा पुतळा तत्कालीन नगराध्यक्ष नवनीतभाई बार्शीकर यांच्या कार्यकाळात उभारण्यात आला होता. त्या काळात या परिसरात सुंदर बगीचा, धबधब्यासारखे आकर्षक कारंजे, विद्युत रोषणाई आणि उत्कृष्ट सजावट करण्यात आली होती. हा परिसर नगरच्या वैभवाचे प्रतीक मानला जात होता. पंडित नेहरू यांचा पुतळा ही नगरची शान होती. मात्र आज त्या परिसरात अस्वच्छता, कचरा आणि दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे. येथे साफसफाई होत नसल्यास ती जबाबदारी पूर्णपणे महानगरपालिका प्रशासनाची आहे. आरोग्य विभाग आणि उद्यान विभागाने नियमित स्वच्छता व देखभाल केल्यास हा प्रश्न सहज मार्गी लागू शकतो. परिसरात अवैध प्रकार सुरू असतील किंवा काही तळीराम तेथे बसून मद्यप्राशन करत असतील तर त्यावर नियंत्रण ठेवणे हे पोलीस प्रशासन आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाचे कर्तव्य आहे. त्यामुळे प्रशासनाच्या अपयशाचे खापर पंडित नेहरू यांच्या पुतळ्यावर फोडणे चुकीचे आहे. या परिसराच्या सुशोभीकरणाबाबत तत्कालीन नगरसेविका शीला दीप चव्हाण यांनी मनपाला ज्यावेळी स्वच्छ सर्वेक्षण अभियानात ५ कोटी रुपयांचे बक्षीस मिळाले होते. त्या निधीतून हे सुशोभीकरण करण्याची मागणी लेखी पत्राद्वारे केली होती. पण मनपा प्रशासनाने त्याकडं सोयीस्करपणे दुर्लक्ष केले. ही दुर्दैवाची बाब आहे. अशा थोर नेत्याबद्दल एखाद्या किरकोळ व्यक्तीने प्रसिद्धीसाठी थातूरमातूर पत्रकबाजी करून अपमानास्पद वक्तव्य करणे काँग्रेस पक्ष कदापिही सहन करणार नाही.

---

# ग्लोबल ट्रेडिंग कंपनीला आग लाखोचे नुकसान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : नगरच्या एमआयडीसी येथील निंबळक रस्त्यावर असलेल्या ग्लोबल ट्रेडिंग कंपनीला बुधवारी दुपारच्या सुमारास भीषण आग लागली. क्षणार्धात याआधीने रौद्ररूप धारण केल्याने कंपनीतील साहित्य जळून खाक झाले. या घटनेमुळे परिसरात धुराचे साम्राज्य पसरले होते. घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी अग्निशामक दल व महापालिका अग्निशामक दलाच्या बंबांनी घटनास्थळी येऊन तुफानी पाण्याचा मारा केल्याने आग विझवण्यात यश मिळाले. या घटनेत लाखो रुपयांचे साहित्य जळून खाक झाले.सुदैवाने या घटनेत जीवितहानी टळली. याबाबत सविस्तर माहिती अशी की, नगरच्या एमआयडीसीमध्ये निंबळक शिवारात रेल्वे मार्गा जवळ ग्लोबल ट्रेडिंग कंपनी आहे.या कंपनीत स्टील तसेच स्क्रॅप मटेरियल चे काम केले जाते. या कंपनीत बुधवारी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास अचानक आग लागली. उन्हाळ्याची तीव्रता लक्षात घेता किरकोळ स्वरूपात लागलेल्या आगीने क्षणार्धात रौद्ररूप धारण केले. या आगीच्या विळख्यात कंपनीतील स्टिल व स्क्रबचे मटेरियल जळून खाक झाले. या आगीच्या घटने नंतर परिसरात दुराचे लोळ पसरले. या धुरामुळे इतर कंपन्यामधील कामगारानी घटनास्थळाबाहेर मोठी गर्दी केली होती. या घटनेची माहिती एमआयडीसी व महापालिकेच्या अग्निशामक दलाला देण्यात आली. घटनेची माहिती मिळतात एमआयडीसी व महापालिका अग्निशामक दलाच्या बंबांनी घटनास्थळी येऊन पाण्याचा तुफानी मारा केल्याने आग विझविण्यात यश मिळाले. या घटनेमध्ये कंपनीतील लाखो रुपयांचे साहित्य जळून खाक झाले. मात्र सुदैवाने कुठलीही जीवित हानी झाली नाही. ही आग नेमकी कशामुळे लागली? याची माहिती समजू शकली नाही. मात्र शॉर्टसर्किटमुळे ही आग लागली असावी असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

---

# जिल्हा प्राथमिक शिक्षक बँकेच्या चेअरमनपदी सरस्वती घुले, शिवाजी कराड व्हा.चेअरमन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



अहिल्यानगर : जिल्हा प्राथमिक शिक्षक बँकेचे चेअरमन, व्हॉईस चेअरमन पदाची निवड प्रक्रिया शिक्षक बँकेत पार पडली. चेअरमन पदी संगमनेरच्या संचालिका श्रीमती सरस्वती घुले-सहाणे यांची तर व्हाईस चेअरमन पदी श्री शिवाजी कराड यांची निवड करण्यात आली. जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे साहेब यांच्या उपस्थितीत झालेल्या निवडीत जिल्ह्यातील महिला शिक्षकांच्या प्रतिनिधी म्हणून श्रीमती सरस्वती घुले मॅडम यांची चेअरमन पदी निवड करण्यात आली. नॉन टीचिंग मतदार संघाला प्राधान्य देत श्री शिवाजी कराड साहेब यांची बिनविरोध व्हाईस चेअरमन पदी निवड करण्यात आली. मावळते चेअरमन श्री गोरक्षनाथ विटनोर व व्हाईस चेअरमन श्री ज्ञानेश्वर शिरसाठ यांनी राजीनामा दिल्याने सदर निवडी करण्यात आल्या. चेअरमन पदाची सूचना श्री संदीप मोटे पाटील यांनी मांडली. अनुमोदन श्रीमती निर्गुणा बांगर-कापसे यांनी दिले. तर व्हाईस चेअरमन पदाची सूचना ज्ञानेश्वर शिरसाठ यांनी मांडली तर अनुमोदन आण्णासाहेब आभाळे यांनी दिले. चेअरमन पदासाठी झालेल्या निवडणुकीत १७ विरुद्ध ४ मतांनी श्रीमती सरस्वती घुले यांनी बाजी मारली. श्री शिवाजी कराड यांची व्हॉईस चेअरमनपदी बिनविरोध निवड झाली.

निवडीनंतर बोलताना शिक्षक नेते बापूसाहेब तांबे यांनी आगामी २०२७ साली होणाऱ्या निवडणुकीत गुरुमाऊली-सदिच्छा मंडळ व आघाडी पुन्हा निवडून येणार असल्याचा विश्वास व्यक्त केला. तसेच जिल्ह्यातील तमाम प्राथमिक शिक्षिका या आमच्या लाडक्या बहिणी असून त्यांचे प्रतिनिधित्व श्रीमती घुले मॅडम या करत आहेत. सत्काराला उत्तर देताना नूतन चेअरमन श्रीमती सरस्वती घुले यांनी नेत्यांच्या विश्वासास पात्र राहून शिक्षक बँकेचा नावलौकिक वाढविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.

श्रीमती विद्युलता आढाव यांच्यासह सर्वश्री गोकुळ कळमकर, शरद भाऊ सुद्रिक, राजेंद्र ठोकळ, मा. चेअरमन संदीप मोटे पाटील, संचालक कल्याण लवांडे आदींनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी दत्ता पाटील कुलट, राजेंद्र सदगीर, अर्जुन शिरसाठ, बाबासाहेब खरात, शरद भाऊ सुद्रिक, रविकिरण साळवे, बबनदादा गाडेकर, संतोष दुसुंगे, संतोष भोपे, रमेश दरेकर, विजय ठाणगे, पी.डी. सोनवणे, नारायण पिसे, आबासाहेब दळवी, राजेंद्र ठोकळ, प्रवीण झावरे, राजेंद्र निमसे, साहेबराव अनाप, बाळासाहेब कापसे, भास्करराव कराळे, प्रल्हाद भालेकर, सुयोग पवार, संतोष मगर, संभाजी आढाव, बाळासाहेब चाबूकस्वार, बाबाजी डुकरे पाटील, कैलास सहाणे, सुनील ढेरंगे, विठ्ठलराव काकडे, विठ्ठलराव काळे, सचिन नाबगे, सरसराम तांबे, चंद्रकांत नरसाळे आदींसह संघ व मंडळाचे तालुकाध्यक्षांसह मोठ्या संख्येने शिक्षक उपस्थित होते. मावळते चेअरमन गोरक्षनाथ विटनोर यांनी सर्वांचे आभार मानले.

संचालक सर्वश्री रामेश्वर चोपडे, बाळासाहेब तापकीर, योगेश वाघमारे, कारभारी बाबर, कैलास सारोक्ते, शशिकांत जेजुरकर, माणिक कदम, महेश भनभणे आदींसह मुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत जगताप उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा संघाचे सरचिटणीस प्रकाश नांगरे यांनी केले.

---

# दळवी मळा, सर्वोदय, सागरिका कॉलनीत पेव्हिंग ब्लॉक कामांचा शुभारंभ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



अहिल्यानगर : महानगरपालिका ही नागरिकांना मूलभूत सेवा-सुविधा देणारी संस्था असून नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित प्रश्न सोडविणे हीच खरी लोकसेवा आहे. शहरातील प्रत्येक प्रभागामध्ये विकासकामे करताना केवळ तात्पुरती नव्हे तर कायमस्वरूपी आणि नियोजनबद्ध कामे होणे गरजेचे आहे. एकदा विकासकामे योग्य पद्धतीने मार्गी लागल्यानंतर तीच कामे पुन्हा करण्याची वेळ येत नाही. नागरिकांना चांगले रस्ते, नियमित पाणीपुरवठा, स्वच्छता, प्रकाश व्यवस्था तसेच ओपन स्पेसच्या माध्यमातून चांगली सार्वजनिक जागा उपलब्ध व्हावी हीच आपली प्राथमिकता असल्याचे प्रतिपादन महापौर ज्योतीताई गाडे यांनी केले.

प्रभाग क्रमांक तीनमधील दळवी मळा, सर्वोदय कॉलनी आणि सागरीका कॉलनी येथे ओपन स्पेस सुशोभीकरण व पेव्हिंग ब्लॉक बसविण्याच्या कामाचा शुभारंभ महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी अशोक पाटील, स्वप्नील गोरे, विजया पाटील, अजय ख्रिस्ती, रामभाऊ ठाणगे, रवींद्र चोबे, वैशाली सूर्यवंशी, सुदाम वाबळे आदींसह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महापौर ज्योतीताई गाडे पुढे म्हणाल्या की, प्रभागातील मूलभूत प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. जमिनीअंतर्गत पिण्याच्या पाण्याच्या लाईन, ड्रेनेज लाईन, स्वच्छता व्यवस्था, रस्ते आणि प्रकाश व्यवस्था यांसारखी अनेक कामे प्राधान्याने पूर्ण करण्यात आली आहेत. नागरिकांच्या सहकार्याने समस्या मुक्त आणि आदर्श प्रभाग निर्माण करण्याचा आपला संकल्प असून एकामागून एक विकासकामे मार्गी लागत आहेत.

त्या पुढे म्हणाल्या की, ओपन स्पेसचे सुशोभीकरण हे फक्त सौंदर्यीकरण नसून नागरिकांना दर्जेदार सार्वजनिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे.

---

# रशियन ग्रँड मास्टर पेट्र किरियाकोव यांचे आकर्षण

## एकाचवेळी ३० खेळाडूंविरुद्ध प्रदर्शनीय सामना

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशन प्रायोजित मोतीलालजी फिरोदिया अखिल भारतीय खुली क्लासिकल आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धा बुधवार दि. २७ मे ते रविवार दि. ३१ मे २०२५ या कालावधीत अहिल्यानगर येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, स्टेशन रोड येथे आयोजित करण्यात आली आहे. अशी माहिती अहमदनगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी दिली.

या स्पर्धेत देशभरातील नामांकित बुद्धिबळपटू सहभागी होणार असून गुजरात, आंध्र प्रदेश, गोवा, तमिळनाडू, महाराष्ट्र आदी राज्यांतील दोनशेहून अधिक खेळाडूंनी आतापर्यंत आपला सहभाग निश्चित केला आहे. तसेच अनेक दिग्गज बुद्धिबळपटूही स्पर्धेत सहभागी होणार असल्याची माहिती संघटनेचे उपाध्यक्ष नरेंद्र कुलकर्णी यांनी दिली.

विशेष म्हणजे अवघ्या साडेपाच वर्षांच्या बाल बुद्धिबळपटूपासून ते ७५ वर्षीय ज्येष्ठ खेळाडूपर्यंत विविध वयोगटातील स्पर्धक या स्पर्धेत आपल्या बुद्धीचे कौशल्य पणाला लावणार असल्याचे सचिव यशवंत बापट यांनी सांगितले.

या स्पर्धेचे प्रमुख आकर्षण ठरणार आहेत रशियन ग्रँड मास्टर पेट्र किरियाकोव. त्यांच्या सहभागामुळे स्पर्धेचा दर्जा अधिक उंचावला असून बुद्धिबळप्रेमींमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे ग्रँड मास्टर पेट्र किरियाकोव हे बुधवार दि. २७ मे रोजी सकाळी ९-३० वाजता लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय येथे एकाचवेळी ३० खेळाडूंविरुद्ध प्रदर्शनीय सामना सुद्धा खेळणार आहेत.

स्पर्धेचे उद्घाटन बुधवार दि. २७ मे रोजी सकाळी ११.३० वाजता होणार असून त्यानंतर स्पर्धेला प्रारंभ होईल. स्पर्धेत एकूण ९ फेऱ्या खेळविण्यात येणार आहेत. अंतिम बक्षीस वितरण समारंभ रविवार दि. ३१ मे रोजी दुपारी ३ वाजता अहमदनगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते होणार आहे.

स्पर्धेतील विविध गटांतील विजेत्यांना रोख पारितोषिके, आकर्षक ८५ करंडके तसेच सर्व सहभागी खेळाडूंना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी संघटनेचे सदस्य सुबोध ठोंबरे, पारूनाथ ढोकळे, शाम कांबळे, प्रशांत गंगेकर, देवेंद्र ढोकळे, मनीष जस्वानी, प्रकाश गुजराती, चेतन कड, संजय खडके, नवनीत कोठारी, डॉ. स्मिता वाघ, सौ. शुभदा ठोंबरे, सौ. रोहिणी अडकर आदी परिश्रम घेत आहेत.

अहमदनगर शहर व जिल्ह्यातील बुद्धिबळप्रेमी आणि खेळाडूंनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

---

# शरद पवारांना शिवरायांची मूर्ती भेट

# 'आपला मावळा'च्या कार्याला नवी ऊर्जा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



अहिल्यानगर : मुंबई येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सभागृहात बुधवारी पार पडलेल्या एका विशेष कार्यक्रमात 'आपला मावळा महाराष्ट्र' संघटनेच्यावतीने आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती ज्येष्ठ नेते शरद पवार यांना सन्मानपूर्वक भेट देण्यात आली. या प्रसंगी खा. नीलेश लंके यांनी उपस्थित राहून संघटनेच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक कार्याचा आढावा मांडला.

छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार, त्यांचे लोककल्याणकारी राज्यकारभार, शौर्य, राष्ट्रनिष्ठा आणि संस्कृती यांचा वारसा समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी 'आपला मावळा महाराष्ट्र' संघटना सातत्याने कार्यरत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. विशेषतः युवकांमध्ये शिवचरित्राविषयी आकर्षण निर्माण व्हावे, इतिहासाचे भान वाढावे आणि महाराष्ट्राच्या परंपरेचा अभिमान जागृत व्हावा, या उद्देशाने विविध उपक्रम राबविले जात असल्याची माहिती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

कार्यक्रमात शरद पवार यांनी संघटनेच्या कार्याचे कौतुक करत उपस्थितांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी खा. नीलेश लंके म्हणाले छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार हे केवळ इतिहासापुरते मर्यादित नसून आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी मार्गदर्शन करणारे आहेत. 'आपला मावळा' संघटनेच्या माध्यमातून शिवरायांचा इतिहास घराघरांत पोहोचविण्याचा प्रयत्न सुरू आहे.

साहेबांनी दिलेली कौतुकाची थाप आणि शुभेच्छा आमच्यासाठी मोठी प्रेरणा आहे. या कार्यक्रमाला खा. सुप्रिया सुळे, खा. बजरंग सोनवणे, खा. सुरेश म्हात्रे यांच्यासह 'आपला मावळा' संघटनेचे राज्य सचिव प्रा. सीताराम काकडे, सुरज मोरे, मोइन काश्मीरी आणि अन्य सहकारी उपस्थित होते.

---


## जाहीर नोटीस

तमाम नागरीकांना, सहकारी सोसायटी, सर्व खाजगी व सरकारी बँका, खाजगी सावकार, व्यक्ती व नातेवाईक यांना कळविणेत येते की, मौजे कोंभाळणे ता. अकोले, जि. अहिल्यानगर येथील खालील नमुद यांच्या मालकीच्या ताब्यातील व कब्जेवहीवाटीतील शेतजमिन मिळकती आहेत.

| अ. नं. | जमिन मालकांचे नाव | सर्वे क्र.व गट क. | क्षेत्र हेक्टर आर | जमिनीचे एकूण क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १. | तुकाराम भागुजी सदगीर | ६२४ | ३.६५ | ९.१२५ |
| २. | पुंजा खंडू सदगीर | ६२५ | ०.५८ | १.४५ |
| ३. | तुकाराम भागुजी सदगीर | ६२६ | २.८ | ७ |
| ४. | रावसाहेब पंढरी सदगीर | ६९७ | १.७४ | ४.३५ |
| ५. | सावित्राबाई केरू आमले | ६९७ | १.६० | ४ |
| | एकूण जमिन | | १०.३७ | २५.९२५ |

सदरहू आमचे पक्षकार Ceigall Green Energy MH1 Limited Office A-898, Tagore Nagar, Ludhiana 141001 Punjab यांना भाडेपट्टा कराराने देण्याचे विचारात आहेत. तरी सदर मिळकती संबंधी कोणाचेही हक्क, कर्ज, हितसंबंध दस्त असल्याचे त्यांनी ही नोटीस जाहीर होताच आठ दिवसांत मुळ दस्तऐवजासह आमचे पक्षकारांना भेटून आमचे व पक्षकाराचे समाधान करावे. त्यानंतर कोणीही काहीही हरकत घेतल्यास किंवा कोणाचा काही दस्त किंवा व्यवहार असल्यास तो आमचे पक्षकार जाहीर नोटीस प्रसिद्ध करणार यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी. सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहिती व अधिकारावरुन आमचे मार्फत प्रसिद्ध केली असे.

दि.- २१/०५/२०२६

जाहीर नोटीस प्रसिद्ध करणाऱ्यांच्या तर्फे
ॲड. योगेश्वर हरिभाऊ पवार
पत्ता- पाईपलाईन रोड, श्रीराम चौक,
कृष्णा कॉम्पलेक्स, पहिला मजला, शॉप
नं- १०६ ता. जि. अहिल्यानगर, पिन- ४१४००१
मो.७९७२९४९६७४

द•ख•ल

## रांजणगाव गणपती-हिवरे- पाबळ- राजगुरूनगर रस्ता दुरुस्तीची मागणी

**पाबळ :** रांजणगाव गणपती – हिवरे–पाबळ–राजगुरूनगर हा प्रमुख मार्ग सध्या अत्यंत खराब अवस्थेत असून ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या मार्गावरुन दररोज रांजणगाव औद्योगिक वसाहतीमध्ये कामासाठी जाणारे कर्मचारी, शेतकरी, व्यापारी तसेच शाळकरी विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर प्रवास करत असतात. मात्र या रस्त्याची झालेली दुरवस्था पाहता अपघातांचा धोका वाढला असून अनेक ठिकाणी वाहनांचे नुकसान होत आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने वाहनचालकांना रस्ता ओळखणे कठीण होत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. स्थानिक ग्रामस्थांनी संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ दखल घेऊन रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी केली आहे. तसेच भविष्यात मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी प्रशासनाने त्वरित उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षाही नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.



## विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव करत वात्सल्य सिंधू फाउंडेशनचे प्रेरणादायी सामाजिक कार्य

**शिरूर :** समाजातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत त्यांच्या यशाचा गौरव करण्याचे उल्लेखनीय कार्य वात्सल्य सिंधू फाउंडेशनच्या माध्यमातून सातत्याने करण्यात येत आहे. सामाजिक, शैक्षणिक व मानवतावादी उपक्रमांद्वारे संस्था परिसरात आपली वेगळी ओळख निर्माण करत आहे. इयत्ता १० वी परीक्षेत ९७.४० टक्के गुण मिळवत घवघवीत यश संपादन करणाऱ्या प्रणव बढे यांचा वात्सल्य



सिंधू फाउंडेशनच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला. संस्थेच्या अध्यक्षा सुनंदा विजय लंघे व सचिव उषा शैलेंद्र वाखारे यांनी प्रणव यांना पुष्पगुच्छ व टॉफी देऊन अभिनंदन केले तसेच पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या यशामुळे माजात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करून इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा देण्याचा संस्थेचा प्रयत्न असल्याचे सांगितले. वात्सल्य सिंधू फाउंडेशनच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम, गरजू विद्यार्थ्यांना मदत, महिला सक्षमीकरण तसेच समाजोपयोगी कार्य सातत्याने राबविले जात असून संस्थेच्या या कार्याचे परिसरातून कौतुक होत आहे.

## ऑटोरिक्षा व मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळासाठी नोंदणीचे आवाहन

**पुणे :** महाराष्ट्र शासनाने राज्यातील ऑटोरिक्षा व मिटर्ड टॅक्सी चालकांच्या कल्याणासाठी धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र ऑटोरिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळ स्थापन केले आहे. या मंडळाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी ऑटोरिक्षा व मिटर्ड टॅक्सी चालकांनी अधिकृत संकेतस्थळावर वाहनांची ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणीसाठी अर्जदाराकडे अनुज्ञप्ती, बॅज, वाहन परवाना, शिधापत्रिका, आधारकार्ड व पॅनकार्ड असणे आवश्यक आहे. पात्र अर्जदारांनी https://ananddighekalyankaimandal.o या संकेतस्थळावर ऑनलाईन सभासद नोंदणी करावी. तरी सर्व ऑटोरिक्षा व मिटर्ड टॅक्सी चालक-मालकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पुणे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी केले आहे. ज्या सभासदांनी दिनांक १ जानेवारी २०२६ रोजी वयाची ६५ वर्षे पुर्ण केलेली आहेत, तसेच १ मे २०२६ पर्यत धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र ऑटोरिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालक मालक कल्याणकारी मंडळाअंतर्गत सभासद नोंदणी केलेली आहे अशा सभासदांना सन्मान निधी योजनेअंतर्गत दहा हजार रुपये इतका लाभ देण्यात येणार आहे, असेही प्रसिद्धीपत्रकान्वे कळविले आहे.

## साडे तीनशेहून अधिक स्वयंसेवकांना क्षमता बांधणी व विकास प्रशिक्षण

**पुणे :** ''ऑफ सिंदूर पक्षात ''ऑफ अभ्यास'' अंतर्गत ३६० स्वयंसेवकांना ''क्षमता बांधणी व विकास प्रशिक्षण'' देण्यात आलेले आहे. याअंतर्गत पाठ्यक्रम पुर्ण करणाऱ्या स्वयंसेवकांना प्रशस्तीपत्र देऊन प्रोत्साहित करण्यात आले. केंद्रीय गृह विभाग व राज्य गृह विभागाकडून शासनाच्यावतीने उपनियंत्रक नागरी संरक्षण दलामार्फत सेवाभवन, पांडुरंग कॉलनी, एरंडवणे येथे आयोजित करण्यात आला. यावेळी पोलीस उपायुक्त ऋषिकेश रावले, नगरपरिषद प्रशासन सहाय्यक आयुक्त, प्रताप भोसले, राष्ट्रीय सेवा योजनेचे विंग कमांडर शैलेंद्र मराठे, कर्नल निशाद मंगळुरकर, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी विठ्ठल बनोटे आदी उपस्थित होते. प्रशिक्षण सत्रामध्ये प्रशिक्षणार्थींना प्रत्यक्ष युध्दाच्या वेळेस सीमेवर भुदल, नौदल आणि वायुदलाचे सैनिकी बल कर्तव्य करीत असतातच परंतु, प्रत्यक्ष नागरिकांमध्ये युध्दाच्या परिस्थितीमध्ये नागरी संरक्षण दलांची भूमिका ही फार महत्वाची असते. याच धर्तीवर या प्रशिक्षण देण्यात आलेले असून प्रशिक्षणार्थींनी या प्रशिक्षणाचा उपयोग युध्दाच्या परिस्थितीत करावा. अधिकाधिक नागरिकांना प्रशिक्षण, प्रबोधन देण्यात यावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत, अशी माहिती सहायक उपनियंत्रक नागरी संरक्षण अर्जून कुऱ्हाडे यांनी प्रसिद्धीपत्रकान्वे दिली आहे.

# विकसित महाराष्ट्राचे उद्दिष्ट गाठण्यासाठी क्षमता बांधणी आराखडा महत्त्वाचाः अपर मुख्य सचिव व्ही. राधा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** विकसित महाराष्ट्राचे उद्दिष्ट गाठण्यासाठी प्रत्येक अधिकारी आणि कर्मचाऱ्याच्या क्षमता विकासाचा विचार करावा लागेल. त्यासाठी क्षमता बांधणी आराखडा निर्मिती हा महत्त्वाचा टप्पा असून अधिकाऱ्यांनी कर्तव्यासोबत नव्या गोष्टी जाणून घेत आपली वैयक्तिक प्रगती साधण्याचा आनंद घेण्यासाठी या विषयाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, असे आवाहन सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांनी केले.

यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी येथे क्षमता बांधणी आराखड्याच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी आयोजित कार्यशाळेत त्या बोलत होत्या. कार्यशाळेला यशदाचे महासंचालक डॉ. सुहास दिवसे, उपमहासंचालक सचिन कलंत्रे, सामान्य प्रशासन विभागाच्या उपसचिव नीता शिंदे, डिजिटल लर्निंग लॅब प्रमुख कल्याणी गोखले, संचालक शाहूराज मोरे आदी उपस्थित होते.

श्रीमती व्ही. राधा म्हणाल्या, प्रशासनाच्या शेवटच्या स्तरावरील कर्मचाऱ्याच्या क्षमता बांधणीचा विचारही आराखडा तयार करताना करायचा आहे. प्रत्येक पदासाठी आवश्यक कौशल्य, तंत्रज्ञान आदींचा विचार करून प्रशिक्षण वेळापत्रक तयार करावे. प्रत्येक पदानुसार कर्तव्य आणि जबाबदाऱ्या निश्चित करून त्याअनुषंगाने आराखडा तयार करावा. कार्यात्मक आणि वर्तणूक संदर्भातील क्षमतांना विविध टप्प्यात आत्मसात करण्याजोगा प्रशिक्षण आराखडा तयार करावा.

अधिकाऱ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग करून क्षमता बांधणी आराखडा तयार करण्यात घेतलेला पुढाकार लक्षात घेता महाराष्ट्र हे क्षमता बांधणी कार्यक्रमात अग्रेसर राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. उत्तम कार्यक्षमतेद्वारे चांगली सेवा देण्यासाठी आणि त्या माध्यमातून राज्याला विकासाच्या वाटेवर पुढे नेण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

डॉ. दिवसे यांनीदेखील यावेळी मार्गदर्शन केले. नियमाधारित ऐवजी भूमिका आधारित प्रशासनाचा विचार करून क्षमता बांधणी आराखडा तयार करायचा आहे. विभागाच्या क्षमता, कार्य याबाबत आराखड्यामुळे संकल्पना स्पष्ट होतात. शिवाय या प्रशिक्षण आराखड्याला पदोन्नती आणि सेवा विषयक बाबींशी जोडण्यात येणार असल्याने अत्यंत सूक्ष्मरितीने आराखडा तयार करावा, असे आवाहन त्यांनी केले.



यावेळी श्री. कलंत्रे यांनी क्षमता बांधणी आराखडा तयार करण्याबाबत मार्गदर्शन केले आणि अधिकाऱ्यांच्या शंकाचे निरसन केले. विविध विभागाच्या अधिकाऱ्यांनी तयार केलेल्या आराखड्याचे सादरीकरण केले.

## माऊलींच्या रथासाठी रानवडे घराण्याच्या बैलजोडीला मान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या आषाढी पायीवारी सोहळ्यातील रथासाठी यंदा आळंदीतील रानवडे घराण्याच्या बैलजोडीची निवड करण्यात आली आहे. माऊलींच्या रथासाठी बैलजोडी जुंपण्याचा मान हा परंपरेने कुऱ्हाडे, रानवडे, भोसले, वाहिले, घुंडरे आणि वरखडे या अलंकापुरीतील ग्रामस्थांना दिला जातो.

यंदाचा आषाढी पायीवारी प्रस्थान सोहळा ८ जुलै रोजी आळंदीहून पंढरपूरकडे रवाना होणार आहे. या पार्श्वभूमीवर बैलजोडी निवड समितीची विशेष बैठक पार पडली. या बैठकीत प्रगतशील शेतकरी हर्षवर्धन रानवडे आणि तुळशीराम रानवडे यांच्या बैलजोडीला रथ ओढण्याचा मान देण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.




बैठकीस बैलजोडी समितीचे अध्यक्ष बबनराव कुऱ्हाडे, उपाध्यक्ष शिवाजीराव रानवडे, विलास घुंडरे, नंदकुमार कुऱ्हाडे, रामदास भोसले, रमेश कुऱ्हाडे उपस्थित होते. दरम्यान, बैलजोडीचा मान जाहीर झाल्यानंतर समितीचे अध्यक्ष बबनराव कुऱ्हाडे यांच्या हस्ते हर्षवर्धन रानवडे व तुळशीराम रानवडे यांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी रानवडे कुटुंबीयांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, माऊलींच्या पवित्र रथासाठी आमच्या बैलजोडीची निवड होणे, हा आमच्या कुटुंबासाठी अत्यंत अभिमानाचा आणि भाग्याचा क्षण आहे. ही सेवा म्हणजे आमच्यासाठी केवळ मान नसून माऊलींचे आशीर्वाद आहेत. वारकरी परंपरेतील ही सेवा प्रामाणिकपणे आणि भक्तिभावाने पार पाडण्याचा आमचा प्रयत्न राहील. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात रथासाठी बैलजोडीचा मान मिळाल्याने रानवडे कुटुंबात आनंदाचे वातावरण असून, परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## निरा बाजार समितीमध्ये गुळाची मोठी उलाढाल आवक वाढल्याने व्यापाऱ्यांची लगबग

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नाझरे सुपे :** पुरंदर तालुक्यातील निरा येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये १४ मे २०२६ रोजी गुळाच्या बाजारात मोठी उलाढाल झाली. गुळ उत्पादक शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात आपला माल विक्रीसाठी आणल्याने बाजार आवारात लगबग दिसून आली. एकूण ६९१ बॉक्सची आवक आणि १३८ क्विंटल गुळाचा लिलाव यावरून निरा बाजारपेठेतील गुळाची मागणी कायम असल्याचे स्पष्ट होत आहे.

**गुणवत्तेवर आधारित दरांचे चित्र**

बाजार समितीने जाहीर केलेल्या माहितीनुसार, गुळाच्या दरात मालाची प्रत आणि गुणवत्ता यानुसार चढ-उतार दिसून आले. लिलावामध्ये सर्वात कमी दर ४४०० रुपये प्रति क्विंटल राहिला, तर उत्कृष्ट प्रतीच्या गुळाला ४५२५ रुपये प्रति क्विंटल इतका उच्चांकी दर मिळाला. या दोन दरांमधील तफावत पाहता, बाजारात उत्तम प्रतीच्या मालाला व्यापारी अधिक पसंती देत असल्याचे दिसून येते. दिवसभरातील सर्व व्यवहारांची सरासरी काढता, प्रति क्विंटल ४४६० रुपयांचा भाव स्थिर राहिला आहे.

**शेतकऱ्यांसाठी फायदेशीर बाजारपेठ**मनिरा बाजार समिती ही नेहमीच शेतमालाच्या विक्रीसाठी एक विश्वसनीय केंद्र मानली जाते. गुळाच्या दरात दिसून आलेली स्थिरता आणि सरासरी ४४६० रुपयांचा दर उत्पादकांना दिलासा देणारा ठरला आहे. बाजारात आवक वाढल्यामुळे व्यापाराला गती मिळाली असून, स्थानिकांना रोजगार आणि व्यापार्यांना मालाची उपलब्धता सहज होत आहे.

**बाजार समितीचे धोरण**

बाजार समितीच्या वतीने शेतकऱ्यांना सातत्याने आवाहन केले जात आहे की, माल विक्रीसाठी आणताना तो योग्य प्रकारे पॅक केलेला आणि स्वच्छ असावा. मालाची प्रत सुधारल्यास जास्तीत जास्त दर मिळण्याची शक्यता वाढते, हे आजच्या लिलावातून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. १४ मे रोजी झालेल्या या व्यवहारांमुळे निरा बाजार समितीतील गुळाच्या व्यापाराने आपल्या स्थिरावलेल्या स्थितीचा आलेख कायम ठेवला आहे.

## भराडीतील दोन डीपींच्या तारा चोरी; शेतकरी संकटात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वळती :** आंबेगाव तालुक्यातील भराडी येथील गावडे मळा परिसरातील दोन विद्युत डीपीमधील तांब्याच्या तारा अज्ञात चोरट्यांनी मंगळवारी (१९ मे) मध्यरात्री चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या चोरीमुळे परिसरातील वीजपुरवठा खंडित झाला असून शेतकरी मोठ्या संकटात सापडले आहेत.



आधीच कमी दाबाचा वीजपुरवठा, ४५ अंशांवरील वाढते तापमान, बंधाऱ्यातील अत्यल्प पाणीसाठा आणि दिवसाआड पिकांना पाणी देण्याची वेळ आलेली असताना या घटनेमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. वीजपुरवठा खंडित झाल्याने शेतीपंप बंद पडले असून पिकांच्या सिंचनाचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे भाजीपाला, ऊस व इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिस पाटील संतोष खिलारी यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली तसेच याबाबतची माहिती पोलिसांना दिली. गावडे मळा परिसरातील नागरिकांनी यापूर्वीही कमी दाबाच्या वीजपुरवठ्याबाबत अनेकदा तक्रारी केल्या होत्या. त्यातच आता डीपीमधील तारा चोरीची घटना घडल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, महावितरण प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन वीजपुरवठा पूर्ववत करावा, चोरी करणाऱ्या अज्ञात चोरट्यांचा शोध घेऊन कठोर कारवाई करावी तसेच शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. पुढील तपास पारगाव पोलीस करत आहेत.

## शंभु फाऊंडेशनच्या वतीने छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीला रक्तदान शिबीर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस ;** छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंती निमित्त पुरंदर तालुक्यातील शंभु फाऊंडेशनच्या वतीने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले.यात १०५ जणांनी रक्तदान केले.शंभु फाऊंडेशनच्या कामाचे कौतुक केले जात आहे. शंभु फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शिद्धनाथ यादव यांच्या मार्गदर्शनाखाली सासवड येथे मोहीम क्र २९ अंतर्गत रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले.छत्रपती संभाजी महाराजांच्या मुर्तीचे पुजन करुन रक्तदान शिबीरास सुरुवात करण्यात आली. सकाळ पासुनच रक्तदानास गर्दी होती . विशेष म्हणजे यवत, कुंजीरवाडी,चिंतामणी टेम्पल परिसर, हडपसर, जेजुरी, माळशिरस,नायगाव,सासवड अशा जवळपास २५ ते ३० किलोमीटर अंतरावरील भागांमधूनही अनेक नागरिक या रक्तदान शिबिरासाठी सहभागी झाले होते.दिवसभरात १०५ जणांनी रक्तदान करुन शिबीर यशस्वी केले.त्यांना रक्तदानानंतर प्रमाणपत्र व पाण्याचे जार देण्यात आले.श्री स्वामी समर्थ ब्लड सेंटरने रक्त संकलन केले. शंभु फाऊंडेशनचे




संस्थापक अध्यक्ष शिद्धनाथ यादव म्हणाले की शंभु फाऊंडेशन दर महिन्याला विविध उपक्रम राबवण्यात. पाचशेच्या जवळपास सदस्य संख्या असुन दर महिन्याला प्रत्येकी शंभर रुपये मदत घेतली जाते व जमा होणा-या पैशातून गरीब, अनाथ, मुलांना मदत केली जाते. शाळेला संघनक,वाचनालयात पुस्तके देण्यात आली आहे.तत्त्वनिष्ठा, एकी आणि सातत्य यांच्या बळावर हे काम असेच पुढे चालू ठेवणार, असल्याचे सांगितले.

## बोव्हाईन ब्रिडींग ऍक्टची प्रभावी अंमलबजावणी करा : आयुक्त पशुसंवर्धन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** राज्यातील गाई-म्हशींच्या जातींमध्ये सुधारणा करण्यासाठी व प्रजनन प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) अधिनियम, २०२३ लागू केला आहे. मात्र, अद्यापही क्षेत्रीय स्तरावरील खाजगी कृत्रिम रेतन सेवादाता व संस्थांनी महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाकडे नोंदणी केली नसल्याची बाब समोर आली असल्याने संबंधितांवर या अधिनियमांतर्गत नियमोचित कारवाई करण्याचे निर्देश आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील यांनी दिले आहेत. राज्यामध्ये या कायद्याची अंमलबजावणी ५ डिसेंबर २०२४ पासून सुरू झाली आहे. उत्तम दर्जाच्या वळूंचा वापर करून कृत्रिम रेतनाद्वारे दुधाळ जनावरांची पैदास वाढवणे आणि प्रजननाशी संबंधित गैरप्रकारांना आळा घालणे, हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे. या कायद्यांतर्गत राज्यातील सर्व रेत केंद्र), भ्रूण प्रत्यारोपण केंद्रे, कृत्रिम रेतन प्रशिक्षण संस्था आणि सेवा पुरवठादारांना प्राधिकरणाकडे नोंदणी करणे बंधनकारक असून, त्यांना केवळ प्रमाणित व उच्च वंशावळीच्या वळूंचेच रेत प्रजननासाठी वापरता येईल. या सर्व प्रक्रियांवर देखरेख ठेवण्यासाठी 'महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाची' स्थापना करण्यात आली आहे. प्राधिकरणाला केंद्रांची तपासणी, झडती व नियमबाह्य साहित्य जप्त करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. कायद्यातील नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई व दंडाची तरतूद करण्यात आली असल्याने संभाव्य कारवाई टाळण्यासाठी संबंधितांनी प्राधिकरणाकडे लवकरात लवकर नोंदणी करावी, असे आवाहन आयुक्त पशुसंवर्धन यांनी केले आहे.

# कृषीकन्यांचे निरगुडसर येथे स्वागत

## सात आठवडे शेतकऱ्यांसोबत राहून करणार मार्गदर्शन



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निरगुडसर :** निरगुडसर (ता. आंबेगाव) येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत डॉ. डी. वाय. पाटील कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, आकुर्डी येथील कृषीकन्यांचे निरगुडसर येथे उत्साहात स्वागत करण्यात आले. ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत या कृषीकन्या पुढील सात आठवडे गावात वास्तव्यास राहून शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. डी. जगताप, उपप्राचार्य व समन्वयक डॉ. एस. एन. पाटील तसेच प्राध्यापक भक्ती चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले आहे. कृषीकन्यांमध्ये स्नेहल नेहुल, भाग्यश्री नंदीवाले, श्रद्धा निकम, आरती गावित, अंशुज इंगोले आणि हर्षिता एरुगुराला यांचा समावेश आहे. कार्यक्रमादरम्यान माती परीक्षण, पाणी व्यवस्थापन, पीक संरक्षण, कीड व रोग नियंत्रण, आधुनिक शेती तंत्रज्ञान, शेतीमाल प्रक्रिया व विपणन याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. कृषीकन्यांच्या माध्यमातून गावात वैज्ञानिक पद्धतीची शेती आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार होईल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला. यावेळी निरगुडसरचे सरपंच रविंद्र वळसे पाटील, ग्रामविकास अधिकारी संपत पांढरे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामस्थांनी कृषीकन्यांचे स्वागत करून त्यांच्या कार्यास शुभेच्छा दिल्या.

## सौर ऊर्जेकडे शिरूरची वाटचाल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरूर :** महाराष्ट्र शासन व महावितरण यांच्या संयुक्त विद्यमाने पीएम सौर घर सोलर रूपटॉप योजने अंतर्गत राबविण्यात येणारी स्मार्ट योजना २०२५ ही घरगुती वीज ग्राहकांसाठी फायदेशीर योजना ठरत आहे. या योजनेअंतर्गत १ किलोवॅट रूफटॉप सोलर सिस्टीम बसविण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून मोठ्या प्रमाणात अनुदान उपलब्ध करून देण्यात येत आहे. या योजनेमुळे नागरिकांच्या वीज बिलात बचत होण्याबरोबरच स्वच्छ व हरित ऊर्जेचा वापर वाढीस लागणार आहे. अतिरिक्त वीज निर्मितीद्वारे उत्पन्नाची संधीही उपलब्ध होणार असल्याने नागरिकांकडून या योजनेकडे सकारात्मक दृष्टीने पाहिले जात आहे. योजनेसाठी वैध घरगुती वीज जोडणी असणे आवश्यक असून मागील १२ महिन्यांतील वीज वापर १०० युनिटपेक्षा कमी असलेल्या ग्राहकांना प्राधान्य दिले जाणार आहे. इझङ ग्राहकांना ४७ हजार ५०० रुपये, डउ/डढ ग्राहकांना ४५ हजार रुपये तर सर्वसाधारण व जइउ ग्राहकांना ४० हजार रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येणार आहे. महावितरण उपविभागीय कार्यालय, उपअभियंता शरद माने सहाय्यक अभियंता वैभव बारवकर यांनी नागरिकांनी या स्मार्ट योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे. तसेच सौर ऊर्जेचा वापर वाढवून पर्यावरणपूरक आणि स्वयंपूर्ण जीवनशैलीकडे वाटचाल करण्याचेही त्यांनी सांगितले.

# सासवड उपबाजारात शेतीमालाची आवक तेजीत; ज्वारी, बाजरीसह तरकारीच्या दरात चढ-उतार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सासवड :** सासवड उपबाजारात बुधवारी शेतीमालाची आवक समाधानकारक दिसून आली असून, ज्वारी आणि बाजरीसह तरकारीच्या दरात चढ-उतार पाहायला मिळाले. बाजार समितीने दिलेल्या माहितीनुसार, आज झालेल्या लिलाव प्रक्रियेत व्यापाऱ्यांचा सक्रिय सहभाग होता. बाजारात मालाची गुणवत्ता आणि त्याचे 'ग्रेडिंग' (प्रतवारी) याला विशेष महत्त्व प्राप्त झाले असून, योग्य 'ग्रेडिंग' केलेल्या मालाला शेतकऱ्यांना अधिक चांगला भाव मिळत असल्याचे दिसून आले. लिलाव आणि बाजारभावाची स्थिती बुधवारी (दि. २० मे २०२६) सासवड उपबाजारात विविध प्रकारच्या धान्याची आणि तरकारीची मोठी आवक नोंदवण्यात आली. बाजारात आलेल्या शेतीमालाच्या दरांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे: सर्वात जास्त आवक गव्हाची झाली असून, २२३ क्विंटल गव्हाची विक्री २,२०० ते ३,००० रुपये प्रति क्विंटल या दराने झाली. त्यानंतर बाजरीची आवक १४५ क्विंटल झाली असून, बाजरीला ३,२०० ते ३,७०० रुपयांपर्यंत भाव मिळाला. ज्वारीची आवक १२२ क्विंटल झाली असून, तिचा दर ३,००० ते ४,५०० रुपयांच्या दरम्यान राहिला. याव्यतिरिक्त, तरकारीची १७ क्विंटल आवक झाली असून, तरकारीला बाजारात मोठी मागणी दिसून आली. तरकारीचे दर ५,००० ते ५,१५० रुपयांच्या दरम्यान राहिले, जे या लिलावातील सर्वात उच्चांकी दर ठरले.

**उत्तम 'ग्रेडिंग'चा फायदा**

बाजारात मालाच्या दरात दिसून आलेली तफावत ही मुख्यत्वे मालाच्या 'ग्रेडिंग'मुळे असल्याचे व्यापाऱ्यांनी स्पष्ट केले. जो शेतकरी आपला माल नीट साफ करून, आकार आणि गुणवत्तेनुसार त्याचे वर्गीकरण (ग्रेडिंग) करतो, त्याला व्यापाऱ्यांकडून लगेच पसंती मिळते आणि उच्चांकी दर मिळतो. त्यामुळे आधुनिक बाजारपेठेत शेतीमालाचे शास्त्रोक्त 'ग्रेडिंग' करणे हे शेतकऱ्यांच्या आर्थिक फायद्यासाठी अनिवार्य ठरत आहे.

**शेतकऱ्यांचा प्रतिसाद आणि उपबाजाराचे महत्त्व**


सासवड उपबाजारातील पारदर्शक लिलाव प्रक्रियेमुळे शेतकरी समाधानी आहेत. सासवड आणि परिसरातील गावांतील शेतकरी आपला माल विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात घेऊन आले होते. हे उपबाजार शेतकऱ्यांसाठी हक्काचे व्यासपीठ ठरत असून, लिलाव प्रक्रियेत आलेल्या सुसूत्रतेमुळे शेतकऱ्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाचत आहे. येणाऱ्या काळातही शेतीमालाच्या दरात सातत्य राहील आणि आवक वाढेल, अशी आशा बाजार समिती प्रशासनाकडून व्यक्त करण्यात येत आहे.

**बाजार समितीचे आवाहन**

बाजार समितीने सर्व शेतकऱ्यांना आवाहन केले आहे की, त्यांनी आपला माल विक्रीसाठी आणताना तो पूर्णपणे स्वच्छ करून आणि योग्य 'ग्रेडिंग' करूनच आणावा. चांगल्या दर्जाच्या आणि प्रतवारी केलेल्या मालाला बाजारात नेहमीच पसंती मिळते, ज्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या कष्टाचे योग्य फळ मिळण्यास मदत होते. बाजार समिती प्रशासनाकडून लिलाव प्रक्रियेवर सातत्याने देखरेख ठेवली जात असून, शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेण्यास समिती प्राधान्य देत आहे.

द • ख • ल

## मधमाशी संवर्धन व संरक्षण हि काळाची गरज: युवा शास्त्रज्ञ रणजित राऊत




**माहिजळगाव :** जामखेड तालुक्यातील फक्राबाद येथील रहिवाशी व सध्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संलग्नीत योगेश्वरी महाविद्यालय अंबाजोगाई येथील प्राणीशास्त्र विभागाचे युवा शास्त्रज्ञ व जैवविविधता संशोधक रणजित रावसाहेब राऊत यांनी तामिळनाडूतील कोंगुनाडू कला व विज्ञान महाविद्यालय, कोयंबतूर अंतर्गत प्राणीशास्त्र व वन्यजीवशास्त्र विभागाच्या वतीने २० मे जागतिक मधमाशी दिनानिमित्त विशेष कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना राऊत यांनी मधमाश्यांचे संवर्धन आणि संरक्षण हि काळाची गरज असल्याचे सांगितले. पृथ्वीवरील अन्नसाखळी टिकवून ठेवण्यात आणि शेती उत्पादन वाढविण्यात मधमाश्यांची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. परागीभवन प्रक्रियेमुळे अनेक पिकांचे उत्पादन वाढते तसेच जैवविविधतेचे संतुलन राखले जाते, असेही त्यांनी नमूद केले. वाढत्या रासायनिक किटकनाशकांच्या वापरामुळे मधमाश्यांची संख्या झपाट्याने घटत असल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. पर्यावरणपूरक शेती पद्धतींचा अवलंब करणे, फुलझाडांचे संवर्धन करणे आणि मधमाश्यांच्या नैसर्गिक अधिवासाचे संरक्षण करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. मधमाशी हा आकाराने लहान असला तरी पृथ्वीवरील जीवनासाठी अत्यंत उपयुक्त आणि महत्त्वाचा किटक आहे. मधमाश्या नसतील तर अन्न उत्पादन आणि पर्यावरणीय समतोल धोक्यात येऊ शकतो, असे प्रतिपादन त्यांनी केले.

## ऑनलाईन औषध विक्रीविरोधात शेवगावातील केमिस्ट-ड्रगिस्टचा कडकडीत बंद



**अमरापु :** राज्यभर पुकारण्यात आलेल्या केमिस्ट व ड्रगिस्ट संघटनांच्या बंदला शेवगाव तालुक्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्रातील सुमारे १२ लाख औषध विक्रेत्यांनी या आंदोलनात सहभाग घेत शासनाच्या धोरणांविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यानुसार शेवगाव शहर व तालुक्यातील सर्व मेडिकल दुकाने दिवसभर बंद ठेवण्यात आली. शासनाच्या नियमानुसार केमिस्टांना औषध विक्रीवर केवळ १६ टक्के मार्जिन मिळते. मात्र ऑनलाईन औषध विक्री कंपन्यांकडून ग्राहकांना ३० ते ५० टक्क्यांपर्यंत सवलत दिली जात असल्याने छोट्या मेडिकल व्यावसायिकांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. ऑनलाईन औषध विक्रीमुळे डुप्लिकेट औषधे, गर्भनिरोधक गोळ्या तसेच डॉक्टरांच्या सल्ल्याविना औषधांचा वापर वाढण्याची शक्यता असल्याने नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात, अशी चिंता संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. यावेळी शेवगाव तालुका मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष सुरज लांडे, उपाध्यक्ष गणेश राऊत, गणेश गवळी, बाळासाहेब देशपांडे, प्रताप दहिफळे, बाळासाहेब लांडे, नवनाथ उदागे, दुर्गेश काथवटे,फैय्याज भाई, जितू पोखरना, निलेश केवळ, समीर बेग, सतीश चव्हाण, सचिन पारक, नितीन आव्हाड यांच्यासह सर्व सदस्य व पदाधिकारी उपस्थित होते. ऑनलाईन औषध विक्रीवर नियंत्रण आणून स्थानिक केमिस्ट व्यवसायाचे संरक्षण करावे, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी शासनाकडे केली.

## लोणीव्यंकनाथ रोडवर विजेचे खांब धोकादायक स्थितीत



**बेलवंडी :** श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी - लोणीव्यंकनाथ मार्गावरील विजेचे खांब सध्या अत्यंत धोकादायक अवस्थेत उभे असून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. नुकतेच मागील वर्षी या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले होते. मात्र रस्त्याच्या कामानंतरही अनेक विजेचे खांब रस्त्यालगतच ठेवण्यात आल्याने वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. विशेष म्हणजे काही खांब अक्षरशः डांबरी रस्त्याला खेटून उभे आहेत, तर काही खांब झुकलेल्या अवस्थेत दिसून येत आहेत. त्यामुळे रात्रीच्या वेळी किंवा भरधाव वेगातील वाहनांना अपघात होण्याची शक्यता अधिक वाढली आहे. स्थानिक नागरिकांनी अनेकदा याबाबत तक्रारी करूनही महावितरण प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही, असा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. रस्त्याच्या दुतर्फा खोल गटार असून त्याच्या कडेला उभे असलेले खांब आणखी धोकादायक बनले आहेत. एखाद्या मोठ्या अपघातानंतरच प्रशासनाला जाग येणार का? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. नवीन रस्ता तयार करताना संबंधित विभाग आणि महावितरण यांच्यात समन्वयाचा अभाव दिसून येत आहे. सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने तात्काळ सर्व धोकादायक खांब हटवून सुरक्षित अंतरावर स्थलांतरित करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## चापडगाव विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे यश

**शेवगाव :** येथील कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या चापडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवले. शाळेतील इयत्ता पाचवी चे ८ तर इयत्ता आठवीचा १ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरले. विद्यार्थ्यांचा सातत्यपूर्ण अभ्यास, शिक्षकाचे मार्गदर्शन आणि पालकांच्या सहकार्यामुळे यश संपादन करता आल्याची भावना शाळा प्रशासनाने व्यक्त केली. शिष्यवृत्ती परीक्षेसाठी शाळेत विशेष मार्गदर्शन वर्ग, सराव परीक्षा, तसेच विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन देण्यात आले. या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळत आहे. इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये ऋतुजा तेलोरे (१६४), मानसी गोरे (१४८ ), सई आंधळे (१४२),रुद्र शहाणे (१४२),चैतन्य वाल्हेकर (१३८),यश तेलोरे (१३२),स्वामिनी जाधव (१२६), आदिती पोपळे (१२६), तसेच इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये चैताली घोडके (१४२)हे सर्व विद्यार्थी पात्र झाले आहेत.या गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष ॲड. डॉ. विद्याधर काकडे, मा. जि.प.सदस्या हर्षदाताई काकडे, डॉ.लक्ष्मणराव बिटाळ, पृथ्वीसिंहभैय्या काकडे, वंदना पुजारी, अशोक आहेर, कांतेश्वर ढोले, प्राचार्य अरुण वावरे, प्र. प्राचार्या अंजली चिंतामण, अनिल मगर, अशोक आघवणे, दादासाहेब ज्योतीक, ग्रामस्थ, पालक आदींनी अभिनंदन केले.

# लोणीत ऊस जळून खाक ; ७० हजाराचे नुकसान

### दोघांवर गुन्हा दाखल

विशाल फटांगडे । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** जामखेड तालुक्यातील लोणी येथे शेजाऱ्याने बांधावरील गवत जाळताना कोणती काळजी न घेतल्याने शेजारी शेतकऱ्याचा ऊस जळून खाक झाला त्यात तब्बल ७० हजाराचे नुकसान झाले असून खर्डा पोलीस ठाण्यात दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे

तालुक्यातील लोणी गावच्या हद्दीत शेतकऱ्यांनी बांधावरील गवत जाळताना मोठा निष्काळजीपणा केल्याने या आगीची झळ शेजारी शेतकऱ्याच्या उभा ऊस पिकाला बसली आहे आग पसरून शेजारील शेतकऱ्यांचा ऊस जळून खाक झाला असून अंदाजे ७० हजार रुपयांची मोठे आर्थिक नुकसान झाले आहे नुसकान भरपाई देण्यात नकार दिल्याने खर्डा पोलीस स्टेशन या प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी गंगाधर महादेव परकड यांनी खर्डा पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल केला आहे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दि. ११/ ५ /२०२६ रोजी दुपारी दीड वाजता सुमारास माझ्या शेजारी शेत असणारे सुबराम नाना शेंडकर रा. लोणी याने शेत गट क्रमांक ९५ चा बांधावरील गवत जाळण्यासाठी बांध पेटवून दिला होता.त्यामुळे माझे शेत गट नंबर ९५ मधील २० गुंठे ऊस जळाला आहे. त्यास माझे ७० हजार रुपये नुकसान झाले आहे मला त्याची नुकसान भरपाई दे असे म्हणालो असता मला म्हणाला की मी जानुन बुजून तुझा ऊस जाळला नाही व तुझे



काय नुकसान झाले आहे ते देणार नाही असे म्हणाला व त्याची पत्नी उजना सुंबराम शेंडकर रा. लोणी हिने विनाकारण मला व माझ्या पत्नीला शिवीगाळ केली. म्हणून सुबराम नाना शेंडकर, उजना सुबराम शेंडकर यांनी माझे उसाचे नुकसान केले व शिवगाळ केली म्हणून भरपाई मागणी केली असता त्यांनी देण्यात स्पष्ट नकार दिल्यामुळे अखेर खर्डा पोलीस ठाण्यात रीतसर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास खर्डा पोलीस करीत आहेत.

## जुने दहिफळ गावात जुगार अड्डयावर छापा

### ९ जण ताब्यात, रोकड हस्तगत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** शेवगाव तालुक्यातील जुने दहिफळ येथे पोलिसांनी तिरट जुगारावर छापा टाकत नऊ जणांना ताब्यात घेतल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या कारवाईत चलनी नोटा ५ हजार ५०० रुपयांची रोख रक्कम जप्त केल्याचे स्पष्ट झाले आहे. मात्र या छोट्याशा रकमेसाठी करण्यात आलेल्या मोठ्या कारवाईमुळे ग्रामीण भागात उलटसुलट चर्चा रंगू लागल्या आहेत.



एका बाजूला तालुका व जिल्ह्यात दरोडे, चोरी, अवैध धंदे, गुटखा, दारू विक्री यांसारखे गंभीर प्रकार सुरू असताना त्यांचा तपास अनेकदा महिनोनमहिने प्रलंबित राहतो. अनेक मोठे आरोपी अजूनही पोलिसांच्या हाती लागत नसल्याची वस्तुस्थिती आहे. अशा परिस्थितीत गावातील काही लोकांकडून चालणाऱ्या किरकोळ जुगारावर कारवाई करून पोलिसांनी स्वतःची पाठ थोपटून घेतल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

विशेष म्हणजे या कारवाईत मोठ्या रकमांचा व्यवहार किंवा संघटित गुन्हेगारी उघडकीस आलेली नसताना केवळ ५ हजार ५०० रुपयांच्या चलनी नोटा जप्त झाल्या. त्यामुळे मोठा बकरा सोडून छोट्या लोकांवर धडक कारवाई अशी टीका आता सर्वसामान्यांमधून होऊ लागली आहे.

ग्रामीण भागात अवैध दारू, गुटखा, मटका, जुगार यांचे मोठे जाळे कार्यरत असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येतात. मात्र त्यामागील मुख्य सूत्रधारांपर्यंत पोहोचण्याऐवजी लहान स्तरावरील लोकांवर कारवाई करून आकडेवारी वाढवण्याचे काम सुरू असल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, सदर प्रकरणी शेवगाव पोलिसांनी महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## कुकडीच्या धरणांची स्थिती चिंताजनक

### आवर्तन हे पिण्यासाठी की शेतीसाठी? निर्णय अद्याप प्रलंबित

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** कुकडी धरणांच्या पाणी पातळी बाबत धरणांची स्थिती धरणातील पाणीसाठ्यामध्ये देखील बाष्पीभवनामुळे मोठी घट होताना दिसत आहे. ही बाब अत्यंत चिंताजनक दिसून येत असून, उन्हाळी हंगामात आवर्तनामध्ये मोठी कपात होण्याची चिन्हे दिसत आहेत. तर आवर्तन हे पिण्यासाठी की? शेतीसाठी? हा निर्णय मात्र अद्यापही गुलदस्त्यात असल्याचे समोर येत आहे. दरम्यान कुकडी पाटबंधारे विभाग क्रमांक १ नारायणगाव यांच्याकडून मिळालेल्या १५ मे २०२६ च्या आकडेवारीनुसार धरणातील उपलब्ध पाण्याची पातळी तपशीलवार माहिती पुढील प्रमाणे येडगाव ५६.८९ टक्के, माणिक डोह ६.४२%, वडज ३८.४८%, पिंपळगाव जोगे १७.३३%, डिंभे १८.३०%, विसापूर १४.६९%, चिल्हेवाडी ७१.२६%, आणि घोड ४.६५% अशाप्रकारे धरणातील उपलब्ध पाण्याची सद्यस्थितीची टक्केवारी असून, १४ मे २०२६ रोजी सकाळी साडेनऊ वाजता मीना पूरक कालवा विसर्ग कमी करून ६० क्युसेसने करण्यात आला आहे.

दरम्यान उन्हाळी हंगाम चालू वर्षी अत्यंत थरारक स्वरूपाचा आहे या अतिउष्णतेमुळे धरणातील पाण्याचे देखील मोठ्या प्रमाणावर बाष्पीभवन होत आहे त्यामध्ये श्रीगोंदा, पारनेर, कर्जत, करमाळा इत्यादी तालुक्यांना अद्यापही कुकडीचे उन्हाळी हंगामाचे दुसरे आवर्तन सोडलेले नाही कुकडी पाटबंधारे विभागाच्या सूत्रानुसार मिळालेल्या माहितीनुसार २५ मे रोजी कुकडीचे उन्हाळी हंगामातील दुसरे आवर्तन सोडणार आहेत असे समजते. त्यामध्ये श्रीगोंदेकरांना पंधरा जून आवर्तनाची वाट पहावी लागणार आहे तत्पूर्वी पाऊस आणि कुकडीचे पाणी यांचा संगम शेतकऱ्यांना पहावयास मिळणार आहे. आता सोडण्यात येणारे आवर्तन पिण्यासाठी की? शेतीसाठी? याबाबत अद्यापही कुकडीच्या वरिष्ठ पातळीवर निर्णय झाला नसल्याचे समजते. त्यामुळे कुकडीचे लाभ क्षेत्रात आवर्तन हे रामभरोसे ठरले जाते की काय? अशी शंका देखील शेतकऱ्यांसमोर आहे. उन्हाळी हंगामाचा आवर्तनचा निर्णय होत नाही. त्यामुळे उन्हाळी हंगामातील दुसरे आवर्तन हे शेतकऱ्यांच्या जीवनाशी खेळणार असल्याचे दिसते. कारण या लाभ क्षेत्रात पाण्याचा मोठा आगडोंब सुरू आहे. हंडाभर पाण्यासाठी या लाभ क्षेत्रात भटकंतीची वेळ शेतकऱ्यांवर येऊन ठेपले आहे. पाणी म्हणजे जीवन आहे. याची जाणीव अधिकारी व लोकप्रतिनिधींना असायला हवी.

## एका चप्पलवरून लागला मोबाईल चोराचा सुगावा !

### खर्डा पोलिसांची मोठी कामगिरी



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** कुरमुडे यांच्या 'द लिटल स्टार' शाळेच्या कामासाठी आलेल्या परराज्यातील कामगारांचे मोबाईल चोरणाऱ्या टोळीचा खर्डा पोलिसांनी अवघ्या १२ तासांत छडा लावला. पोलिसांनी मुख्य आरोपीसह एका विधीसंघर्षित (अल्पवयीन) बालकाला ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडून ४९ हजार रुपये किमतीचे ४ मोबाईल फोन हस्तगत केले आहे. घटनास्थळी मिळालेल्या एका संशयास्पद चप्पलच्या सुगाव्यावरून पोलिसांनी हा गुन्हा उघडकीस आणला.

खर्डा येथे परराज्यातील काही कामगार शाळेच्या बांधकामासाठी आलेले आहेत. नेहमीप्रमाणे काम आटपून हे कामगार आपल्या खोलीत झोपले होते. हीच संधी साधून चोरांनी कामगारांचे चार मोबाईल चोरून नेले. याप्रकरणी खर्डा पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

घटनास्थळी पोलीस पथकाने भेट दिली. पोलिसांना तिथे एक संशयास्पद चप्पल मिळून आली. या चप्पलीच्या सुगाव्यावरून पोलिसांनी खर्डा येथील मुख्य आरोपी नाना उत्तम काळे व एका विधीसंघर्षित बालकाला ताब्यात घेतले. त्यांची कसून चौकशी केली असता, त्यांनी चोरीची कबुली दिली. पोलिसांनी त्यांच्याकडून चारही मोबाईल हस्तगत केले. उपविभागीय पोलीस अधिकारी प्रविणचंद्र लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली खर्डा पोलीस ठाण्याचे प्र. सपोनि. उज्ज्वलसिंह राजपूत, पोलीस कर्मचारी संभाजी शेंडे, बाळू खाडे, शशी म्हस्के, अशोक बडे, भगवान पालवे यांच्या पथकाने कामगिरी केली.

## खाजगी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांसंदर्भात निर्णय घ्या

### राज्य शिक्षकेतर महासंघाचे शिक्षण मंत्र्यांना निवेदन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** राज्यातील खाजगी व्यवस्थापनेच्या शिक्षकेतर कर्मचारी यांच्या विविध प्रश्नां-संदर्भात सखोल चर्चा होऊन तातडीने निर्णय घ्या, याबाबत राज्य शिक्षकेतर महासंघाने शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले आहे.



शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या निवासस्थानी शिक्षकेतरांच्या प्रश्नसंदर्भात आ. रोहित पवार, राज्य शिक्षकेतर महासंघाचे अध्यक्ष वाल्मीक सुरासे, मा. आ. विजय गव्हाणे यावेळी उपस्थित होते.

शिक्षण मंत्र्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अतिरिक्त शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन तातडीने करावे. समायोजन होत नाही तोपर्यंत त्यांच्या मूळ आस्थापनेवरून नियमित वेतन देण्यात यावे, मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांच्या रेट याचिका क्रमांक ६६२६/२४, ४०४९/२०२४, दिनांक १६ मार्च २०२६ नुसार आदेशान्वये शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे १ ऑक्टोबर २००६ पासून खाजगी शाळेतील शिक्षकेतर कर्मचारी यांच्या १२ व २४ वर्षाच्या आश्वासित प्रगती योजनेचा शासन आदेश त्वरित निर्गमित करण्यात यावा. दि. २५ मार्च २०२६ अन्वये शिक्षकेतर शिक्षक पदावरील नियुक्ती बाबतची तरतुदीचा पुनर्विचार करण्यात यावा. या निवेदनावर महासंघाचे अध्यक्ष वाल्मीक सुरासे, समन्वयक एस. डी. डोंगरे, महासचिव पाराजी मोरे यांच्या स्वाक्षरी आहेत.

## माणिकदौंडी जवळील कार अपघातात दोन ठार : दोन जखमी

### मृतावंर मिरजगावात अंत्यसंस्कार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** तालुक्यातील माणिकदौंडी ते कडा रस्त्यावर बोरसेवाडी फाटादरम्यान हॉटेल शुभमजवळ राज्य मार्गावर एका वळणावर अंदाज न आल्याने भरधाव कारचा भीषण अपघात झाला. यामध्ये दोघांचा जागीच मृत्यू झाला, तर दोघे गंभीर जखमी झाले. एक जण किरकोळ जखमी झाला मंगळवारी (दि.१९) सायंकाळच्या सुमारास ही दुर्घटना घडली. या अपघातातील मृत व जखमी हे सर्व जण कर्जत तालुक्यातील मिरजगाव येथील रहिवासी आहेत. या अपघाताच्या घटनेमुळे मिरजगावसह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

कालिदास शहादेव वनकर (वय३०) व बबन किसन खेतमाळीस (वय६५) अशी मृतांची नावे आहेत. अक्षय नीलेश क्षीरसागर (वय २८) व उमेश मिटकरी (वय ३८) हे गंभीर जखमी झाले आहेत. तर एकाला किरकोळ दुखापत झाली. जखमीना उपचारासाठी अहिल्यानगर येथे हलविण्यात आले.

पाथर्डीहून मिरजगावच्या दिशेने कार (एमएच १४ एलजी ८४१६) जात होती. माणिकदौंडीच्या पुढे बोरसेवाडी फाट्यादरम्यान हॉटेल शुभम जवळील धोकादायक वळणावर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यानंतर कार रस्त्याच्या कडेला जाऊन पलटी झाली. अपघाताची तीव्रता इतकी भीषण होती की कारमधील कालिदास बनकर व बबन खेतमाळस यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतकार्य करून जखमींसह सर्वांना पाथर्डी उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी दोघांना मृत घोषित केले. जखमी असलेल्या अक्षय क्षीरसागर व उमेश मिटकरी यांना जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक विलास पुजारी, पोलिस हेडकॉन्स्टेबल सुहास गायकवाड व पोलिस कॉन्स्टेबल धनराज चाळक यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करत पुढील कार्यवाही सुरू केली. दरम्यान मृतावंर बुधवारी दुपारी मिरजगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी विविध क्षेत्रातील मान्यवर व नातेवाईकानी मोठी गर्दी केली होती.

# आधाराच्या काठीसोबत जेष्ठांना मिळाला आपुलकीचा स्पर्श

### येवतीत मातृ पितृ कृतज्ञ सोहळा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**देवदैठण :** श्रीगोंदा तालुक्यातील येवती येथे श्री गणेशा परिवाराच्या वतीने सामाजिक उपक्रम राबविताना उद्योजक विकास आढाव यांच्या वतीने आयोजित मातृ पितृ कृतज्ञ सोहळ्यातून आधाराच्या काठीसोबत शेकडो जेष्ठांना आपुलकीचा स्पर्श मिळाला.

रविवार दि. १७ मे रोजी येवती येथे आजोबा स्व. दिनकर आढाव व आजी स्व. द्रौपदा आढाव यांच्या स्मरणार्थ मातृ पितृ कृतज्ञ सोहळा पार पडला. यावेळी खासदार नीलेश लंके, नाथाभाऊ शेवाळे, डॉ. प्रणोती जगताप, सभापती अतुल लोखंडे यांच्या हस्ते दहा ज्येष्ठ जोड्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी आयोजित रक्तदान शिबीरात पन्नासहून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान केले. तसेच मोफत नेत्र तपासणी शिबिरात २०० जेष्ठांची नेत्र तपासणी करण्यात आली. तर उपस्थित शेकडो जेष्ठ पुरुष व महिलांना आधारासाठी काठी भेट देण्यात आली. यावेळी भेट मिळालेल्या काठीसोबत आम्हाला आपुलकीचा स्पर्श मिळाल्याच्या हृदयस्पर्शी भावना डोळ्यात पाणी आणत अनेक जेष्ठांनी व्यक्त केल्या. तर खासदार निलेश लंके यांनी कार्यक्रमाचे कौतुक करताना अशा प्रेरणादायी कार्यक्रमामुळे तरुण व जेष्ठांच्या नात्यातील दुरावा कमी होऊन वृद्धाश्रमात जाणाऱ्या जेष्ठांची संख्या कमी होण्यास मदत होणार असल्याचे सांगितले. यावेळी उद्योजक मच्छिंद्र लंके, सुरेश लोखंडे, विक्रम पाचुंदकर, सचिन दुंडे, संजय लाकुडझोडे, निवास नाईक, केशव महाडीक आदिंसह परीसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विलास आढाव, सुनिल आढाव, अजय घनवट, मच्छिंद्र आढाव, राजेंद्र आढाव, नवनाथ आढाव, गोरख आढाव आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन संजय ओहोळ यांनी केले. आभार सुरेश पठारे यांनी मानले.

> जेष्ठ नागरिक हे समाजाचे मार्गदर्शक असून त्यांचा सन्मान करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात जेष्ठांना आधार देणारे असे उपक्रम समाजात सकारात्मक संदेश देतात. उपस्थित जेष्ठांना दिलेली काठी त्यांच्यासाठी फक्त आधार नसून आपुलकीची भेट आहे.
> **डॉ. प्रणोती जगताप (संचालिका -कुकडी सहकारी साखर कारखाना)**

> आई वडीलांच्या संस्काराची शिदोरी घेऊन समाजात काम करण्याची प्रेरणा मिळाली. मृत व्यक्तिंचे दहावे, तेरावे वा वर्षश्राद्ध घालण्यापेक्षा जिवंतपणीच त्यांच्यासाठी आपुलकीचा कार्यक्रम करताना हजारोंच्या उपस्थितीने परिवाराचे वैभव पाहून त्यांच्या चेहऱ्यावर जो आनंद आणि डोळ्यात जे आंनदाश्रू पहायला मिळाले त्याचे आत्मिक समाधान लाभले.
> **विकास आढाव (श्री गणेशा उदयोग समूह)**



दैनिक
# राष्ट्र सह्याद्री



## खेळायला गेल्याने सावत्र आईकडून मुलाचे डोके फोडले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील पाथरे खुर्द येथे सात वर्षीय मुलाला मित्रांसोबत खेळायला गेल्याच्या कारणावरून सावत्र आईने उलथनीने मारहाण करून त्याचे डोके फोडल्याची धक्कादायक घटना घडली. याप्रकरणी राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुरेश गंगाराम पिंपळे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांची पहिली पत्नी मयत झाल्यानंतर चार वर्षांपूर्वी त्यांनी सोनाली हिच्याशी दुसरे लग्न केले होते. संग्राम व वर्षा ही पहिल्या पत्नीची मुले असून सोनाली ही त्यांची सावत्र आई आहे. ती मुलांना नेहमी मारहाण करत असल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. दि. १७ मे रोजी सुरेश पिंपळे कामानिमित्त बाहेर गेले असताना दुपारी त्यांच्या भावाने फोन करून मुलगा संग्रामला मारहाण झाल्याची माहिती दिली. घरी आल्यानंतर संग्रामच्या डोक्यातून रक्त येत असल्याचे दिसून आले. मुलाने मित्रांना नदीत पोहताना पाहण्यासाठी गेलो असता आईने घरात ओढून आणत उलथनीने मारल्याचे सांगितले. याप्रकरणी आरोपी सोनाली सुरेश पिंपळे हिच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## कॉलेज बसच्या काचा फोडणाऱ्या आरोपींची पोलिसांनी काढली धिंड



युनूस इनामदार | राष्ट्र सह्याद्री

**ममदापूर** : काही दिवसापूर्वी श्रीरामपूर शहरातील कांदा मार्केट परिसरात अजितदादा पॉलिटेक्निक कॉलेजच्या बसने दुचाकीला कट मारल्याच्या कारणावरून काही अज्ञात तरुणांनी कॉलेज बसच्या काचा फोडून बसची तोडफोड केली होती. घटनेची माहिती मिळताच श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन यांनी तपासाची चक्रे फिरवत आरोपींना अटक केली होती.

परिसरात वाढलेली आरोपींची दहशत पाहता श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याच्या वतीने परवेज जमीर शेख (वय २२, रा जुना अशोक पेट्रोल पंप समोर नेवासा रोड वार्ड नंबर ६ श्रीरामपूर), सलमान हसन पठाण (वय २४ रा. भारत गॅस समोर नेवासा रोड वॉर्ड नंबर ६), अल्ताफ हनीफ सय्यद (वय २५ रा अल्फा हॉस्पिटल जवळ वार्ड नंबर ३ श्रीरामपूर), देविदास राजू शिंदे (वय २१रा कानिफनाथ नगर दिघी रोड तालुका श्रीरामपूर) यांची घटनास्थळावर धिंड काढून सर्वसामान्य नागरिकांना सुरक्षिततेचा संदेश दिला आहे.

## श्रीरामपूरात 'दंगा नियंत्रण' पथकाचा थरार !

### बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा 'मॉक ड्रिल'



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : आगामी येणाऱ्या बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर श्रीरामपूर शहर पोलीस व तालुका पोलिसांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी सकाळी पोलिस पेरड ग्राउंडवर पोलीस कवायत घेण्यात आली.सध्या शहरासह ग्रामीण भागात कायदा सुव्यवस्था चोख राहावी,व शांतता बिघडून नये,याकरिता पोलीस आपत्तकालीन 'मॉक ड्रिल' (दंगा नियंत्रण काबू )सराव कवायत करण्यात आला.पोलीस अधीक्षक मुमक्का एम, सुदर्शन व अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांच्या आदेशानुसार व उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या नेतृत्वाखालील पोलिसांची कवायत पेरड घेण्यात आली.या कवायती दरम्यान, दंगा नियंत्रण पथकाने निर्माण होणाऱ्या पोलिस यंत्रणेचा जलद गतीने प्रतिसाद कसा मिळू शकतो, याबाबत थेट प्रात्यक्षिके सादरीकरण करून दाखविले.याप्रसंगी,पोलिस निरीक्षक नितीन देशमुख म्हणाले की, नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नका, शहराची शांतता अबाधित ठेवा,नागरिकांनी सहकार्य करावे,असे देशमुख आवाहन केले.यावेळी पोलीस निरीक्षक अरूण धनवडे, पोलीस पथकातील कर्मचारी उपस्थित होते.

## देवळाली प्रवरात पोलीस बंदोबस्तात हटविली अतिक्रमणे

### धार्मिक स्थळावरील कारवाईवर काही काळ तणाव



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील देवळाली प्रवरा येथील नगर पालिका हद्दीतील शासकीय जागेवरील अतिक्रमणांवर नगर पालिकेने काल बुधवार दि. २० मे रोजी मोठी कारवाई करत जेसीबीच्या सहाय्याने अतिक्रमणे हटवली. एप्रिल महिन्यात हटविण्यात आलेली अतिक्रमणे पुन्हा उभारण्यात आल्याने प्रशासनाने ही मोहीम राबविली. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार तसेच नगर पालिकेच्या सर्वसाधारण सभेतील ठरावानुसार अतिक्रमण हटाव मोहीम सुरू करण्यात आली होती. अतिक्रमणधारकांना यापूर्वी दोन नोटिसा देण्यात आल्या होत्या. काहींनी स्वतःहून अतिक्रमणे काढून घेतली, तर उर्वरित ठिकाणी प्रशासनाने थेट कारवाई केली.

बाजारतळ परिसरातील टपऱ्या व पत्र्याचे शेड हटविण्यात आले. या कारवाईमुळे मुख्य रस्ते मोकळे झाले असले तरी अनेक वर्षांपासून व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांना मोठा फटका बसला आहे. दरम्यान, धार्मिक स्थळावरील अतिक्रमण हटविण्यासाठी पालिका यंत्रणा सज्ज होताच मोठा जनसमुदाय पालिका आवारात जमला होता. धर्मगुरु शमूवेल साळवे यांनी संभाजीनगर उच्च न्यायालयातून स्थगिती मिळेपर्यंत कारवाई थांबविण्याची विनंती अधिकाऱ्यांकडे केली. महसूल विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानुसार काही दिवसांची मुदत देण्याचा विचार सुरू असतानाच मंत्रालयातून दूरध्वनीद्वारे अतिक्रमण हटविण्याच्या सूचना देण्यात आल्याची माहिती समोर आली. वाढत्या दबावामुळे प्रशासनाने कारवाई करण्याची भूमिका कायम ठेवली. अखेरीस धर्मगुरु शमूवेल साळवे यांनी स्वतःहून अतिक्रमण काढून घेण्याची तयारी दर्शविल्यानंतर पालिका अधिकारी व पोलिसांनी सुटकेचा श्वास घेतला. यावेळी राहुरी, श्रीरामपूर, कोपरगाव येथील पोलिस बंदोबस्तासह राज्य उत्पादन शुल्क विभागाचीही मदत घेण्यात आली. प्रशासनाकडून लवकरच शहरातील रस्ते व गल्लीबोळांतील अतिक्रमणांवरही कारवाई केली जाणार असल्याचे सांगण्यात आले.

## खंडाळ्यात पंधरा दिवसात सलग चौथा बिबट्या जेरबंद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : तालुक्यातील खंडाळा येथील बरड शिवारात शेळके व ढोकचौळे यांच्या शेतात पंधरा दिवसात सलग चौथा बिबट्या जेरबंद करण्यात आला. हा सलग चौथा बिबट्या परिसरात आढळल्याने स्थानिक शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.अजूनही दोन बिबटे परिसरात असल्याचे स्थानिक नागरिकांकडून सांगण्यात येत आहे.

तर वनविभागाच्या कारवाईवर येथील नागरिकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.



काही दिवसांपूर्वी जवळच असलेल्या एमआयडीसी परिसरात धरून आणलेला बिबट्या निर्जनठिकाणी सोडल्याचे गंभीर आरोप प्रत्यक्षदर्शी स्थानिक नागरिक करत आहे.एकाच गट नंबर मधून पंधरा दिवसात चार बिबटे जेरबंद होतात, ही आश्चर्याची बाब समोर आली आहे. शासनाने वन्यजीवाचं संरक्षण करावं परंतु शेतकरी शेतमजूर सामान्य जीवाची परवा करण्याच्या दृष्टीने कायद्यात बदल करून प्रथम माणसानंतर बिबट्या ही कायद्याची व्याख्या करावी, अशी मागणी ग्रामस्थ करत आहे.वारंवार परिसरात बिबटे जेरबंद होत असल्याने महिला शेतकरी देखील घाबरले आहेत.

या परिसरातील बिबटे वनविभागाचे अधिकारी धरून कोणत्या भागात सोडतात याचा खुलासा वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी करावा अशी मागणी येथील शेतकरी करत आहेत. बिबट्याच्या भीतीने मजूर शेतात काम करण्यासाठी उपलब्ध होत नसल्याने अक्षरशा जमिनी पडीक ठेवण्याची वेळ येथील शेतकऱ्यावर आली. पिंजऱ्यांची वाहतूक करणे, पिंजऱ्याजवळ भक्षाची व्यवस्था करणे, बिबट्या जेरबंद होईपर्यंत पक्षाला चारा पाण्याची सोय करणे असे विविध सहकार्य येथील स्थानिक शेतकरी नेहमीच करतात.सदर बिबट्या जेरबंद करण्यात विजय ढोकचौळे, शेखर ढोकचौळे, महेश मरकडे, योगेश काळवाघे, निलेश साबदे, प्रकाश अभंग, महेश ढोकचौळे, सचिन शेळके, गणेश माळी आदींनी मोलाचे सहकार्य केले.

## घरफोडीचा प्रयत्न करणारे दोघे नागरिकांच्या सतर्कतेने जेरबंद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**राहुरी** : राहुरी तालुक्यातील मांजरी येथे सकाळच्या वेळी घरफोडीचा प्रयत्न करून मोटारसायकलवरून पसार होत असलेल्या दोन भामट्यांना नागरिकांच्या सतर्कतेमुळे पकडून पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. ही घटना १८ मे रोजी सकाळी घडली.

पोपट कारभारी बाचकर यांनी राहुरी पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, सकाळी दहा वाजेच्या सुमारास त्यांच्या पत्नी मंगल बाचकर या घराबाहेर आल्या असता एक अनोळखी इसम मोटारसायकलजवळ संशयास्पदरीत्या थांबलेला दिसला. त्याला विचारणा करत असतानाच शेजारील ज्ञानेश्वर हंडाळ यांच्या घराच्या कंपाऊंडमधून दुसरा इसम उडी मारून बाहेर आला. त्यानंतर दोघेही मोटारसायकलवरून पाथरे गावाच्या दिशेने पसार झाले. घडलेला प्रकार समजताच पोपट बाचकर यांनी त्यांचा पाठलाग करून पाथरे गावाजवळील प्रवरा नदी पुलावर दोघांना पकडले व मांजरी येथे आणले. झडती घेतली असता त्यांच्या जवळ लोखंडी टॉमी आढळून आली. पोलिसांनी आरोपी आकाश छगन काळे (रा. अंतापूर, ता. गंगापूर) व अमीर दशरथ चव्हाण (रा. चितेगाव, ता. पैठण) यांना ताब्यात घेतले असून त्यांच्याविरुद्ध राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## दरडगाव थडी येथे अवैध वाळू वाहतूकीचा टेम्पो जप्त

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

म्हैसगाव : राहुरी तालुक्यातील दरडगाव थडी परिसरातून अवैधरित्या वाळू वाहतूक करणारा बिना नंबरचा ४०७ टेम्पो महसूल विभागाने पकडून कारवाई केली. ताहाराबाद मंडळ अधिकारी भालेकर साहेब व म्हैसगाव-ताहाराबादचे तलाठी पंडित महसूल पथकाने ही कारवाई केली.

मिळालेल्या माहितीनुसार, मुळा नदी पात्रातून मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा सुरू असून रात्रीसह दिवसाही वाळू चोरीच्या घटना वाढत आहेत. नदीतील पाण्याची पातळी कमी झाल्याने वाळू माफियांनी पुन्हा डोके वर काढल्याचे चित्र दिसून येत आहे.

दरडगाव थडी परिसरातून वाळू भरून जाणारा बिना नंबरचा ४०७ टेम्पो भारत काळणर रा चिखलठण या टेम्पो महसूल विभागाच्या पथकाने अडवला. मात्र कारवाईची चाहूल लागताच चालक घटनास्थळावरून फरार झाला. टेम्पो चालवण्यासाठी कोणीही उपलब्ध नसल्याने तलाठी पंडित यांनी स्वतः टेम्पोचे स्टेअरिंग हातात घेत वाहन राहुरीच्या दिशेने महसूल कार्यालयात जमा करण्यासाठी नेले. या धाडसी कारवाईमुळे महसूल विभागाच्या कामगिरीचे परिसरातून कौतुक होत असून, अवैध वाळू उपशावर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. मात्र एक टेम्पो पकडला पण बाकीच्या गाड्यांचं काय असा प्रश्न निर्माण झाला आहे वाळू वाहणाऱ्या साधनांमध्ये मोठ्या प्रमाणात भर पडली असून जास्त झाले आहे ही कारवाई पुढेही अशी चालू राहील अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे ही वाळु दुसऱ्या गावी जाने बंद झाले पाहिजे तरच पाणी साठा येथे राहील .


## बेलापूर एज्युकेशन प्रकरणी फौजदारी करण्याचा निर्णय

### सभासद एकवटले ; त्या संचालकांची अनुपस्थिती

शफीक बागवान | राष्ट्र सह्याद्री

**बेलापूर** : बहुचर्चित बेलापूर एज्युकेशन सोसायटी प्रकरणी ड शरद सोमाणी यांच्या सह कार्यकारी मंडळाविरुद्ध फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्यात यावी अशी जोरदार मागणी आजीव सभासदांनी केली आहे. संस्थेचे आजीव सभासद अभय बाफना यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेच्या सदस्यांची नुकतीच बैठक झाली त्यात ही मागणी करण्यात आली. बैठकीस सोमय्या ट्रस्टचे प्रतिनिधी सुनील चंदन व सुहास घोडगे यांचे सह शिवदास महाडिक,सुनील राठी, विनोद पटणी, अरविंद राठी, रमेश दायमां, दिवाकर कोळसे, नंदू शेठ खटोड, गोविंद श्रीगोड, अशोक कुऱ्हे, सचिन कडेकर, विजय मुथा, राजेंद्र सिकची,सुभाष बोरा, श्रीकांत राठी हे सभासद उपस्थित होते.

ॲड. शरद सोमाणी यांनी बनावट कागदपत्रे रंगवून या संस्थेवर अधिराज्य गाजविले. या द्वारे आपल्या नातेवाईकांना सभासद करून ही संस्था कुटुंबापूरती मर्यादित ठेवण्याचा प्रयत्न केला मात्र सभासदांनी तो डाव उधळून लावला आहे. संस्थेत हा वाद गेल्या वर्ष दोन वर्षापासून चालू आहे. यातून सोसायटीचे सभासद तसेच शिक्षक आणि




विद्यार्थी पालकांची मोठ्या प्रमाणात दिशाभूल आणि फसवणूक होत होती. बैठकीतून भविष्यात विद्यार्थी पालक शिक्षकांच्या होणाऱ्या दिशाभूल सह फसवणुकीला आळा बसणार असल्याचा संदेश गेला आहे. बैठकीचे रीतसर निमंत्रण देऊनही मावळत्या कार्यकारी मंडळातील एकही सदस्य उपस्थित नव्हता.

सोसायटीच्या काही सदस्यांनी अत्यंत जागरूक पणे हे प्रकरण उघडकीस आणले. गावात त्याची फार मोठी चर्चा रंगली आहे. दरम्यान, खोटे कागदपत्र बनवून एज्युकेशन सोसायटीचा कारभार पाहणाऱ्या कार्यकारी मंडळांचा कारभार उघडकीस आणणाऱ्या सभासदांचे गावात सर्वत्र कौतुक होत आहे.

## वारकरी संप्रदायातील संतसेवक व सहकार पंढरीतील सेवाकर्मी : कै.विलासराव काकडे

**ने**वासा तालुक्यातील भेंडा येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना येथे सलग ३५ वर्षे अधिकारी या पदावर सेवा करणारे संतसेवक विलासराव काकडे यांचे नुकतेच वयाच्या ७८ व्या वर्षी निधन झाले. आपल्या कारकिर्दीत त्यांनी सहकारात काम करणाऱ्या आपल्या सर्व अधिकारी व



कामगारांना बरोबर घेऊन ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळयाच्या माध्यमातून सलग वीस वर्षे अध्यात्मिकतेची गोडी लावली कीर्तनात हार्मोनियमची साथ देऊन सेवा देणारे सेवा कर्मी व वारकरी संप्रदायातील संतसेवक हरपला असल्याची जाणीव आज होत आहे.

विलासराव काकडे यांनी ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्यात सेवा देत असतांना वारकरी संप्रदायाबद्दल आकर्षण व अध्यात्मिक कार्याची ओढ त्यांच्या मध्ये होती,काम करत असतांना संतांनी रचलेले अभंग गाणे व सतत मुखामध्ये गुणगुणत रहाणे हा त्यांचा खरा व्यासंग होता.काकडे साहेब व माझी सासुरवाडी नेवासा बुद्रुकची त्या नात्याने आम्ही दोघे साडु भाऊ,नेवासा बुद्रुक येथील प्रगतशील शेतकरी पांडुरंगदेवा डौले यांचे ते जावई होते

कारखान्यात सेवेत असल्याने मी देखील त्यांच्या बरोबर भजन व कीर्तनाला जात असत.त्यांच्या भजनामुळे काकडे साहेबांचा दिवसभर केलेल्या कामाचा थकवा ही गायब होत असे असा उत्साह त्यांच्या चेहऱ्यावर असायचा.

ज्ञानेश्वर कारखान्यातील ३५ वर्षातील सेवेत त्यांनी स्वर्गीय लोकनेते मारुतराव घुले पाटील व स्वर्गीय बाबासाहेब नरवडे पाटील यांच्या प्रेरणेने दरवर्षी कारखाना कार्यस्थळावर होणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळयाचे सलग वीस वर्षे नेतृत्व करण्याची व अनेक संतांची सेवा करण्याची संधी त्यांना मिळाली होती.

वैकुंठवाशी बन्सी महाराज तांबे व प्रसिद्ध कीर्तनकार हभप मीराबाई महाराज मिरीकर यांच्या मार्गदर्शनात त्यांना अनेक संतांची सेवा करण्याची संधी त्यांना मिळाली होती.अध्यात्मिक कार्यासाठी त्यांना ज्ञानेश्वर कारखान्याचे मार्गदर्शक माजी आमदार नरेंद्र घुले पाटील,चंद्रशेखर घुले पाटील,माजी आमदार पांडुरंग अभंग यांची खंबीर अशी साथ मिळाली होती.

सेवानिवृत्त झाल्यानंतर ते आपल्या कुटुंबासमवेत संत ज्ञानेश्वर माऊलींची कर्मभूमी असलेल्या नेवासा येथे आले. संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरात होणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताहातील किर्तन सोहळयात हार्मोनियम वाजविण्याची सेवा ते आवडीने घेत,नित्यनेमाने सपत्नीक माऊलींच्या दर्शनासाठी जाणे,येथे होणाऱ्या धार्मिक कार्याला हजेरी लावणे धर्म कार्यात अन्नदान रुपी सेवा देऊन खारीचा वाटा उचलणे व अखंड हरिनाम सप्ताहात सक्रिय सहभाग घेणे हा त्यांचा क्रम ठरलेला होता.

शेवटच्या श्वासापर्यंत त्यांनी वारकरी संप्रदायाशी नाते जोडून सपत्नीक सेवा कार्य केले.त्यांचे वयाच्या ७८ व्या वर्षी शनिवार दि.९ मे रोजी अकस्मात निधन झाले त्यांच्या निधनाने सहकार क्षेत्रात काम करणारा निष्काम कर्मयोगी व वारकरी संप्रदायातील सेवा कर्मी हरपला त्यांचे उद्योजक असलेले चिरंजीव संभाजीराव काकडे,दोन मुली सौ.उज्वला सुभाष चोथे,सौ.जयश्री संजय धुमाळ,पत्नी श्रीमती आशाताई सहा नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या परिवाराच्या दुःखात ज्ञानेश्वर उद्योग समूह व आमचा धस परिवार नातेवाईक सहभागी आहे त्यांच्या आत्म्यास चिरशांती मिळो हीच दशक्रिया विधीनिमित्ताने त्यांना भावपूर्ण आदरांजली...ओम शांती

**शब्दांकन-श्री बबनराव धस**
**चेअरमन-श्री मारुतराव घुले पाटील ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था भेंडे ता.नेवासा**

**संकलन : सुधीर चव्हाण**
**राष्ट्र सहयाद्री प्रतिनिधी नेवासा**

लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे सेवानिवृत्त अधिकारी



कै.विलासराव बापूसाहेब काकडे साहेब
यांना तेराव्या विधी निमित्ताने
भावपूर्ण श्रद्धांजली...

श्री.मारुतरावजी घुले पाटील
ग्रामीण बिगरशेती सह.पतसंस्था लि.
भेंडा, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर

श्री. बबनराव काशिनाथ धस — चेअरमन
श्री. सुरेशराव दगडू उभेदळ — व्हा. चेअरमन
श्री. सुरेशराव सरोदे — मॅनेजर

* संचालक मंडळ *
श्री. शिवाजी लक्ष्मण शिंदे | श्री. शिवाजी आण्णासाहेब मोटे | श्री. बाळासाहेब मोहनीराज डोहाळे
श्री. अशोकराव लक्ष्मण भुमकर | सौ. पुष्पलता बबनराव धस | सौ. कमलबाई सोपान मिसाळ
श्री. श्रीधर मुरलीधर साळवे | श्री. भाऊसाहेब जगन्नाथ चौधरी | श्री. अशोकराव लक्ष्मण मिसाळ

श्री. सुरेश घुले — क्लर्क
श्री. सोमनाथ तांबे — शिपाई
श्री. शिवाजी फुलारी | श्री. सोमनाथ गव्हाणे — बचत प्रतिनिधी